
महाराष्ट्राचे शिल्पकार

# भारतरत्न नानाजी देशमुख

कमलाकर अंबेकर



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

महाराष्ट्राचे शिल्पकार

# भारतरत्न
# नानाजी देशमुख

**कमलाकर अंबेकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

➢ **पुस्तकाचे नाव :** महाराष्ट्राचे शिल्पकार भारतरत्न नानाजी देशमुख

➢ **लेखक :** कमलाकर अंबेकर

➢ **प्रथमावृत्ती :** २०१९

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत :** रुपये ३१४.००

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने स्थापनेपासूनच उत्तमोत्तम ग्रंथांची निर्मिती केली आहे. 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या योजनेतून आजपर्यंत समाजाला दिशा देणारी अनेक चरित्रे प्रकाशित करण्यात आली आहेत. त्याच मालिकेतील हे एक प्रकाशन आहे.


नानाजी देशमुख हे नाव भारतासह जगभरात सर्वदूर पोहोचलेले आहे. ज्यांचे कार्य पाहून कर्मयोगी हेच विशेषण ज्यांना शोभून दिसते असे नानाजी देशमुख आदर्श राष्ट्रपुरुष होते. सेवावृत्ती, विनम्रता, देशभक्ती, लोकसेवा यांचा एकाच व्यक्तीत मिलाफ असणे दुर्मिळ असते, त्या दुर्मिळ व्यक्तींपैकी ते एक होते. त्यांची वृत्ती संशोधकाची होती. त्यातूनच एखादे कार्य हाती घेतल्यानंतर त्यात खोलवर जाऊन ते शंभर टक्के चांगले कसे होईल याची जिद्द ते बाळगत. वाणिज्य, कला, स्थापत्य, मानसशास्त्र, आरोग्य, कृषी, काष्ठशिल्प, चित्रकला, वास्तुशास्त्र अशा अनेक विषयांमध्ये ते निष्णात होते, यावरूनच त्यांची प्रत्येक क्षेत्रात जीव ओतून काम करण्याची ताकद, इच्छा आणि प्रेम दिसून येते.

समाजकारण हा त्यांचा आवडता विषय आणि प्रांत होता. सदाचार, शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबन या चतु:सूत्रीवर आधारित अनेक योजना राबवून त्यांनी अनेक गावांचा सर्वंकष विकास करण्याचा प्रयत्न केला. वयाच्या साठीला लोक निवृत्त होण्याचा विचार करतात; परंतु नानाजींनी त्या वयात समाजस्वास्थ्य योजना कार्यान्वित केली. यातून त्यांचा समाजाप्रती असलेला सेवाभाव प्रकट होतो यात शंका नाही.

चित्रकूटमध्ये नानाजींनी उभारलेले काम म्हणजे एक आश्चर्य आहे. विचार आणि कृती यांचा संगम झाला, की काय होऊ शकते याचा हा आदर्श नमुना आहे. स्वतंत्र विचारांचे, मनाने शुद्ध, सर्वच घटकांशी मिळून मिसळून वागणाऱ्या अशा नानाजी देशमुख यांचे हे चरित्र मंडळाकडून प्रकाशित होत आहे याचा आनंद होत आहे.


**- बाबा भांड**

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई



**एका निवांत क्षणी नानाजी**

उज्ज्वल भारताचे स्वप्न
उराशी बाळगत
अथक वाटचाल करणाऱ्या
तीर्थंकर नानाजींच्या पवित्र स्मृतीस
सादर समर्पित...



**नानाजींची एक मुद्रा**

# मनोगत

मला आठवते, १९९४ मध्ये मी गुडगावला बँकेच्या प्रशिक्षणासाठी गेलो होतो. ठरवूनच नानाजींना भेटायला दिल्लीला गेलो. नात्याने मी त्यांच्या जवळचा होतो. ते माझे प्रेरणास्थान असल्यामुळे मला त्यांच्याविषयी आदर आहे. भेटीमुळे त्यांना अत्यानंद झाला. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर चित्रकूटला येण्याबाबत त्यांनी आग्रह धरला. त्याप्रमाणे मी चित्रकूटला गेलो. चित्रकूटमध्ये नानाजींनी उभे केलेले काम, विश्वविद्यालय पाहून मला आश्चर्य वाटले. आपणही समाजाचे काही देणे लागतो, असा नुसता विचार करण्यापेक्षा कृती महत्त्वाची हा विचार मनात घेऊन, समाजसेवेचा निखारा मनात धगधगत होता.

मी वयाच्या ५५ व्या वर्षी स्वेच्छानिवृत्ती घेऊन नोकरीचा राजीनामा दिला आणि दीनदयाल शोध संस्थानच्या कामात सहभागी झालो. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत समाधानाची सावली प्राप्त झाल्याने नानाजींच्या सहवासात कार्य करण्यासाठी मी मोकळा झालो. नानाजींबद्दल काही लिहावे ही सुरुवातीपासूनची मनीषा; परंतु नानाजी प्रसिद्धिपराङ्मुख होते. व्यक्तिविशेषांपेक्षा काम महत्त्वाचे, संस्था महत्त्वाची, तेच चिरकाल टिकतात असे ते म्हणत; परंतु माझ्या त्यांच्यावरील निष्ठेने मी त्यांच्यावर लिहिण्याचे काम हाती घेतले. नानाजी, त्यांचे कार्य व एकूणच जीवनपट याची माहिती सर्वांनाच व्हावी हा या लेखनाचा रास्त उद्देश.

नानाजी आदर्श राष्ट्रपुरुष होते. त्याग, सेवावृत्ती, विनम्रता, देशभक्ती, राष्ट्रप्रेम, लोकसेवा यांचा अद्‌भुत मिलाफ त्यांच्याकडे होता. त्यांचे जीवन कष्ट-संघर्षाने भारलेले, सर्वांसाठी प्रेरणा व प्रोत्साहन देणारे होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व भारावून टाकणारे होते. नानाजी स्वतंत्र विचारांचे, मनाने मोकळे, सर्वांशी मिसळून घेणारे, रोखठोक विचारांचे तसेच जात-पात न मानणारे व भेदभाव न करणारे होते. नानाजींचा स्थायीभाव कणखर होता. कुशाग्र बुद्धी, समाजसुधारणेची

आस, सामाजिक कार्याची व सतत नवीन रचनेची आवड अशी त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये होती.

वाचनाची आवड असल्याने कुठल्याही विषयाच्या लहानसहान तपशिलात ते जात. विशेषज्ञांशी चर्चा करीत व तो विषय आत्मसात करीत. संशोधक वृत्तीने त्यांनी कला, वाणिज्य, स्थापत्य, मानसशास्त्र, आरोग्य, कृषी, काष्ठशिल्प, चित्रकला, वास्तुशास्त्र इ. विषय सहजपणे आत्मसात केले. आरोग्यधाम, रामदर्शन, दीनदयाल शोध संस्थानची इमारत ही त्याचीच काही बोलकी उदाहरणे आहेत.

लहानपणी आई-वडिलांचे छत्र हरपल्यानंतर संघसंस्कारांमुळे त्यांचे जीवन बदलून गेले. संघशाखेवर शिकलेला निर्भीडपणा, स्पष्टपणा, चातुर्य हे गुण त्यांना आदर्श राष्ट्रपुरुष व कर्मयोगी बनविण्यास कारणीभूत ठरले. कर्मवाद, नीतिमूल्ये याबद्दल ते आग्रही होते. 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना त्यांना भावत असे. खेळांची त्यांना आवड होती. संघाचे प्रचारक असताना उत्तर प्रदेशात त्यांनी शाखांचे जाळेच विणले होते. शिक्षणाचे महत्त्व जाणून त्यांनी १९५० मध्ये शिशुमंदिराची स्थापना केली होती.

मराठवाड्याच्या पावन भूमीत जन्मलेले उत्तर भारतात व देशात कार्यक्षेत्राची व्याप्ती वाढवलेले हे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणार आहे आणि म्हणूनच या महात्म्याच्या कर्तृत्वाची गरुड भरारी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी केलेला हा एक छोटासा प्रयत्न असून हे चरित्र आपल्या हाती देताना मला धन्यता वाटत आहे.

नानाजींनी 'युगानुकूल नवरचनेची' संकल्पना दिली. कार्याची अफाट व्याप्ती हेच नानाजींचे आत्मचरित्र आहे. देश-विदेशातील अनेक मान्यवर, वैज्ञानिक, राजनीतिज्ञ, समाजसेवक आदी सर्वच स्तरांतील व्यक्तींनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.

आजन्म ब्रह्मचारी राहून समाजकार्यासाठी देह झिजविणारा हा राष्ट्रऋषी मरणोपरांत देहदानकर्ता झाला. म्हणूनच देशाच्या संत-महंतांच्या परंपरेत त्यांचे नाव गुंफणे उचित होईल असे वाटते. नानाजींची ओळख बुद्धिमान आणि असामान्य कौशल्य असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून भारतीय राजकारणात दिली जाते.

श्रद्धेय नानाजींचे चरित्र लिहिण्याचे ठरविले व त्यादृष्टीने माहिती गोळा करू लागलो. माहिती वाढतच गेली. ते शब्दांत मांडणे अवघड होते. शब्दच अपुरे पडतील इतके त्यांचे कार्य महान आहे. तेव्हा अनुभवास आले की नानाजींचे हे

कार्य समुद्रासारखे अथांग आहे. हे लिखाण हाती घेतल्यावर अनेकांची परोक्ष-अपरोक्ष मदत झाली. ज्यांनी मला लिखाण कसे असावे, शब्द कसे वापरावेत, शब्दरचना कशी असावी, लिखाणातील व्याकरणाच्या त्रुटी काय आहेत, लिखाण सुसंबद्ध आणि नेटके कसे राहील यासंबंधी अमूल्य मार्गदर्शन व स्वत:चा अमूल्य वेळ देऊन सहकार्य केले त्यांच्या ऋणातच राहीन. या कामी दीनदयाल शोध संस्थानचे माजी प्रधान सचिव यादवराव काका देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. सध्याचे प्रधान सचिव भरतजी पाठक आणि संघटन सचिव अभय महाजन यांच्याकडूनही संकलनाची माहिती वरचेवर प्राप्त झाली. हेमंत, पिंटू, मयंक यांनी या पुस्तकातील चित्रांचे संकलन वेळोवेळी पाठवून बरीच मदत केली. त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. लिखाणामध्ये अचूकता व नेटकेपण येण्यासाठी सौ. वृंदा दिवाण आणि सौ. निर्मला जोशी यांची मदत झाली, त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. नानाजींबद्दल माहिती देऊन माझ्याशी चर्चा केली असे श्री. नाना पाठक, श्री. गणेश पाठक, श्री. सुरेश कडोळकर, श्री. सुरेश देशपांडे, सौ. ज्योती मुजुमदार, डॉ. विनय बाऱ्हाळे यांचाही मी आभारी आहे.


लिखाणात मदत करण्यात डॉ. राघवेंद्र जोशी यांचा फार मोलाचा वाटा होता. मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो. त्यांच्याच प्रोत्साहनाने हे पुस्तक पूर्णत्वास आलेले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या मालिकेत नानाजी देशमुख यांचे चरित्र लिहिण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविली त्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष श्री. बाबा भांड, मंडळाचे सचिव व सर्व सन्माननीय सदस्य यांचे मी आभार व्यक्त करतो. रसिक वाचक या ग्रंथाचे स्वागत करतील अशी अपेक्षा बाळगतो.

देशहित साधणाऱ्या नानाजींच्या या चरित्रात काही त्रुटी राहिल्या असल्यास त्या माझ्या आहेत आहेत व जे जे चांगले आहे ते सर्व चरित्रनायक आणि मंडळाचे आहे असे नम्रपणे नमूद करतो.

**- कमलाकर अंबेकर**

१६ए, सुयोग अपार्टमेंट,
समाधान कॉलनी, लोहिया हॉस्पिटलची गल्ली,
क्रांतीनगरजवळ, औरंगाबाद-४३१००५
औरंगाबाद - ४३१००९



'ग्रामोदय' योजनेत सामील असलेल्या व्यक्तींच्या मनाला मान-सन्मानाची आणि प्रसिद्धी-प्रतिष्ठेची कुठलीही अभिलाषा चिकटू नये. तरच या कठीण कार्याला यशस्वी करण्यात आम्ही आवश्यक असलेल्या कार्यकर्त्यांसह सक्रियतेने सहकारी म्हणून योग्य ठरू. ग्रामोदयची यशस्वीता एका व्यक्तीवर अवलंबून नसून, ती सहकाऱ्यांच्या समर्पित वृत्तीवर, निष्ठेवर आणि परिश्रमांवर अवलंबून आहे.

- **नानाजी देशमुख**

## अनुक्रम

बालपण आणि शिक्षण... १
स्वयंसेवक नानाजी... १२
राजकारण...बोले तैसा चाले... २३
नानाजी आणि समाजकारण... ४८
स्मरणरूपी नानाजी... ७२
विचारांचा महामेरू... ८७
नानाजींचे व्यक्तिमत्त्व... ९३
अजातशत्रू... ९५
नानाजींचे विदेशभ्रमण... १००
अखेरची यात्रा... १०४
नानाजींना मिळालेले पुरस्कार... १०६
आदरांजली... १०८
उपसंहार... १११
नानाजी देशमुख यांचा जीवनपट... ११३



# बालपण आणि शिक्षण

*देखणे जे हात ज्यांना निर्मितीचे डोहाळे,*
*मंगलाने गंधलेले सुंदराचे सोहळे,*
*देखणी ती पावले जी ध्यासपंथे चालती,*
*वाळवंटातूनसुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती*

कविश्रेष्ठ बा.भ. बोरकर यांच्या वरील ओळींतून नानाजींच्या अखिल जीवनप्रवासाचे यथार्थ दर्शन घडते.

११ ऑक्टोबर १९१६. शरद पौर्णिमेच्या दिवशी मराठवाड्याच्या पावन संतभूमीत कडोळी, ता. हिंगोली, जि. परभणी या छोट्या गावी श्री. अमृतराव देशमुख यांच्या पत्नी सौ. अन्नपूर्णाबाई ऊर्फ राजाबाई यांच्या पोटी जे पुत्ररत्न जन्मले तेच नानाजी उपाख्य चंडिकादास अमृतराव देशमुख पुढे कर्मयोगी संत म्हणून प्रसिद्ध झाले.

नानाजींच्या सर्वांत मोठ्या भावाचे नाव आबासाहेब देशमुख. थोरली बहीण लक्ष्मीबाई यांचा विवाह रिसोड, जि. अकोला येथील श्री. दत्तात्रय देशपांडे यांच्याशी झाला. दुसरी बहीण मैनाबाई ही नांदेड येथील बाऱ्हाळे कुटुंबाची सून झाली. तिसरी बहीण सखूबाई ऊर्फ बायडाबाई यांचा विवाह किसनराव देशमुख, रा. जुन्नी, जि. नांदेड यांच्याशी झाला. चौथी बहीण कोकिळाबाई यांचे लहानपणीच

निधन झाले. नानाजींचे वडील अमृतराव देशमुख यांना सर्व जण अप्पासाहेब या नावाने ओळखत. त्यांचा स्वभाव तापट आणि करारी होता. देशमुख घराणे असल्याकारणाने प्रतिष्ठेचे वलय व दबदबाही होता. त्यांच्या कुटुंबाने पूर्वी देशमुखी अनुभवली असेल; पण नानाजींचा जेव्हा जन्म झाला तेव्हा नानाजींच्या वडिलांची म्हणजेच अमृतराव देशमुखांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. निसर्गाच्या ऋतुचक्रातील सहस्राहूनही अधिक चंद्र त्यांनी पाहिले; पण बालपणी भाकरीचा पूर्ण चंद्र मात्र त्यांना पाहावयास मिळाला नाही. पदरी सहा मुले. या गरिबीला कंटाळूनच नानाजींची आई राजाबाई यांनी विहिरीत जीव दिला. अवघे दीड वर्षाचे असतानाच नानाजी मातृसुखाला पारखे झाले. आईच्या आत्महत्येचे कारण त्यांनी सौ. नीलम देशपांडे यांना दि. १९ जुलै १९८४ च्या पत्रात लिहिले आहे. आतिथ्याचे महत्त्व काय आहे हे सांगताना ते लिहितात-अतिथीच्या व्यवस्थेमध्ये कमीपणा राहणे हे लज्जास्पद मानले जायचे. माझ्या आईला आपल्या घरी आलेल्या अतिथींचे यथोचित स्वागत न करता आल्यामुळे दु:ख होत होते. त्यामुळे तिने आत्महत्या केली. पुढील आयुष्यात नानाजी त्यांच्या जन्मगावी गेले, तेव्हा दि. २३जून १९९७ रोजी त्या विहिरीची पूजा करून त्यांनी आपल्या आईला श्रद्धांजली वाहिली.

थोड्याच दिवसांत नानाजींचे पितृछत्रही हरपले. आई-वडिलांच्या परोक्ष वडील बंधू आबासाहेब यांनी छोट्या नानाजींना सांभाळले. कडोळी गावात त्यावेळी शाळा नव्हती. नानाजींच्या शिक्षणाचे काय करावे हा प्रश्न आबासाहेबांपुढे होता. आबासाहेब नानाजींना घेऊन हैदराबादला गेले. कोणाकडे तरी सोय लावावी या उद्देशाने गेलेल्या आबासाहेबांना अपयश आले. अर्धी चड्डी, मळका शर्ट, डोक्यावर टोपी असा नानाजींचा गबाळा अवतार होता. गरिबी तर होतीच. त्याबरोबरच अज्ञानही होते. स्वच्छता, टापटीप या गोष्टींचे बाळकडू आईकडून मिळते. आई नसल्यामुळे त्याचे महत्त्व कोण सांगणार? शेवटी हैदराबादहून परतल्यावर नानाजींना आपल्या थोरल्या बहिणीकडे म्हणजे सखूबाईकडे जुन्नी येथे राहावे लागले. बहिणीच्या घरची परिस्थिती सधन असल्यामुळे नानाजींना ठेवून घेण्यास तिला काहीच जड गेले नाही. भरपूर दूधदुभते, शेती त्यामुळे नानाजींना खायला-प्यायला काही कमी नव्हते. जुन्नी या गावी शिक्षणाची सोय मात्र नव्हती. त्यामुळे नानाजींचे मन तेथे रमेना. तेव्हा मोठ्या आशेने नाना नांदेडला आपल्या दुसऱ्या बहिणीकडे म्हणजे मैनाबाईकडे गेले. कालानुरूप

शिक्षण घेणे, शाळेत जाणे याबाबतीत उदासीनतेचे वातावरण असल्याने नानाजींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. यामुळे नानाजींचे मन फारच खट्टू झाले. मोठ्या भावाला याची फारशी खंत नव्हती. परिस्थितीने बालपण हिरावून नेले होते. आवडीनिवडीऐवजी तडजोड हा एकच पर्याय स्वीकारावा लागणार होता.

नांदेडहून निघून नानाजी आपल्या गावी कडोळीला आले. मनात शिक्षणाविषयी आवड, जिद्द होती. १९२७ मध्ये नानाजींची बहीण सौ. लक्ष्मीबाई देशपांडे यांच्या यजमानांची बदली चिंचअंब्याहून रिसोड (जिल्हा अकोला) या गावी झाली. त्यांचे यजमान व्यवसायाने शिक्षक होते. लक्ष्मीबाईंनी आपल्या लहान भावास स्वत:कडे नेले. वयाच्या ९ व्या वर्षांपर्यंत नानाजींना मुळाक्षरेही माहीत नव्हती. त्यामुळे त्याला पहिलीतच प्रवेश घ्यावा लागला. कुशाग्र बुद्धिमत्तेच्या नानाजींनी चारच महिन्यांत घरी अभ्यास करून इ. तिसरीमध्ये प्रवेश मिळवला. त्यानंतर मात्र नानाजी पुन्हा कधीही कडोळीस माघारी फिरले नाहीत.

रिसोड गावातच नानाजींचे मामा श्री. भाऊसाहेब देशपांडे राहत होते. ऑनररी मॅजिस्ट्रेट असलेले भाऊसाहेब गावातील प्रतिष्ठित व्यक्ती होते. गावातच असल्याने नानाजींचे या मामांकडे वारंवार जाणे होई. कधी-कधी त्यांना तिथे मुक्कामही करावा लागे. धनसंपदेने जरी पाठ फिरवली होती तरी आरोग्यसंपदा मात्र नानाजींवर प्रसन्न होती. नानाजी तब्येतीने दणकट होते. त्यांना कष्टाची सर्व कामे करावी लागत. त्यात पाणी भरणे, लाकडे फोडणे, कपडे धुणे अशा प्रकारची सर्व कामे नानाजींना करावी लागली. नात्यांच्या व्यवहाराचे आणि वागण्याचे खरे-खोटे रूप त्यांना या काळातच बघायला मिळाले. प्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ पद्मश्री तात्याराव लहाने यांच्या म्हणण्याप्रमाणे 'अन्याय झाला तरच त्याविरुद्ध पेटून उठायचे बळ येते आणि त्यातूनच माणसाची प्रगती होते.' नानाजींच्या बाबतीतही असेच झाले.

मामा ऑनररी मॅजिस्ट्रेट होते. साहजिकच त्यांच्याकडे आर्थिक सुबत्ता होती; पण कुटुंबात मनाच्या श्रीमंतीचा अभाव होता. वाढत्या वयाच्या नानाजींना पोटभर अन्न जरूर मिळत होते; पण माया, प्रेम याबाबतीत त्यांना उपाशीच राहावे लागले. दणकट प्रकृतीच्या नानाजींना शारीरिक कष्टाचे काहीच वाटत नव्हते. त्यांना या कामाची जणू सवयच झाली होती; पण पाठीवरून आपुलकीने, कौतुकाने, मायेने, ममतेने हात फिरविणारे कुणी नाही याची त्यांना खंत वाटत असे. 'कौतुकाची किमया एवढी जबरदस्त असते की, कौतुकाच्या दोन शब्दांवर

माणूस पुढे जाऊ शकतो.' असे प्रसिद्ध तत्त्वचिंतक मार्क ट्वेन म्हणतात. नानाजी मात्र अशा कौतुकापासूनच वंचित होते. स्वत:चे आश्रितपण त्यांना खूप बोचत असे. ते अस्वस्थ व्हायचे.

प्रेमासाठी आसुसलेला जीव कुठेतरी आसरा शोधतो. मन कुठेतरी गुंतविण्याचा प्रयत्न करतो. याच प्रवासात मामाच्या घरी त्यांना वाचनाची गोडी लागली. वर्तमानपत्रे, मासिके, पुस्तके यांचा भरपूर साठा त्यांना मिळाला. वाचनाच्या या छंदात त्यांचे मन इतके रमून गेले, की त्यांना त्यांचे परकेपण, आश्रितपणातील खंत, अनुभवातील बोचरे क्षण या सगळ्यांचा विसर पडला. मन प्रगल्भ होत गेले. वयाबरोबरच बुद्धीचीही वाढ होत होती. ती कुशाग्र अन् चौकस होत गेली. त्यांना वाचनाचा नाद होता. कादंबरी वाचनाची आवड होती. नानाजी सांगतात की, त्यांना देव सरांनी चरित्रपर वाचनाची गोडी लावली. वाळवंटातून प्रवास करताना ओॲसिस सापडावे तसेच नानाजींना वाचनाच्या बाबतीत झाले. अधाशासारखे वाचन करून ते आनंदी होत असत. याचदरम्यान स्वातंत्र्यवीर सावरकरांचे चरित्र नानाजींच्या वाचनात आले. नानाजी शिकत असताना त्यांना गृहपाठ करण्यासाठी वह्या विकत घेणे शक्य नसल्यामुळे ते वृत्तपत्रांवर बोरूने लिहून गृहपाठ पूर्ण करीत असत.

लोकमान्य टिळकांची लेखणी आणि वाणीने नानाजी प्रभावित झाले होते. या संस्कारक्षम वयातच इटलीच्या मॅझिनीचे चरित्र त्यांना वाचायला मिळाले. त्या चरित्राने त्यांना विलक्षण प्रभावित केले. त्या पुस्तकातील स्वातंत्र्यलढ्याची वर्णने वाचून त्यांच्यात राष्ट्रभक्ती जागृत झाली. वाचनाच्या या साधनेत त्यांच्या मनाची अवस्था उच्च स्तरापर्यंत उन्नत झाली. वाचनाचा त्यांच्या आयुष्यावर एवढा परिणाम झाला की, समर्थ रामदासांप्रमाणेच त्यांनी 'वाचा, लिहा व विश्लेषण करा' ही शिक्षण क्षेत्रातील मूलतत्त्वे आत्मसात केली आणि पुढील आयुष्यात समर्थांप्रमाणेच 'पहिले ते लिहिणे । दुसरे ते वाचणे । तिसरे ते सांगणे अर्थांतर ।।' हे आपल्या सहवासात येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांतही रुजवायचा प्रयत्न केला. त्या काळातील वाचनाने प्रभावित झालेले नानाजी पुढे सर्वांना सांगत की, प्रत्येकाने दिवसाकाठी निदान तासभर तरी वाचन करावे. अशा वाचण्या-लिहिण्याने मनाची मशागत होते, विचारांना दिशा मिळते. हा त्यांचा स्वानुभवच होता.

नवव्या वर्षी शाळेत गेलेले नानाजी इ. आठवीपर्यंत रिसोडला शिकले. मेहनत आणि कुशाग्र बुद्धीच्या जोरावर त्यांनी पहिला क्रमांक कधीही सोडला नाही.

आठवी पास झाल्यावर नानाजींना पुढील शिक्षणासाठी वाशिमला जावे लागले. वाशिमच्या सरकारी शाळेमध्ये मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाले. ओढवलेल्या परिस्थितीमुळे, घटनाक्रमामुळे नानाजी त्यांच्या जन्मगावापासून दूर दूर जात राहिले.

साधारणपणे १९३१ चा काळ. नानाजी वाशिममध्ये पाठक कुटुंबासोबत राहायचे. भाऊ पाठक आणि नानाजींचे थोरले बंधू आबासाहेब हे दोघे मित्र. त्यामुळेच भाऊ पाठकांनी नानाजींना आपल्या कुटुंबातच वास्तव्याला नेले. त्यांचे बंधू आबा पाठक हे नानाजींच्याच वयाचे, दोघे एकाच शाळेत, एकाच वर्गात. दोघांची आपसात चांगली मैत्री झाली. शाळेत आणि घरात ते दोघे एकमेकांशी प्रेमाने वागत. थट्टा-मस्करी, हास्य-विनोद यात वेळ मजेत जाई. समवयस्कांत असणारा मत्सर, द्वेष, स्पर्धा यांचा लवलेशही त्यांच्या वागण्यात कधी दिसत नसे. भांडण, वाद, मारामारी कधी होत नसे. नानाजी खऱ्या अर्थाने येथे रमले होते. पाठक कुटुंबाशी एकरूप झाले होते. हवे असलेले कौटुंबिक जिव्हाळ्याचे वातावरण त्यांच्या मनाला प्रसन्न करीत होते. त्या घरातील सर्व मंडळींनी नानाजींना खूप लळा लावला होता. नानाजीही त्या घरातीलच एक होऊन राहत होते. घरच्या सर्व कामांत नानाजी मदत करीत होते. दूध काढणे, शेतीची कामे करणे, पडेल ते काम करणे त्यांनी पत्करले होते. नानाजींना शिकण्याची तळमळ असल्याने त्यासाठी कोणतेही काम करून अर्थार्जन करण्यात लाज वाटली नाही.

ज्या पाठक कुटुंबासमवेत नानाजी राहत होते, त्यांचे किराणा दुकान होते. त्यामुळे काजू, किसमिस आणि अन्य खाऊच्या वस्तूही नानाजींना मिळत होत्या. घरी थोडी बागायती शेती असल्यामुळे केळीची बाग लावलेली होती. त्याची देखभाल करणाऱ्या बागवानाकडून नानांनी त्या बागेची मशागत कशी करायची हे जाणून घेतले. केळी पिकविण्याची प्रक्रिया शिकून घेतली. पुढे तर नानाजी घरीच केळी पिकवू लागले. इतर ठिकाणांहून मोसंबी, द्राक्षे, संत्री, रामफळ, सीताफळ, सफरचंद मागवून केळीबरोबर अशा फळफळावळांचा व्यवसायही मोठ्या प्रमाणात वाढवला. नानाजी आणि आबा पाठक यांनी असा व्यवसाय करून आपल्या शिक्षणाची सोय करून घेतली.

शालेय अभ्यासाबरोबरच अभिनयाचीही नानाजींना आवड होती. वाशिममधील करुणेश्वर नाट्यसंस्थेशी नानाजी निगडित होते. त्या संस्थेच्या नाटकातून त्यांनी कामही केले. पुढे १९३५ मध्ये सरकारी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी आचार्य अत्रेलिखित 'साष्टांग नमस्कार' या नाटकाचा प्रयोग केला. खर्च वजा करून उरलेले उत्पन्न

सर्वांनी शाळेच्या गरीब मुलांसाठी जमविलेल्या निधीमध्ये दिले. या नाटकाचे दिग्दर्शन शाळेचे चित्रकला शिक्षक मा. स्व. दादासाहेब बांदिवडेकर यांनी केले होते. त्याकाळी स्त्री भूमिकाही मुलांनाच कराव्या लागत. या नाटकात नानाजींनी सिद्धेश्वर या पात्राची भूमिका केली. प्रयोग अत्यंत उत्तम झाला होता. विशेष बाब म्हणजे सिद्धेश्वर या भूमिकेबद्दल नानाजींना उत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक मिळाले. पुढे अनेक वेळा त्याच्या या अभिनय गुणांची प्रचीती आली.

वक्तृत्व कलेतही नानाजी पारंगत होते. वाशिम येथे गणपती उत्सवात वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जायची. त्यात उत्स्फूर्त भाषण करावयाचे असे. ज्याला जो विषय मिळेल त्या विषयावर त्याने लगेचच भाषण करावे, असा या स्पर्धेचा नियम. नानाजींनी 'उंदीर' या विषयावर आपली मते मांडून श्रोत्यांची वाहवा मिळवली होती. या वक्तृत्वकलेचा पुढे अनेक सभा गाजवताना त्यांना उपयोग झाला.

आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत नाना ऊर्फ नानाजी, पाठक कुटुंबियांप्रती कृतज्ञता व्यक्त करीत असत. भाऊ पाठक पती-पत्नीस तर ते आई-वडिलांच्या ठिकाणी मानत. याच कुटुंबातील श्री. व सौ. तात्या पाठक यांच्याबद्दलही नानांना अतोनात आदर होता. अनेक दुर्धर प्रसंगांत या कुटुंबाने नानाजींना मदत केल्याचे नानाजींच्या बोलण्यात नेहमीच येई.

नानाजींचे स्वेटर विणण्याचे कौशल्यही वाखाणण्यासारखे होते. कुठला टाका उचलायचा, कुठला एकावर एक घ्यायचा, उलटी-सुलटी वीण याबद्दल ते अनेकांना मार्गदर्शन करीत. एखाद्या निपुण गृहिणीप्रमाणे ओलवलेल्या गव्हापासून रवा-मैदा काढण्यात नानाजी तरबेज होते. थोडक्यात जिथे कला आहे, तन्मयता आहे, तिथे नानाजींचे मन आपोआप रमत असे. त्यांच्या या गुणांचा त्यांना आणि देशाला पुढे बराच उपयोग झाला.

वाशिमला नानाजींचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण झालेले होते. नानाजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत लहानपणापासूनच जात असत. १९३२ मध्ये मालेगाव येथे नानाजी प. पू. डॉ. हेडगेवार यांच्या संपर्कात आले. नानांच्या अंगी असलेली चुणूक आणि कुशाग्र बुद्धिमत्ता पाहता डॉ. हेडगेवार यांनी नानांना पुढील शिक्षणासाठी पिलानी येथे जाण्यासाठी सुचवले आणि नानाजींनी ते तात्काळ मान्यही केले.


पैशांची जुळवाजुळव झाली. प. पू. डॉक्टरांना शब्द दिल्याप्रमाणे नानाजी

पिलानीला रवाना झाले. नानाजींबरोबर आबा पाठक, बाबाजी सोनटक्के, बाजीराव देशमुख हे त्यांचे मित्रही शिक्षणासाठी पिलानी येथे गेले. तेथे त्यांनी हॉस्टेलच्या मेसचे आणि गोरक्षणाचे काम करून मिळणाऱ्या तुटपुंज्या पैशांवर शिक्षणाचा खर्च भागविला. पिलानी येथे शिक्षण घेत असताना संघाने नानाजींना अठरा रुपयांची जपानी सायकल घेऊन दिली होती. सायकलवरून गावातल्या अनेक कुटुंबांशी नानाजींचा संपर्क असे. कॉलेज संपल्यानंतर ते संघकार्यात स्वत:ला झोकून देत.


पिलानीच्या वास्तव्यात नानाजींच्या आयुष्यात एक वेगळीच घटना घडली. मराठवाड्यासारख्या मागास भागातून येऊनही राजस्थानसारख्या अनोळखी भागात राहणे, हिंडणे, कॉलेजात वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करणे इत्यादी कामांमुळे तेथील प्रमुख श्री. जी.डी. बिर्ला प्रभावित झाले. कॉलेजचे प्राचार्य श्री. सुखदेव पांडे यांना ते म्हणाले, 'हा मुलगा मला व्यक्तिगत सचिव म्हणून हवा आहे. राहणे-खाणे, हिंडणे सर्व माझ्याबरोबर आणि शिवाय ऐंशी रुपये पगार!' सन १९३९ मध्ये ही रक्कम खूप होती; पण डॉक्टरांच्या विचारांचा नानाजींवर जबरदस्त प्रभाव होता. स्वत: लग्न न करता देशकार्यासाठी डॉक्टरांनी स्वत:ला वाहून घेतले होते, हाच आदर्श नानाजींसमोर होता. देश पारतंत्र्यात असल्याने याच मार्गाने जाणे जरूरी आहे, हे नानांनी पूर्णपणे जाणले होते. त्यामुळे कोणाचीही नोकरी कधीही करायची नाही, कोणतेही पद धारण करावयाचे नाही, संघकार्यात पूर्णपणे विलीन होऊन जायचे हा दृढ निश्चय त्याच काळात नानांनी केला.

संघ प्रचारक असलेले श्री. बाबासाहेब आपटे पिलानीला आले होते, तेव्हा श्री. गुरुजींच्या सूचनेनुसार बाबासाहेबांनी नानाजींना संघकार्यासाठी आग्रा येथे जाण्याची सूचना केली. पुढील आयुष्यात स्वत:ला संघ स्वयंसेवक असे म्हणवून घेण्यात नानाजींनी धन्यता मानली.


■




मा. नानाजी देशमुख भाषण करताना




माजी राष्ट्रपती मा. नीलम संजीव रेड्डी यांची गोंडा (उ. प्र.) प्रकल्पास भेट



माजी राष्ट्रपती मा. एपीजे अब्दुल कलाम यांची चित्रकूट येथील
'नन्ही दुनिया' प्रकल्पास भेट




प्रसिद्ध उद्योगपती श्रीयुत नस्ली वाडिया यांच्या सोबत




दीनदयाल शोध संस्थानला मिळालेला राष्ट्रीय महात्मा गांधी पुरस्कार
नानाजींच्या वतीने स्वीकारताना डॉ. भरत पाठक




माजी पंतप्रधान मा. श्री. चंद्रशेखरजी यांच्या सोबत श्रद्धेय नानाजी



श्रीमती सखूबाई देशमुख, श्रीमती इंदिराबाई पाठक, श्रीमती मनकर्णिकाबाई बाऱ्हाळे या भगिनींसोबत नानाजी



राजमाता श्रीमती विजयाराजे सिंधिया यांच्या सोबत



# स्वयंसेवक नानाजी

आधुनिक विज्ञानानुसार - माणसाचे वैयक्तिक जीवन त्याचे गुणसूत्र ठरवत असते. माणूस हा समाजशील असल्याने समष्टीशी त्याचा सांधा जुळलेला असतो. म्हणूनच हे समष्टीगत जीवन जगताना माणूस त्या-त्या काळातील नि:स्पृह गुरूच्या शोधात असतो. अशा गुरूलाही त्याच्या गुरुपरंपरेला साजेसा शिष्य न मिळाला तरच नवल!

अशा पवित्र गुरू-शिष्य परंपरेतील एक जोडी म्हणजे प. पू. डॉ. हेडगेवार आणि नानाजी देशमुख.

संघ संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचा परिसस्पर्श लाभलेल्या फार थोड्या भाग्यवंत कार्यकर्त्यांपैकी नानाजी एक होते. १९४० मध्ये डॉ. हेडगेवारांचे निधन झाले तेव्हा त्यांच्या चितेवर हात ठेवून आजन्म ब्रह्मचर्य व्रत अंगीकारण्याची प्रतिज्ञासुद्धा त्यांनी घेतली.

अलीनगर येथे वास्तव्यास असताना नानाजींची ओळख स्वयंसेवक देवीप्रसाद अग्रवाल ऊर्फ देवीबाबू यांच्याशी झाली. देवीबाबू एक दिवस नानाजींबरोबर त्यांच्या खोलीवर आले असताना खोलीची दयनीय अवस्था त्यांना पाहवली नाही. नानाजींजवळ फक्त एक चटई व दोन- तीन भांडी होती. तेव्हापासून दोन वर्षे त्यांनी नानाजींना आपल्याकडेच ठेवून घेतले.

१९४० मध्ये नानाजींच्या मोठ्या भावाच्या मुलाचे निधन झाले. त्यांच्या नातेवाईकांनी तसेच मित्रमंडळींनी नानाजींना लग्न करून वंश वाढवण्याचा आग्रह केला. भावाला एकच मुलगा आणि त्याचेही निधन झाले होते. त्या अवघड प्रसंगीही नानाजींनी लग्न न करण्याचा टिकविलेला निश्चय खरोखरच वाखाणण्याजोगा होता. भावाच्या मुलाच्या मृत्यूनंतर तेराव्या दिवशीच मायेची बंधने झुगारून नानाजी नागपूरला रवाना झाले आणि ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पच्या प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम (आताचा संघशिक्षा वर्ग) पूर्ण केला. ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पसारख्या शिबिरातून व्यक्तिगत व सामाजिक मूल्यांची ठेव घेऊन बाहेर पडलेले नानाजी म्हणजे एक प्रभावी कार्यकर्ता म्हणून समाजाला मिळालेले एक लेणे होते. ऐन तारुण्यात लौकिक संसाराच्या बंधनात न अडकता मातृभूमीच्या सेवेसाठी आपला देह सत्कारणी लावायचा असे ठरवणारे नानाजी म्हणजे एक अजब रसायनच म्हणावे लागेल. या निर्णायक क्षणाचे साक्षी होते श्री. बाबासाहेब आपटे.

नानाजी आग्रा येथे असताना त्यांची आणि पं. दीनदयाल उपाध्यायजींची भेट झाली. त्यावेळेस पंडितजी एम.ए.चा अभ्यास करीत होते. शिक्षणाबरोबरच संघकार्य हेही त्यांच्या जीवनात अग्रस्थानी होते. जास्तीत जास्त वेळ ते संघकार्यासाठी देत. त्याच काळात पंडितजींकडे त्यांची मामेबहीण औषधोपचारांसाठी आली होती. पंडितजींची सेवाभावी वृत्ती पाहून नानाजी खूपच प्रभावित झाले.

एकदा नानाजी आणि पंडितजी भाजी आणायला गेले होते. घरी आल्यानंतर पंडितजींच्या लक्षात आले की, आपण त्या भाजी विकणाऱ्या आजीला चुकून न चालणारा पैसा दिला आहे. उलटपावली ते नानाजींसह परतले आणि आजीचे पैसे चुकते केले. बारीकसारीक गोष्टीपासून ते देशाच्या कल्याणापर्यंतच्या अनेक मूल्यांचे संस्कार पंडितजींकडून नानाजींवर होत गेले. नानाजी सांगत असत- ''दीनदयालजींचे व्यक्तिमत्त्व फार मोठे होते. २८ वर्षे मी त्यांच्याबरोबर काम केले. एकात्म मानव हा दीनदयालजींच्या केवळ चिंतनाचा विषय नव्हता, तर त्यांचे बारीकसारीक आचरणही त्या चिंतनानुसार होत असे.''

चित्रकूटमध्ये एन.सी.सी. कॅम्पच्या शिबिरार्थींना नानाजींनी संबोधित केले. मुलांना संघसंस्कारांचे महत्त्व सांगताना नानाजींनी त्यांच्या बालपणीच्या दिवसांचे वर्णन केले. लहानपणी घरोघरी जाऊन गायीचे दूध काढल्यानंतर मिळणाऱ्या ५० पैशांचे त्यांना किती अप्रूप वाटायचे, दोन पोळ्या आणि मीठ हेच त्यांचे तेव्हाचे जेवण. कधीतरी त्यासोबत मिळालेले लोणचे म्हणजे त्यांना श्रीमंती थाट

वाटायचा. हे सगळे सांगताना त्यांना अभिमान या गोष्टीचा वाटत असे की, इतका त्रास असतानाही ते नक्षलवादी, दहशतवादी किंवा डाव्या गटाचे झाले नाहीत. याचे श्रेय ते नि:संकोचपणे संघसंस्कारांनाच देतात.

गोंडा आणि चित्रकूट येथील नानाजींच्या कामाला तत्त्वज्ञानाची जी बैठक आहे ती पं. दीनदयालजींच्या एकात्म मानवतावादाची आहे. एकाच ठिकाणी तीन तडफदार कार्यकर्ते एकत्र आल्यामुळे नानाजींना आग्रा येथून कानपूरला भाऊराव देवरसांकडे पाठवण्यात आले. भाऊराव देवरसांनी त्यांना पूर्व-उत्तर प्रदेश येथील गोरखपूर नगरमध्ये संघ कार्य सुरू करण्यासाठी पाठवले होते. नानाजी केवळ शाखेवर लाठीकाठी फिरवत राहिले नाहीत, तर ते थेट उत्तर प्रदेशात गेले आणि गोरखपूर जिल्ह्यात संघप्रचारक म्हणून त्यांनी दीर्घकाळ वास्तव्य केले. प्रश्न असा पडतो की, उत्तर प्रदेशातील गोरखपूरलाच नानाजी का गेले? गंगेच्या पवित्र किनाऱ्यावरील काशीलाच का नाही थांबले? कारण नानाजींना गोरखपूरला जायला सांगितले होते म्हणून ते तिथे गेले. त्यांना अंदमानात जायला सांगितले असते तरी ते गेले असते. संघाच्या प्रचारकाला जेथे जायला सांगितले असेल तेथे जावे लागते. तेथे आपल्या कौशल्याने, प्रतिभेने व परिश्रमाने कार्य उभे करावे लागते. नानाजींनीही गोरखपुरात तेथील लोकांना लाठीकाठी फिरविणे शिकवले असेल, नागपूरच्या शाखेसारखाच कबड्डीचा खेळ शाखेच्या मैदानावर खेळायला लावला असेल, त्यातूनच त्यांनी तिथे कार्यकर्तेही घडविले.

नानाजी मुलांची वाट पाहत ज्या मैदानाच्या कडेला बसत तेथे काही मुले फुटबॉल खेळत असत. नानाजींना पहिल्यापासूनच मैदानी खेळांची आवड होती. विशेषत: फुटबॉल तर त्यांना फार आवडत असे. तो खेळ पाहण्यात नानाजी रंगून जात. कडेला बसलेले नानाजी मैदानात कधी पोहोचले ते त्यांचे त्यांनाही कळाले नाही. 'तुमच्याकडे सेंटरला दोन्ही पायांनी बॉल मारणारा कोणी खेळाडू दिसत नाही. मी येऊ का खेळायला?' नानाजींनी विचारले. टीम लीडरने बाकीच्या खेळाडूंशी विचारविनिमय करून नानाजींना खेळात सहभागी करून घेतले. त्यांच्या टीमबरोबर खेळून नानाजींनी त्यांना दुसऱ्या दिवशी सामनाही जिंकून दिला आणि त्या मुलांची मनेही जिंकली.

गोरखपूरला नानाजी एका झोपडीत राहत होते. त्यांच्या जवळ पुरेसे अंथरूण-पांघरूणही नव्हते. राहण्याची-खाण्याची आबाळ होत होती. धष्टपुष्ट शरीराच्या नानाजींचे त्या काळात २० किलो वजन घटले होते. नानाजींनी सांगितले की १५

मे १९४० रोजी फक्त १४ रुपये खिशात घेऊन मी गोरखपूरला आलो होतो. धर्मशाळेमध्ये तीन-तीन दिवस राहिलो. नंतर काही दिवस झोपडीत राहून काढले. काही दिवसांनी वकील श्री. घनश्याम नारायणसिंग यांच्याशी ओळख झाली. आपल्या जेवण्या-राहण्याचा किमान खर्च निघावा म्हणून नानाजींनी श्री. घनश्याम नारायणसिंग नावाच्या कुर्मी जातीच्या वकिलाकडे स्वयंपाक्याचे काम केले. वकीलसाहेबांच्या आऊटहाऊसमध्ये त्यांची राहण्याची सोयही झाली. ध्येयावर अढळ श्रद्धा असली की कोणतेही काम लहान किंवा मोठे असत नाही. यालाच श्रीकृष्णाने सांगितलेला कर्मवाद म्हणतात. नानाजींनी तो सुरुवातीपासूनच स्वीकारला होता. सकाळ-संध्याकाळ संघकार्य आणि दुपारी नोकरी असा त्यांचा तेव्हा दिनक्रम असायचा.

स्वत:च्या व्यवहारकुशलतेने गीता प्रेसचे संस्थापक श्री. हनुमानप्रसाद पोतदार, श्री. महंत दिग्विजयसिंह, काँग्रेसचे नेते श्री. बाबा राघवदास यांना आपलेसे करून घेतले. बार असोसिएशनचे चेअरमन श्री. हरिहरप्रसाद दुबेजी यांना संघचालक बनवले. प्रसिद्ध होमिओपॅथिक डॉक्टर ऋषिकेश बॅनर्जी यांना जिल्हा कार्यवाह बनवले. पुढे राघवदासांनीदेखील नानाजींच्या राहण्याची आणि खाण्याची व्यवस्था केली. गोरखपूर येथे मारवाडी व्यापारांची वस्ती होती. नानाजींनी त्या सर्वांना संघात आणले. त्यात बालाप्रसाद तुलस्थान, मुरलीधर तुलस्थान, मदन जालन, देवी प्रसाद अग्रवाल असे अनेक जण होते.

भाजपचे वरिष्ठ नेता, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक आणि राज्यसभा सदस्य श्री. अश्विनीकुमार आठवण सांगताना म्हणतात, "१९४१ मध्ये गोरखपूरच्या शाखेमध्ये मी स्वयंसेवक झालो तेव्हा नानाजी तेथे जिल्हा प्रचारक होते. संघाचे कार्यालयच त्यांचे घर होते. त्यात ४-५ स्वयंसेवक राहत असत. सर्व जण मिळून स्वयंपाक करीत. स्वयंपाक करण्यासाठी लाकडाची चूल वापरत असत. स्वयंपाक झाल्यावर त्या चुलीमध्ये जो कोळसा उरायचा, तो नानाजी एका तांब्यामध्ये टाकत आणि त्याच गरम तांब्याने धुतलेल्या कपड्यांना इस्त्री करीत. नानाजी बिनइस्त्रीचे कपडे वापरत नसत. पेहराव स्वच्छ व नीटनेटका ठेवण्याची त्यांना सवय होती.

एक दिवस एका शाखेमध्ये गुरुपौर्णिमेचा उत्सव होता. नानाजींना वक्ता म्हणून बोलावले होते. अध्यक्षस्थानी होते नानाजींचे अन्नदाते वकीलसाहेब. दोघांनाही याची कल्पना नव्हती. वकीलसाहेबांचा अधिकार नानाजी जाणून होते;

पण आपल्याकडच्या या तरुण स्वयंपाक्याचे हे वक्तृत्व पाहून वकीलसाहेब आश्चर्यचकित झाले. आपण या शिक्षित युवकाला ओळखले नाही, त्याच्या कामाची साधी चौकशीही केली नाही म्हणून ते खजील झाले. नानाजींच्या प्रभावी वक्तृत्वाने ते भारावून गेले. वकीलसाहेबांच्या रूपाने संघाला कायमचा आश्रयदाता मिळाला. भारतीय संस्कृतीच्या रक्षणाचा ध्यास घेतलेल्या नानाजींसारख्या स्वयंसेवकाच्या कार्याला प्रसिद्धीचा प्रकाश जरी उशिरा मिळाला तरी लोकांच्या स्नेहाचा जीवनरस लवकर आणि अखंड मिळाला आहे.

१९४२ च्या भारत छोडो आंदोलनाच्या वेळेस संघातील एकत्रीकरणाला विरोध करण्यासाठी इंग्रज सुपरिटेंडेंट ऑफ पोलीस श्री. टॉमस हातात पिस्तूल घेऊन आपल्या तुकडीबरोबर डिस्पर्स-डिस्पर्स म्हणून ओरडत आले. नानाजींनी नाजूक परिस्थिती ओळखली आणि श्री. टॉमस यांच्याकडे धावले. त्यांच्या कानात काहीतरी सांगितले आणि शाखेत प्रार्थना व ध्वजप्रणाम करून शाखेला विकीरचा आदेश दिला. टॉमसला आपला अवतार दाखवण्याची संधी दिली नाही. नानाजी संघकार्यात एक एक टप्पा गाठत होते.

सन १९४४ मध्ये छिंतोली गावावर नारायणी नदीचा प्रकोप झाला होता. नानाजी स्वयंसेवकांसोबत त्या गावाच्या मदतीला धावून गेले आणि आपद्ग्रस्तांना त्यांनी त्वरित मदत पोहोचवली. श्री. बाबा राघवदास आणि सहकारी स्वयंसेवकांचे काम आणि तत्परता पाहून थक्क झाले. नानाजींचे अशा प्रकारे कार्यक्षेत्र वाढत राहिले. देवरिया, आजमगड, बतिया असा विस्तार झाला.''

उत्तर प्रदेशचे पूर्व वित्तमंत्री श्री. हरीश श्रीवास्तव यांनी एकदा घडलेली हकिगत पुढीलप्रमाणे सांगितली - ''एक दिवस दुपारी सारेच स्वयंसेवक उठून उभे राहिले. ज्या व्यक्तीच्या सन्मानाप्रती सगळे उठून उभे राहिले होते ती व्यक्ती होती नानाजी देशमुख. ते सरळ माझ्या अंथरुणावर बसले आणि माझी अॅटेची उघडून तपासू लागले. नानाजी खोलीतून गेल्यानंतर मी सध्याचे संस्कार भारतीचे प्रमुख श्री. योगेंद्रजी आणि श्री. रामविलासजी दुबे यांना नानाजींच्या या कृत्याचा अर्थ विचारला, तेव्हा मला कळाले की, गोरखपूरहून आलेल्या एका निरोपानुसार बस्तीहून शिक्षा वर्गाला आलेला युवक क्रांतिकारी चळवळीशी संबंधित आहे. बस्तीहून आलेला युवक मीच एकटा असल्याने नानाजींनी माझी तपासणी करणे स्वाभाविक होते; पण त्यावेळेस माझ्याजवळ क्रांतिकारी गीतांच्या संग्रहाशिवाय काहीही नव्हते. ती पुस्तके नानाजी ज्या तक्क्यावर बसले होते त्याच्या खाली

होती. त्यानंतर नानाजी नित्यनेमाने माझ्या खोलीत यायचे, माझ्याशी गप्पा मारायचे, माझ्या बाबतीत जाणून घेण्याचा प्रयत्न करायचे. मी केवळ अकरा महिन्यांचा असतानाच माझ्या वडिलांचा स्वर्गवास झाला होता. मात्र, नानाजींच्या या प्रेमळ वागणुकीमुळे मला माझे हरवलेले पितृछत्रच मिळाले होते.

नानाजी पुन्हा गोरखपूरला आले. बस्तीसाठी जास्त वेळ देऊ लागले. दिवसभर कॉलेज आणि अभ्यास करून उरलेल्या वेळात नानाजींच्या मार्गदर्शनाखाली संघकार्य करीत होतो. गावातील लोकांशी संपर्क वाढवत होतो. शाळा-कॉलेजांत जाऊन विद्यार्थी-प्राध्यापकांच्या भेटीगाठी घेत होतो. साखर कारखाने, गिरण्या, औद्योगिक कारखान्यांत जाऊन मजूर नेत्यांशी संपर्क ठेवत होतो. आजूबाजूच्या गावांतील शेतकऱ्यांशी, युवकांशी चर्चा करून त्यांना कार्यात सामील करून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. त्या दिवसांत आमची तर सोडाच नानाजींच्या स्तरांपर्यंतच्या अनेकांचीसुद्धा खाण्या-पिण्याची, राहण्याची विशेष सोय नव्हती. माझी किरायाने घेतलेली खोली हेच कार्यालय होते. नानाजी जेव्हा बस्ती भागाच्या दौऱ्यावर येत, तेव्हा आमचा पायीच दौरा असे. शहराच्या आजूबाजूला जाताना मात्र आम्ही किरायाने सायकल घेत असू. दिवसा जिथे जे मिळेल ते खाऊन रात्री घरी आल्यावर स्वयंपाक करून जेवत असू. नानाजींचे अथक परिश्रम आणि कुशल मार्गदर्शनाद्वारे अनेक अडचणींवर मात करीत आम्ही कार्य चौपटीने वाढवले. माझ्या घरापासून बस्ती रेल्वेस्टेशन १० मैलांवर होते. थंडीत, ऊन-पावसात कधीही नानाजी आले तरी आम्ही पायीच घरी येत असू.''

१९४७ च्या स्वातंत्र्यसंग्रामात नानाजींना अटक झाली होती. त्या वेळेस हात वर करायला लावून चाबकाचा मार देणाऱ्या इंग्रजांबद्दल ते अतिशय कटू बोलत. त्या यातना त्यांनी कशा सहन केल्या हे जेव्हा ते सांगत तेव्हा खरोखर अंगावर काटाच उभा राही. टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही ही म्हण नानाजींना तंतोतंत लागू पडते.

१९४८ ते १९५१ या काळात लखनौस्थित 'राष्ट्रधर्म' प्रकाशनचे व्यवस्थापक म्हणून नानाजींनी काम पाहिले. या संस्थेतर्फे राष्ट्रधर्म मासिक, साप्ताहिक पाञ्चजन्य आणि दैनिक स्वदेश लखनौहून प्रकाशित होत होते. त्यांच्याबरोबर पं. दीनदयाल उपाध्यायही काम करीत होते. लेख लिहिणे, कंपोझ करण्यापासून सर्व पेपर घरोघरी जाऊन वाटणे ही सर्वच कामे त्या दोघांनी केली. या दोघांनी हिंदू संघटनेचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचे महत्कार्य अपार कष्ट सहन करून

केले. त्याचे व्यवस्थापकीय संचालक - नानाजी, मार्गदर्शक - पं. दीनदयालजी आणि संपादक - श्री. अटलबिहारी वाजपेयी होते.

महात्मा गांधींच्या हत्येनंतर 'राष्ट्रधर्म'वर बंदी आली होती. नानाजी भूमिगत राहून हे वृत्तपत्र प्रसारित करीत होते. या मागची व्यूहरचना नानाजींची होती.

कोणत्याही गोष्टीचा पाठपुरावा करून ती पूर्णत्वास कशी न्यायची याचा आदर्श नानाजी स्वत: घालून देत असत. नानाजींच्या मते सामाजिक कार्य करणाऱ्यांचे जीवन सामान्य पारिवारिक लोकांपेक्षा वेगळे असते. ते आपल्या नातेवाईकांमध्ये गुंतून राहत नाहीत. त्यांच्या जीवनात नातेवाइकांना वेगळे असे स्थान नसते. ध्येयासाठी ते वेडे झालेले असतात. हे पटवून देताना ते स्वत:चेच उदाहरण द्यायचे. ते सांगत असत, "१९३७ मध्ये मी घर सोडले. १९४५ च्या मार्चमध्ये माझ्या भावाच्या पत्नीचे देहावसान झाले. त्याला एक मुलगा आणि एक मुलगी होती. मुलगा ६-७ वर्षांचा आणि मुलगी एक वर्षाची. मुलगा नेहमी आजारी असायचा. त्याला सांभाळायला होईल म्हणून मला न्यायला भाऊ आले. भाऊ बनारस मुक्कामी असताना ते आल्याचा मला निरोप आला. गोरखपूरहून मी बनारसला आलो. घरी येण्याविषयी बंधुराजांनी विनंती केली. लगेचच काही दिवसांनी बनारसला शिक्षा वर्ग होता व त्याची संपूर्ण व्यवस्था माझ्यावर सोपवण्यात आली होती. साहजिकच मी त्यांच्याबरोबर जाण्याविषयी असमर्थता दर्शविली. भाऊ नाराज झाले. त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. वर्ग संपल्यावर नक्की येईन, १५-२० दिवस राहीन, असे आश्वासन दिले. बंधू दु:खी-कष्टी होऊन परतले. हा त्यांना खूप मोठा धक्का होता. त्यातच २९ एप्रिलला त्यांच्या एकुलत्या एका मुलाचे निधन झाले. या दु:खद घटनेची मला तार मिळाली; पण संघ शिक्षा वर्ग न करता कसे जावे? त्यावेळेस इंग्रज सरकारविरुद्धचा संघर्ष तीव्र झाला होता. संघदेखील इंग्रजांच्या रोषाच्या यादीत होता. भाऊरावजींनी सांगितले, 'तुम्ही घरी जा आणि ५ मे रोजी नागपूर येथे तृतीय वर्षाचा वर्ग करा.' मी ३ मे रोजी घरी गेलो आणि ४ मे रोजी सकाळी सायकलने वाशिम गाठले. कारण कडोळी ते वाशिम केवळ बैलगाडी हेच वाहन वापरता येत असे. दुसरे कोणतेही वाहन नव्हते. वाशिमहून निघून ५ मे रोजी नागपूरच्या शिक्षा वर्गात दाखल झालो."

परिवारातील लोक एकच म्हणत होते की, या माणसाचे हृदय दगडाचे आहे की काय? याला कोणाबद्दल आस्था नाही की प्रेमही नाही! खरंच इतके निष्ठुर

होते का नानाजी? घडून गेलेल्या घटनेसाठी शोक करीत न बसता पुढच्या कार्याला सिद्ध व्हायचे हीच त्यांची धारणा होती. म्हणून नानाजी असे वागू शकले हेच खरे!

१९५८ मध्ये नानाजींचे भाऊ खूप आजारी पडले. त्यावेळेस नानाजी त्यांच्या जवळ राहिले व त्यांनी भावाची जातीने शुश्रूषा केली. पुढील काळात नानाजींच्या भावाने आजारी असल्याची तार केली होती. म्हणून नानाजी त्यांची प्रकृती पाहण्यास गेले असता त्यांना दुसरेच चित्र दिसले. दारात वाजंत्री वाजत होती. ते पाहून नानाजी आश्चर्यचकित झाले. त्यांना कळाले की त्यांचे बंधू आबासाहेब यांनी नानाजींचे लग्न ठरविण्याचा घाट घातला होता; परंतु नानाजींनी त्यास तात्काळ नकार दिला.

१९६३ मध्ये ६०० कार्यकर्त्यांचे पाच दिवसांचे शिबीर बनारस येथे होते. पं. दीनदयालजीही त्या शिबिराला उपस्थित राहणार होते. संपूर्ण शिबिराची योजना आणि व्यवस्थापन नानाजींचे होते. कार्यकर्त्यांमध्ये महिला आणि पुरुष दोघांचाही सहभाग होता. समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ. राम मनोहर लोहिया आणि नानाजींची मानलेली बहीण श्रीमती लता खन्ना यांच्यासारखे मान्यवर शिबिरास येणार होते. त्या शिबिराच्या दुसऱ्या दिवशी नानाजींचे थोरले बंधू आबासाहेब स्वर्गवासी झाल्याची तार आली. सर्वांनीच नानाजींना त्वरित गावी जाण्यासाठी सुचविले. दीनदयालजींनीही त्यांना परवानगी दिली; परंतु नानाजींनी शिबिराची जबाबदारी अर्ध्यावर टाकून जाण्याचे नाकारले. ते गावी गेले नाहीत. 'माझ्या जाण्याने माझ्या भावाचे प्राण परत येणार नाहीत.' अशी मनोधारणा असणारे नानाजी शिबीर आटोपल्यावर हिशेब पूर्ण करून मगच गावाकडे गेले. भावाचा स्वर्गवास झाल्यानंतर देशमुख कुटुंबात नानाजी एकटेच कर्ते पुरुष उरले होते. त्यांच्यावर संपूर्ण कुटुंबाची भिस्त होती. त्या परिस्थितीतही भावनाविवश न होता नानाजींनी कर्मयोग्याची भूमिका बजावली. आपल्या ध्येयाप्रती अढळ निष्ठा असलेल्या नानाजींनी लोक काय म्हणतील याची पर्वा केली नाही. कर्तव्यपूर्तीसाठी करावी लागणारी साधना ही ज्याची त्यालाच करावी लागते याची पुरेपूर जाण नानाजींना होती.

सन १९६५-६६ मध्ये पं. नेहरूंच्या महानिर्वाणानंतर श्री. लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. त्यांच्या कार्यकाळात पाकिस्तानने कच्छ आणि काश्मीरमध्ये घुसखोरी केली आणि युद्धास सुरुवात केली. शास्त्रीजींनी सैन्यदलाचे मनोबल

पूर्णपणे वाढविले होते. आश्वासक शब्दांनी आणि कृतीनेही त्यांचे धैर्य उंचावले होते. संपूर्ण देश जर सैन्याच्या मागे उभा राहिला तर युद्ध जिंकणे सोपे जाईल, असे शास्त्रीजींना वाटत होते. त्यांनी देशातील सर्व राजकीय पक्षांना आवाहन केले. पं. दीनदयालजी, श्री. नानाजी, श्री. अटलजी, काश्मीर जनसंघाचे अध्यक्ष श्री. प्रेमनाथ डोग्रा या सर्व नेत्यांनी युद्धकाळात संपूर्ण देश शास्त्रीजींच्या पाठीशी उभा राहील, असे आश्वासन दिले. याची ग्वाही देण्यासाठी दिल्लीला एक लाख कार्यकर्त्यांचा भव्य मोर्चा काढण्याचा संकल्प केला. नानाजींच्या संघटनकौशल्याची ती परीक्षा होती. जनसंघासारख्या नव्याने स्थापन झालेल्या पक्षाने देशातून एक लाख कार्यकर्ते दिल्लीत एकत्रित करायचे, त्यांचा विशाल मेळावा भरवायचा आणि सरकारला युद्धकाळात बिनशर्त पाठिंबा देण्यासाठी सारा देश एकवटलेला आहे अशी ग्वाही द्यायची, या सर्वच गोष्टी तर्काच्या पलीकडच्या होत्या. नानाजी जिद्दीने कामाला लागले.

या मेळाव्याला जोडूनच दिल्लीला यमुनेच्या तीरावर जनसंघाचे राष्ट्रीय अधिवेशन घेण्याचे ठरविले. नानाजींनी देशभर दौरा करून कार्यकर्त्यांना तयार केले आणि ठरलेल्या तारखेला दिल्लीला एक लाखापेक्षा अधिक कार्यकर्त्यांचा मोर्चा निघाला. मोर्चा सरकारविरोधी नव्हता तर सरकारला पाठिंबा देण्यासाठी होता. त्यामुळे त्याची सांगता संसद भवनाच्या प्रवेशद्वाराजवळच झाली. तशी पूर्वपरवानगी देण्यात आली होती. दोन वेगवेगळी व्यासपीठे उभारण्यात आली होती. त्यापैकी एका व्यासपीठावर नानाजी विराजमान झाले होते. भाषणे चालू असताना कार्यकर्त्यांमध्ये गोंगाट सुरू झाला. नानाजी उठून उभे राहत फक्त एवढेच म्हणत, 'मी नाना देशमुख बोलतोय!' (हाताचे एक बोट उभे करून हात वर केलेला असे) त्यांचे तेवढेच बोलणे ऐकले की कार्यकर्त्यांमध्ये विलक्षण शांतता पसरे. 'दिल्लीपती तू जाग रे, हम भारतवासी आये हैं, तू जाग रे' या शाहीर योगेश यांच्या पहाडी गाण्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले. दिल्लीच्या या मोर्चाची रूपरेषा, प्रत्यक्ष मोर्चा, त्यानंतरचे सर्व कार्यक्रम याची नानाजींनी इतकी सूत्रबद्ध योजना केली होती की, कसलीही धावपळ न होता, पोलिसांना हस्तक्षेप करावा न लागता हा मोर्चा पूर्णपणे यशस्वी झाला. हे भव्यदिव्य कार्य नानाजींनी सहज करून दाखवले.

या कार्यक्रमाला अर्थातच आकाशवाणी, विदेशी आणि देशी पत्रकार हजर होते. कार्यक्रमाची सांगता होत असताना थोडासा गोंगाट पुन्हा सुरू झाला.

नानाजींच्या हात उंचावून एक बोट वर करण्याच्या कृतीमुळे सभेत पुन्हा विलक्षण शांतता पसरली. इंग्लंडच्या ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग सेंटरने लगेचच या वृत्ताचे प्रसारण केले. अनेक वृत्तपत्रांनी या बातमीचे सविस्तर वर्णन केले. त्याचे शीर्षकही तसेच ठेवले 'वन फिंगर फॉर सायलेन्स.'

एकदा वरिष्ठ प्रचारक श्री. बाबासाहेब आपटे यांना डॉ. श्री. राधाकृष्णन यांची भेट घ्यायची होती. तेव्हा डॉ. राधाकृष्णन बनारस हिंदू विश्वविद्यालयात तत्त्वज्ञान विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्या विश्वविद्यालयातील प्रा. पुणतांबेकर यांचे डॉ. राधाकृष्णन यांच्याशी मैत्रीचे संबंध असल्यामुळे श्री. बाबासाहेबांनी पुणतांबेकरांना सोबत घेऊन डॉ. राधाकृष्णन यांच्याकडे जायचे ठरवले. या भेटीप्रसंगी नानाजीही श्री. बाबासाहेबांच्या बरोबर होते. डॉ. राधाकृष्णन कोणत्याही राजकीय पक्षाशी जोडलेले नव्हते; परंतु समाजाभिमुख कार्यप्रणालीसाठी डॉ. राधाकृष्णन यांनी या सर्व स्वयंसेवकांचा गौरव केला. पुढील आयुष्यात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या पहिल्या उच्चशिक्षण आयोगाचे नानाजी एक सदस्य होते.

१९७४ मध्ये बिहारमध्ये लोकनायक श्री. जयप्रकाशजींनी समग्रक्रांती आंदोलन सुरू केले. नानाजी या नवनिर्माण आंदोलनाचे मुख्य संघटक झाले. जयप्रकाशजींच्या लोकसंघर्ष समितीचे ते प्रथम महामंत्री होते. नानाजींच्या प्रयत्नांमुळेच वेगळ्या विचारसरणीचे जयप्रकाशजी नानाजींचे काम पाहून प्रभावित झाले. पोलिसांनी लोकसंघर्ष समितीच्या एका मोर्चावर दि. ०४ नोव्हें.१९७४ राजी लाठीमार केला. जयप्रकाशजी मोर्चाचे नेतृत्व करीत होते. नानाजी त्यांच्या सोबत होतेच. जयप्रकाशजींवर लाठ्या पडू लागल्या तेव्हा नानाजी पुढे आले. त्यांनी लाठीचा मार स्वत:च्या हातावर झेलला. हाताला जबरदस्त इजा झाली, फ्रॅक्चर झाले. खऱ्या स्वयंसेवकाच्या वृत्तीने आपल्या नेत्याला वाचवण्याचे धैर्य त्यांनी दाखविले आणि जयप्रकाशजींचे रक्षण केले.

१९८२ मध्ये स्व. दीनदयालजी यांच्या दैनंदिनीचे प्रकाशन करायचे होते. त्यासाठी दिल्ली येथे बैठक बोलावण्यात आली. काही कारणाने नानाजी त्या बैठकीला हजर राहू शकले नाहीत; परंतु या बैठकीचे इतिवृत्त नानाजींना नंतर कळविण्यात आले. त्या दैनंदिनीची प्रस्तावना तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. संपूर्णानंद यांच्याकडून घ्यावी, असे त्या बैठकीत ठरले होते. त्या अनुषंगाने मा. अटलजींनी त्यावेळेस मा. श्री. संपूर्णानंद यांना भेटण्याचा खूप प्रयत्न केला; पण

अटलजी आणि त्यांची भेट होऊ शकली नाही. तेव्हा हे काम सर्वानुमते नानाजींवर सोपवण्यात आले. मा. संपूर्णानंद यांना प्रस्तावना लिहून देण्याची विनंती करण्यासाठी काशीला जावे लागणार होते. कारण तेव्हा मा. मुख्यमंत्री काशीत होते. फक्त विनंती करण्यासाठी काशीला जाणे नानाजींना पटले नाही. त्यांच्या म्हणण्यानुसार पत्राने जे काम होईल त्यासाठी प्रत्यक्ष कशाला जायचे? त्यांनी त्याप्रमाणे पत्र लिहिले. त्यात प्रस्तावना लिहून ठेवण्याची विनंती आणि ती घ्यायला येण्याची तारीखही कळवली होती.

ठरल्याप्रमाणे नानाजी त्या तारखेला काशीला गेले. नानाजींनी आपल्या नावाची चिठ्ठी आत पाठवली तेव्हा त्यांना बोलावण्यात आले. त्यावेळेस काँग्रेसचे नेते श्री. कमलापती त्रिपाठी आणि अनेक वरिष्ठ नेते तिथे उपस्थित होते. खोलीत गेल्याबरोबर संपूर्णानंदांनी नानाजींच्या हातात प्रस्तावना ठेवली आणि आवश्यक वाटल्यास त्यात बदल करण्याची परवानगीही दिली. नानाजींनी प्रस्तावना वाचून त्यात बदल करण्यास नकार दिला. 'मी हे जसेच्या तसे प्रिंटिंगला देईन. मला पूर्ण खात्री आहे की, आपण जे लिहिलेले असेल ते आमच्या हिताचेच असेल,' अशी टिपणीही नानाजींनी जोडली. तिथे बसलेल्या मंडळींकडे बघून मा. संपूर्णानंद म्हणाले, ''माझा मुख्य शत्रू असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा हा सदस्य माझ्यावर विश्वास ठेवतो आणि तुम्ही मात्र मला या पदावरून हटवू पाहताय!'' सहकाऱ्यांना ही समज देऊनच संपूर्णानंद थांबले नाहीत तर त्यांनी आपल्या पत्नीसही नानाजींच्या चांगुलपणाची, माणुसकीची ओळख करून दिली आणि वेळ मिळेल तेव्हा त्यांची भेट घेण्याचा सल्लाही दिला.

अगदी तरुण वयात नानाजींनी राष्ट्रसेवेच्या कामात स्वत:ला झोकून दिले होते. 'राष्ट्राय स्वाहा: इदं न मम' हे लक्षात घेऊन राष्ट्रकार्य करण्याचा नानाजींनी वसा घेतला होता. राष्ट्रसेवा करता करता त्यांनी आपला देह चंदनाप्रमाणे झिजवला. राष्ट्रसेवेच्या प्रेरणेमुळे स्वत:च्या व्यक्तिगत सुखाकडे पाठ फिरवली व नंतर मागे वळून पाहिलेच नाही.

संबंधित विधायक कार्य त्यांनी निरपेक्षपणे, नि:स्वार्थपणे आणि केवळ समाजहित डोळ्यासमोर ठेवून केले, हे उल्लेखनीय!

असा हा निर्वैर भावनेचा, ध्येयनिष्ठ आणि अनासक्त कार्यकर्ता भावी पिढ्यांना प्रेरणादायी ठरला यात आश्चर्य ते कसले?

■



# राजकारण...बोले तैसा चाले

पुरुष एक त्याची रूपे अनेक.

'एकातच अनेक' पाहण्यासाठी भगवंताला सृष्टीची रचना करावी लागली. गोस्वामी तुलसीदासांच्या 'अतुलित बल थामा' या श्लोकामध्ये त्यांनी रामभक्त हनुमानाचे वर्णन करताना 'एका पुरुषाची अनेक रूपे' असे केलेले आहे. अशा रूपानुसारच जो आपल्या जीवनाची मार्गक्रमणा करतो त्याला रा.स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू. श्री. गुरुजींनी 'परिपूर्ण मानव' म्हटले आहे. असा परिपूर्ण माणूसच स्वत: आदर्श निर्माण करून जगाला योग्य दिशा दाखवण्याची प्रेरणा देऊ शकतो.

प.पू. हेडगेवारांनी बीजरूपाने हा आदर्श जगापुढे ठेवला. त्या बीजाचा पुढे विशाल वृक्ष झालेला त्यांनी 'याचि देही याचि डोळा' पाहिला. त्या अनुषंगाने 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' याची प्रचीती साऱ्या जगाने अनुभवली.

गांधीजींच्या हत्येनंतर नानाजी या हत्येचे सूत्रधार आहेत असे समजून त्यांना अटक करण्यात आली होती. कलम ३०२ अंतर्गत त्यांना पकडण्यात आले होते. मोगलांना जसे कोणत्याही ठिकाणी पाण्यात पाहिले की त्यात संताजी-धनाजीच दिसायचे, तसेच विरोधकांना जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी नानाजी दिसायचे. गैरसमज असा की, महंत दिग्विजय आणि नथुराम गोडसे यांची भेट नानाजींनी

घडवली, दिग्विजयकडे असलेले पिस्तूल नानाजींमुळे गोडसेला मिळाले आणि त्यामुळे गांधींची हत्या झाली, या आरोपामुळेच त्यांना सहा महिन्यांचा तुरुंगवास झाला. या तुरुंगवासाबद्दल नानाजी एका ठिकाणी म्हणतात, 'पहिले पंधरा दिवस तर खुनी, डाकू मंडळींसाठी असतात त्या कंडेम्ड सेलमध्ये मला त्या मंडळींबरोबर ठेवले होते. त्यानंतर चार महिने तसा मोकळा व इतरांपासून वेगळा असलेला सॉलिटरी सेल मिळाला.' आपल्या भोवतालची माणसे क्षणात बदलल्याचे त्यांना त्या वेळेस निदर्शनास आले. गोरखपूरचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट डी.पी. सिंग, जे अटकेपूर्वी नानाजींचे चांगले मित्र होते, ते नानाजींना म्हणाले, 'तुम्ही इतके वाईट आणि खुनी आहात याची कल्पना नव्हती. आम्ही तुम्हाला मित्र मानण्यात चूक केली. आमचा मूर्खपणा, दुसरे काय?'

'कर नाही त्याला डर कशाची?' या भावनेने नानाजी त्यांच्या वक्तव्यावर फक्त हसले, त्यामुळे ते आणखीनच चिडले. नथुरामला नानाजी कधी भेटलेही नव्हते किंवा नानाजींची आणि नथुरामची ओळखही नव्हती याची खात्री पटल्यावर सहा महिन्यांनी नानाजींची तुरुंगातून निर्दोष मुक्तता झाली. त्यावेळेस पुन्हा डी. पी. सिंग भेटायला आले आणि झालेल्या चुकीबद्दल त्यांनी नानाजींची माफी मागितली. या तुरुंगवासाच्या काळात ज्या सॉलिटरी सेलमध्ये नानाजींना ठेवले होते तेथेच नॅशनल गार्डचे नेते मोइनुद्दीन यांनाही ठेवले होते. दिवसभर ते दोघेच तिथे असत. दोघेही पट्टीचे खेळाडू. दिवसभर गप्पा मारायच्या नाहीतर झाडाखाली घोंगडी पसरून पुस्तके वाचायची. रफी अहमद किडवई मोइनुद्दीनचे वर्गमित्र होते. एकदा किडवई सारा लवाजमा घेऊन मोइनुद्दीन यांना भेटायला तुरुंगात आले. 'उद्यापासून तुला घरचा डबा पाठविण्याची सोय केली आहे' असे त्यांनी आपल्या मित्राला सांगितले. त्यावर मोइनुद्दीनने 'मोठा डबा पाठवा, नाना पण माझ्या सोबत जेवणार' असे सांगितले. मोइनुद्दीन तुरुंगातून सुटले तरी नानाजी सुटेपर्यंत किडवई नानाजींसाठी जेवण पाठवतच राहिले. अशा तऱ्हेने रफी अहमद किडवई त्यांचे कायमचे मित्र झाले. दोघांच्याही मनात असलेल्या मातृभूमीवरील प्रेमानेच त्यांना जवळ आणले होते. त्यामुळेच परस्परांविषयी विश्वासाचे संबंध घट्ट रुजले. देशाचे भले व्हावे हे एकच ध्येय होते.

देशातील सर्व जाती-जमातींच्या लोकांनी एकत्र येऊन एक राजकीय पक्ष स्थापन करावा, असे काश्मीरचे प्रतिनिधी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना वाटले; पण हे काम एकट्यादुकट्याचे नव्हतेच. त्यावेळेस त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक

संघाचे सरसंघचालक प.पू. श्री. गुरुजींजवळ विषय काढला आणि त्यांच्याशी चर्चा केली. या चर्चेचे फलित म्हणून संघाने आपले काही उत्तम प्रचारक आणि कार्यकर्ते डॉ. मुखर्जी यांच्या मदतीला दिले. त्यानुसार डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जींनी बंगालमध्ये, श्री. बलराज मधोक यांनी दिल्लीमध्ये आणि पं. दीनदयालजींनी उत्तर प्रदेशमध्ये वेगवेगळा पक्ष स्थापन केला. संघ स्वत: राजकारणात उतरणार नव्हताच. संघातीलच काही लोकांना त्यावेळी वाटले होते की, आता संघानेही राजकीय क्षेत्रात उतरावे; पण श्री. गुरुजींना हे मान्य नव्हते. आपले पूर्वनियोजित समाज संघटनेचेच कार्य संघाने केले पाहिजे, याविषयी त्यांच्या मनात यत्किंचितही शंका नव्हती; पण काहींच्या मनात राष्ट्रीय स्तरावर राजकीय पक्ष एकच असावा असे घोळत होते. २१ सप्टेंबर १९५१ रोजी हे ज्येष्ठ नेते कानपूर येथे एकत्र आले आणि त्यांनी एकच भारतीय पक्ष स्थापन करण्याचा ठराव केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील श्री. लाला हंसराज, श्री. गुप्ता, श्री. वसंतराव ओक, डॉ. धर्मवीर, श्री. बलराज मधोक या ज्येष्ठ नेत्यांच्या संमतीने २१ ऑक्टोबर १९५१ रोजी दिल्ली येथे श्री. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली 'अखिल भारतीय जनसंघा'ची स्थापना झाली. या अधिवेशनात अध्यक्ष म्हणून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी तर महामंत्री या नात्याने पं. दीनदयाल उपाध्याय यांच्यावर संघटनेची संपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली. त्यावेळेस गुरुजींनी पं. दीनदयाल उपाध्याय, श्री. नानाजी देशमुख, श्री. माधवराव मोघे, श्री. सुंदरसिंह भंडारी, ॲड. ठाकूरप्रसाद आणि भाई महावीर जनसंघासाठी दिले.

पं. दीनदयाल यांनी आपले निकटवर्तीय म्हणून नानाजींना कायम आपल्या सान्निध्यात ठेवले. अशा प्रकारे नानाजी भारतीय जनसंघाचे संस्थापकीय सदस्य झाले. पुढे त्यांनी या संघटनेतील संघटन सचिव आणि कोषाध्यक्ष ही पदेही भूषविली. नानाजी बरीच वर्षे संघटनमंत्री होते. त्यांनी संघटनमंत्रिपदाचे काम तर केलेच, तसेच पक्षासाठी पैसाही गोळा केला. त्यांचे म्हणणे होते की, पक्षनीती प्रभावित करणारी उद्योगपतीची मदत आपल्याला नको. तो अधिकार उद्योगपतींना मिळू नये. एकदा बिर्ला घराण्यातील लोक एका खास उमेदवारासाठी आर्थिक मदत द्यायची तयारी दाखवत होते; परंतु नानाजींनी त्यांना प्रतिबंध केला. नानाजींचे म्हणणे होते की, देणगी पक्षाच्या नावावर यायला हवी. ती कोण्या व्यक्तीच्या नावावर नको. त्यांचा मोठमोठ्या उद्योगपतींशी संबंध होता. ते जसे रामनाथ गोएंकाच्या पेन्ट हाऊसमध्ये राहत होते, तेवढ्याच आरामात ते एका

बिहारच्या गावात झोपडीतील बाजेवर झोपत होते. उत्तर प्रदेशात पूर्वी नानाजी प्रचारक होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे १९५७ पर्यंत सर्व जिल्ह्यात भारतीय जनसंघाची मुळे रोवली गेली. जनसंघाच्या शाखा प्रस्थापित केल्याचे श्रेय नानाजींकडेच जाते. संघटनेचे जाळे विणण्यात नानाजी यशस्वी झाले. वेळोवेळी जनसंघ आणि देशातील राजकारण कसे बदलत गेले आणि घडत गेले याविषयी नानाजी भरभरून बोलायचे. माणसांमध्ये ते कसे रमायचे आणि माणसे त्यांच्याकडे कशी ओढली जायची हेही ते प्रांजळपणे सांगायचे. सर्वश्री. चिंतामणराव देशमुख - तत्कालीन अर्थमंत्री, सिंडिकेट काँग्रेसचे ज्येष्ठ नेते श्री. कामराज आणि श्री. निजलिंगप्पा त्यांच्या मित्रांपैकीच होते. साम्यवादी श्री. झेड.ए. अहमद जेव्हा राज्यसभेवर निवडून गेले तेव्हा त्यांना पहिला हार नानाजींनी घातल्याचे त्यांच्या बोलण्यात येई.

स्वातंत्र्य मिळून ३-४ वर्षे झाली होती. काँग्रेस आणि पं. जवाहरलाल नेहरू यांचा जनमानसावर प्रचंड प्रभाव होता. अशा कठीण परिस्थितीत नानाजींनी उत्तर प्रदेशात जनसंघाला भक्कम पायांवर उभे केले. पायी, सायकलने आणि मिळेल त्या वाहनाने संपूर्ण उत्तर प्रदेश पिंजून काढला. नानाजींनी भारतभर प्रवास केला. त्यादरम्यान नानाजी कार्यकर्त्यांच्याच घरी उतरत असत. नानाजी जनसंघ व पक्षाचा विचार करीत असताना कोणालाही 'सदस्य व्हा' असे म्हणत नसत. ते स्वत: प्रत्येक कुटुंबात एकरूप होत असत. त्यांच्या समस्यांचे निराकरण करीत असत, त्यांना स्वत:च्या स्वभावाने जोडत असत. समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करणे हे राष्ट्रीय पक्षाचे काम आहे, असे त्यांचे मत होते. त्यामुळे लोक आपोआपच स्वत:हून सदस्य बनत.

नानाजी जरी जनसंघाचे काम करीत तरी विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांशी त्यांचे चांगले संबंध होते. अनेक विचारवंतांच्या मतांनी ते प्रभावित होते. गांधीजींना स्पष्ट, सडेतोड पत्रे लिहिणारे, गांधीजींसारखेच देशाच्या प्रश्नांबाबत नेमके आणि मूलभूत चिंतन करणारे डॉ. श्री. राममनोहर लोहिया यांच्या विचारांनी नानाजी प्रभावित झाले आणि त्यांना भेटायचे असे नानाजींनी ठरविले. त्यावेळी नानाजी लखनौमध्ये राहत असत. लोहिया लखनौला अनेकदा येत असत. ते, समाजवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते श्री. राजनारायण व त्यांचे इतर साथी संध्याकाळी 'कॉफी हाऊस'मध्ये असायचे. नानाजी लोहियांना भेटायला तिथे गेले. स्वत:ची ओळख करून देत म्हणाले, ''मी नानाजी देशमुख, जनसंघाचे काम करतो; पण

तुमचा मित्र होऊ इच्छितो. तुमचे विचार समजून घ्यावयाचे आहेत.'' लोहियांनी त्यांच्याकडे पाहिले आणि हसून ते म्हणाले, ''तुम्ही जनसंघाचे म्हणजेच संघाचे. मी समाजवादी पक्षाचा. तरीही माझे विचार तुम्हाला जाणून घ्यायचे आहेत! हे कसे?'' त्यावर नानाजींनी जे उत्तर दिले ते फार महत्त्वाचे आहे, त्यावरून पक्षनिष्ठा काय असते ते समजते. ते म्हणाले, ''मी जनसंघाचा, म्हणजेच संघाचा आणि मरेपर्यंत संघाचाच राहीन; पण मी लोकशाही मानत असेन तर तुमचे विचार जाणून घेण्याचा मला प्रयत्न केला पाहिजे.'' यावर लोहिया खळखळून हसले आणि म्हणाले, ''अरे यार, तुम तो अजब आदमी हो।'' त्या क्षणापासून नानाजी आणि लोहियांची मैत्री झाली.

संस्कृत भाषेतील एका श्लोकात राजकारणाची तुलना वारांगनेशी केलेली आहे. इंग्रजीत अशा अर्थाची एक म्हण आहे- 'राजकारण हे बदमाषांचे अखेरचे आश्रयस्थान आहे!' अखेरचे म्हणण्यातला आशय असा असावा की, हे स्थान एकदा प्राप्त झाल्यानंतर ही मंडळी पुढे नंतर कुठेही जात नाहीत. तिथेच कायमचा ठिय्या देऊन बसतात; परंतु राजकारणाच्या बाबतीत असा अनुदार विचार न करता या अत्यावश्यक व अपरिहार्य असलेल्या क्षेत्राचेही उदात्तीकरण करणारे दोन महापुरुष अलीकडच्या काळात भारतात झालेले आहेत. त्यांनी राजकारणाच्या क्षेत्राला आध्यात्मिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. या व्यक्ती म्हणजे श्री. गोपाळकृष्ण गोखले आणि त्यांना आपले राजकीय गुरू मानणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी.

राजकारण आणि अध्यात्म या परस्परविरोधी विचारसरणींची मोठ्या चाणाक्षपणे नानाजींनी सांगड घातली, सर्वमान्य असा मध्यम मार्ग अधोरेखित केला आणि त्या मार्गावरूनच त्यांनी आपल्या पुढील प्रवासाची वाटचाल सुरू ठेवली.

नानाजींच्या मतांचा आदर करण्यात लोहियाही स्वत:ला कमी समजत नसत. यासंदर्भात एक किस्सा नानाजींनी सांगितलेला आहे. १९५५ मध्ये केरळमध्ये राजकीय उलथापालथ झाली. प्रजा समाजवादी पक्ष फुटला. लोहियांनी समाजवादी पक्ष बनवला. त्यानंतरही संयुक्त समाजवादी पक्ष स्थापन झाला. एस.एम. जोशी त्याचे अध्यक्ष झाले. लोहिया त्या पक्षात सामील व्हायला तयार नव्हते. राजनारायण आदी नेतेमंडळी विचारात पडली. ते सगळे जण नानाजींना घेऊन एकाच गाडीने दिल्लीला गेले आणि थेट लोहियांच्या घरी पोहोचले. नानाजींनी पक्ष सदस्यत्वाचा फॉर्म मागवला आणि डॉ. लोहियांना म्हणाले, ''फार झाले हे! स्वत:ला गांधीजी कधीपासून समजायला लागलात? तुम्ही म्हणजे गांधीजी नाहीत आणि एस.एम.

जोशी म्हणजे काही नामधारी अध्यक्षही नाही!'' नानाजींच्या अशा परखड वक्तव्याने लोहियांचे मतपरिवर्तन झाले आणि ते संयुक्त समाजवादी पक्षाचे सदस्य बनले.

नानाजींचा आणि जयपुरिया परिवाराचा अनेक वर्षांपासून ऋणानुबंध होता. नानाजींचा कोणाशीही संबंध येवो आणि तो कोणत्याही पक्षाचा असो, त्यांची त्या व्यक्तीशी मैत्री होत असे. कोणालाही मदत करण्यासाठी ते तत्पर असत. कानपूर स्वदेश हाऊसमध्ये उत्तर प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. चंद्रभानू गुप्ता येणार होते. अचानक त्याच वेळेला नानाजी तिथे आले. त्यांनी सेठ जयपुरियांना 'मी रात्री येथेच जेवण घेणार आहे' असे सांगितले. नानाजी आणि श्री. चंद्रभानू गुप्ता यांचे राजकीय मतभेद माहीत असल्यामुळे जयपुरियांनी नानाजींना श्री. चंद्रभानू गुप्ता येणार असल्याचे सांगितले. नानाजी 'ठीक आहे' म्हणाले व दोघांनीही बरोबर जेवण घेतले. आपले राजकीय मतभेद आड येऊ दिले नाहीत. जयपुरियांनी त्यांचा मोठा मुलगा सीताराम राज्यसभेसाठी निवडणूक लढवत असल्याचे नानाजींना सांगितले. त्यासाठी त्याला मदत करावी असे त्यांनी नानाजींना सुचवले; परंतु नानाजींनी कानपूरचेच दुसरे उद्योगपती श्री. रामरतन गुप्ता यांना शब्द दिला होता. रामरतन गुप्ता यांचे मोठे भाऊ राज्यसभेच्या निवडणुकीसाठी उभे राहणार होते आणि त्यांना मदत करायचे नानाजींनी कबूल केले होते. नानाजींच्या या सांगण्यावर जयपुरियांनी नानाजींना त्यांच्या कुटुंबाचा आणि भारतीय जनसंघाचा संबंध किती जुना आहे याची आठवण करून दिली. यावर नानाजींनी जयपुरियांना आश्वासन दिले की, 'जरी मी रामरतन गुप्ता यांना शब्द दिला आहे तरी मी सीतारामसाठीही प्रयत्न करीन.' दिलेल्या शब्दाप्रमाणे सीताराम गुप्ता यांना अपक्ष उमेदवार म्हणून निवडून आणले. खरा राजकारणी कसा असू शकतो याचा जणू आदर्शच नानाजींनी दाखवून दिला.

१९६२ च्या निवडणुकांपूर्वी श्री. लोहिया, श्री. राजनारायण असे १०-१५ जण बद्रीनाथला प्रभुदत्त ब्रह्मचारींच्या आश्रमात गेले. श्री. प्रभुदत्त थोर क्रांतिकारी होते. स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी भाग घेतला होता. ते आणि पं. नेहरू एकाच तुरुंगात होते. लोहियांच्या मते प्रभुदत्तांना नेहरूंच्या विरुद्ध निवडणुकीला उभे करावे असे होते. त्याप्रमाणे प्रभुदत्तांना त्यांनी विनवलेही होते; पण ते तयार होईनात. तेव्हा लोहियांनी नानाजींना मध्यस्थी करण्यास सांगितले. त्यावर १९५२ मध्ये जनसंघाने नेहरूंविरुद्ध प्रभुदत्तांना उभे केले होते; पण 'बात कुछ बनती नहीं है।' असे

सांगून नानाजींनी हा विचार सोडून देण्यासाठी लोहियांना प्रवृत्त केले. उलट नेहरूंच्या विरुद्ध लढाई राजकीय हवी, तुम्ही स्वत: नेहरूंच्या विरुद्ध निवडणूक लढवा असा सल्ला लोहियांना दिला. पक्ष तुम्हाला पूर्ण पाठिंबा देईल अशी पक्षाच्या वतीने ग्वाही नानाजींनी लोहियांना दिली. ही फार मोठी राजकीय खेळी नानाजींनी त्यावेळेस खेळली. लोहियांनी नेहरूविरुद्ध फुलपूरहून या सर्व मंडळींच्या पाठिंब्यासह जोरदार लढत दिली. ते निवडणूक हरले; परंतु त्यामुळे ते जनसंघाच्या जवळ आले. त्यांनी दि. १२ एप्रिल १९६८ रोजी पं. दीनदयालजींसोबत महत्त्वपूर्ण भारत-पाक महासंघाबाबत संयुक्त वक्तव्य दिले. त्यानंतर एक प्रकारचे वातावरण तयार करून पुढे फारुकाबादहून लोहियांना लोकसभेवर निवडून आणले.

ऑगस्ट १९६३ मध्ये कानपूरला उत्तर प्रदेशातील जनसंघ कार्यकर्त्यांचे पाच दिवसांचे शिबीर घेण्याचे ठरविले होते. साडेसातशे स्त्री-पुरुष कार्यकर्ते शिबिरात होते. नानाजींनी लोहियांना एक संपूर्ण दिवस शिबिरात येऊन कार्यकर्त्यांना त्यांचे विचार समजावून सांगण्यास सुचवले. प्रथम लोहियांचा यावर विश्वासच बसेना; पण नंतर त्यांनी 'सध्या माझ्याबरोबर इलमी असतो!' असे सांगितले. त्यावर नानाजी कदाचित त्यांना येण्याचा आग्रह करणार नाहीत, असे त्यांना वाटले असावे. कारण इलमी त्यावेळी 'सियासतचा' प्रमुख संपादक होता. त्यावर नानाजींनी इलमीच्या येण्यावर आक्षेप न घेता त्यालाही अर्धा-एक तास भाषण करण्याची विनंती केली. डॉक्टर लोहिया त्या शिबिरात इलमीसह सकाळी साडेआठ ते रात्री दहापर्यंत राहिले. जाताना लोहिया म्हणाले, ''मला एक समजतंय, आतून कुठेतरी तुम्ही सारे जण सच्चे समाजवादी आहात. पं. दीनदयालजींपासून सारे जण एकाच ठिकाणी एका प्रकारचे जेवण घेता, आपापली ताटवाटी धुता, एकाच प्रकारच्या अंथरुणावर झोपता. माझ्या लक्षात हे सारे आले आहे. मलाच नव्हे तर इलमीलासुद्धा असेच वाटते. आपण सारे मिळून एकच लढाई लढणार आहोत. तेव्हा इथून पुढे आपण एकत्रच काम करणार आहोत.''

सत्ताधाऱ्यांचा विरोध करायचा असेल तर विरोधकांनी एकत्र आले पाहिजे, विभाजन टाळले पाहिजे याची जाणीव नेहमी करून देणारे धुरीण म्हणून नानाजींचे नाव घेतले जाईल यात कोणालाही शंका उरली नाही.

या देशातले राजकारण असेच पुढे सरकत होते. लोहिया आणि नानाजी हे राजकारणातले मित्र या ना त्या रूपाने जनमान्यता मिळवत होते. त्यांच्या राजकीय चातुर्यामुळेच नानाजींना भारतीय राजकारणामधील चाणक्य म्हणून ओळखले

जाऊ लागले. चाणक्याने मगध प्रदेशातील नंद घराण्याची सत्ता उलथवून पाटलीपुत्राच्या सिंहासनावर चंद्रगुप्त मौर्याला बसविले आणि स्वत: सत्तेपासून दूर राहून उत्तम राज्यकारभार कसा करावा हे सांगणारे 'कौटिलीय अर्थशास्त्र' लिहिले. शिवाय नंदाचा पराभव झाल्यावर धनानंद या नंद राजाचा प्रधान सचिव असलेल्या व्यक्तीला चंद्रगुप्ताचा प्रधान सचिव होण्यासाठी पाचारण केले व तसे घडविले. ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. विरोधकांनाही जवळ करावे ही चाणक्य नीती आहे आणि हीच नीती नानाजींनीही अमलात आणली. अशा प्रकारच्या राजकीय अभिसरणाचा यशस्वी प्रारंभ आणि प्रयोग ३०-४० वर्षांपूर्वी नानाजींनी केला, हे नानाजींचे खास वैशिष्ट्य मानले पाहिजे. राजकीय क्षेत्रातली अस्पृश्यता नष्ट करून भिन्न विचारसरणींच्या, भिन्न व्यासपीठांवरच्या; पण तरीही अल्प का होईना समान तत्त्वाचा धागा पकडणाऱ्या अनेकांना एकत्र आणण्यात नानाजींना यश मिळाले. भारतीय राजकारणाची दिशाच त्यामुळे बदलली गेली.

जनसंघाची स्थापना झाल्यानंतर थोड्याच दिवसांत डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्याकडून संघाने त्यांच्याकडे सोपवलेल्या सर्व कार्यकर्त्यांविषयी प्रशंसोद्‌गारच ऐकायला मिळत होते. जनादेश जिंकण्याचा डॉ. मुखर्जींना एक विश्वास प्राप्त झाला होता; पण दैवी योजना काही वेगळीच होती. जनसंघाची स्थापना झाल्यावर अवघ्या दोन-अडीच वर्षांतच डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा काश्मीरमध्ये सत्याग्रहाच्या वेळी बळी घेतला गेला. डॉ. मुखर्जी यांच्या निधनानंतर अध्यक्षपद अर्थातच पं. दीनदयालजींकडे आले. त्यामुळे जनसंघामध्ये पंडितजींचे निकटवर्तीय म्हणून नानाजींचे महत्त्व वाढले. पंडितजींची हत्या झाल्यावर अवघड स्थितीतून पक्षाला बाहेर काढण्याची नवी चेतना देण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी नानाजींना करावी लागली होती. पं. दीनदयालजींच्या मृत्यूने लोकसभेतील रिक्त झालेल्या जागेसाठी पोटनिवडणूक घेण्यात आली. डॉ. राममनोहर लोहिया यांच्यासाठी दिवसरात्र काम करून त्यांना जिंकून देण्यात नानाजींनी मोलाची भूमिका वठवली.

उत्तर प्रदेशाचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. चंद्रभानू गुप्ता यांच्यासारख्या प्रचंड राजकीय दबदबा असलेल्या व्यक्तीला त्यांच्या राजकीय कारकीर्दीला तडा जाईल अशा आव्हानांना तोंड द्यावे लागले, याचे कारण होते केवळ नानाजी. नानाजींनी आपल्या राजकीय चातुर्याने श्री. चंद्रभानू गुप्ता या काँग्रेस पक्षाच्या मुख्यमंत्र्याला तीन वेळेस हरविले. दोनदा श्री. चंद्रभानू गुप्ता स्वत: हरले, तर एकदा त्यांनी पाठिंबा दिलेल्या उमेदवाराला हार पत्करावी लागली. त्याचे विवरण असे-

१. १९६७ च्या निवडणुकीत लखनौ मतदारसंघातून श्री. चंद्रभानू गुप्ता यांच्याविरुद्ध नानाजींनी श्री. बाबू त्रिलोकसिंह यांना उभे करून मताधिक्याने निवडून आणले.

२. राज्यसभेसाठी श्री. चंद्रभानू गुप्ता यांनी काँग्रेसतर्फे उभ्या करण्यात आलेल्या प्रसिद्ध उद्योगपतीस पाठिंबा दिला होता. नानाजींनी त्यांच्या विरुद्ध उभ्या असलेल्या उमेदवाराचा प्रचार करून त्यास निवडून आणले.

३. श्री. चंद्रभानू गुप्तांना स्वत:ला उत्तर प्रदेशातील निवडणुकीच्या वेळी मुंडवा येथून हार पत्करावी लागली. या तिन्ही निवडणुकांच्या वेळी त्यांनी समाजवादी पक्षाची मदत घेऊनच आपले इप्सित साध्य करून घेतले होते. श्री. चंद्रभानू गुप्तांना इतक्या वेळा नानाजींमुळे अपयश येऊनही ते नानाजींचे प्रचंड चाहते होते. ते त्यांना 'नानाजी फडणवीस' म्हणत!

श्री. लालबहादूर शास्त्री पंतप्रधान असतानाचा एक किस्सा नानाजी सांगत असत. मुस्लिमांच्या तुष्टीकरणाकरिता बनारस हिंदू विश्वविद्यालयाचे नाव बदलण्याचा काँग्रेसमध्ये घाट घातला जात होता. त्यावेळी श्री. गुरुजींनी लालबहादूर शास्त्रींची भेट घेण्याचे नानाजींना सांगितले. शास्त्रीजींचे मित्र असल्यामुळे नानाजींनी नामांतराचा विरोध करणाऱ्यांच्या वतीने शिष्टाई केली. शास्त्रीजींनी नानाजींना शब्द दिला, 'माझ्या जीवात जीव असेपर्यंत बनारस हिंदू विश्वविद्यालयाचे नाव बदलू दिले जाणार नाही.' अशा प्रकारे नानाजींची शिष्टाई यशस्वी झाली.

१९७७ पासून संयुक्त विधायक दलाच्या संकल्पनेतून केंद्रात सरकार गठित होण्याचे बीजारोपण नानाजींनी केले. १९६७ मध्ये हा प्रयोग यशस्वी झाला नसता तर १९७७, ८९ आणि ९८ सालातील सत्तेचे परिवर्तन झाले नसते. नानाजी हेच १९६७ च्या सरकारचे शिल्पकार होते. नानाजींची राजकारणातील ठळक ओळख म्हणजे काँग्रेस पक्षाव्यतिरिक्त समाजवादी चळवळीतील धुरिणांना एकत्र आणून जनता पक्षाची स्थापना. उत्तर प्रदेशात जनसंघाने जी झेप घेतली होती त्याचे श्रेय दीनदयालजींचे मार्गदर्शन, अटलजींचे वक्तृत्व आणि नानाजींचे संघटनकौशल्य यांना जाते.

उत्तर प्रदेशात नानाजींनी समविचारी पक्षांची एकजूट घडवून आणली आणि काँग्रेसचा पराभव केला. जे राजकीय गणितांनी करता येणार नसेल त्यासाठी सामाजिक चळवळीला गती देणे आवश्यक आहे हे मर्म त्यांनी ओळखले होते. हे लक्षात घेऊन त्यांनी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण

क्रांतीची चळवळ उभी करण्यात पुढाकार घेतला. कार्यकर्ता हा संघटनेच्या प्रतिभेचा वाहक असावा हे संघटनशास्त्रात सांगितले आहे. नानाजी देशमुख हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण होत. त्यांनी जयप्रकाश नारायण यांच्यावर इतका प्रभाव टाकला होता की 'जनसंघ फॅसिस्ट असेल तर मीही फॅसिस्ट आहे!' असे जयप्रकाश नारायण म्हणत.

१९६७ मध्ये अनेक राज्यांत काँग्रेसचा पराभव झाला. तरीपण विरोधी पक्षाला नि:संदिग्ध कौल मिळाला नव्हता. त्यामुळे जनसंघ द्विधावस्थेत सापडला. जनतेचा कौल ग्राह्य मानून विरोधी पक्षाबरोबर सरकार बनवायचे तर कम्युनिस्टांबरोबर मंत्रिमंडळात सहभागी होणे आवश्यक होते. यावेळी नानाजींनी निर्णायक भूमिका बजावली. जनसंघाने जर सत्तेत भाग घेतला नाही तर कम्युनिस्ट पक्ष त्याचा गैरफायदा घेईल, असा इशारा त्यांनी दिला. म्हणूनच जनसंघ संयुक्त विधायक दलाचा एक घटक बनला आणि तो प्रयोग यशस्वी झाला. श्री. चौधरी चरणसिंग यांना मुख्यमंत्रिपदावर बसविण्यात नानाजींनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यावेळेस नानाजी जनसंघाचे अखिल भारतीय संघटनमंत्री होते.

भारतीय जनसंघाच्या संस्था पातळीवरील कार्यक्रम आणि उपक्रमांची गुरुकिल्ली म्हणजे नानाजी देशमुख. कार्यकर्त्यांच्या कामकाजाची रूपरेषा आखण्यात आणि तिची अंमलबजावणी करण्यात त्यांचा हातखंडा होता. आपली सर्व शक्ती आणि कौशल्य ते पक्षासाठी पणास लावत. जनसंघाच्या तात्त्विक विरोधात बोलायलाही ते कचरत नसत. कट्टर पक्षाभिमानी असूनही कधी कधी वैचारिक विरोधात आवाज उठवायला ते कमी करीत नसत. अर्थात, राष्ट्रहित हीच त्या विरोधामागील प्रेरणा असे. १९७३ मध्ये बंगळुरू येथील 'दी इंडियन एक्स्प्रेस'च्या कार्यालयात श्री. रामनाथ गोयंका, नानाजी देशमुख, ख्यातनाम कवी रामधारीसिंग 'दिनकर' आणि १९४२ च्या ब्रिटिशांविरुद्धच्या भूमिगत चळवळीतील महान नेते श्री. अच्युतराव पटवर्धन यांची एक गुप्त बैठक झाली. या चर्चेचा विषय होता इंदिरा गांधी!

तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी प्रस्थापित लोकशाहीची मूल्ये पायदळी तुडवत आहेत, त्या अनियंत्रित होण्याच्या तयारीत आहेत, भारतीय न्यायसंस्थेला त्या आव्हान देण्याच्या विचारांत आहेत इत्यादी गोष्टी तेव्हा स्पष्ट होऊ लागल्या होत्या. त्यामुळे त्या चर्चेचा निष्कर्ष असा निघाला की, इंदिराजींची ही हुकूमशाही मानायची नाही.

याचदरम्यान सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या शासनविषयक धोरणांविरुद्ध देशातील इतर पक्षांमध्ये असंतोष धुमसत होता. या असंतोषाचा उद्रेक बिहार चळवळीच्या रूपाने झाला. बिहार चळवळ ही स्वतंत्र भारतातील सर्वांत मोठी आणि ऐतिहासिक क्रांतिकारी चळवळ होय. या चळवळीचे बरेचसे श्रेय नानाजींना जाते. श्री. रामनाथ गोयंका आणि नानाजी देशमुख या दोघांनी १९७४ मध्ये बिहार चळवळीचे नेतृत्व करण्यासाठी जयप्रकाश नारायण यांचे मन वळवले होते. त्या वयातही जयप्रकाशजींचा आत्मविश्वास त्यांना फारच कौतुकास्पद वाटत असे.

सुरुवातीला बिहार चळवळीचे नेतृत्व करायला जयप्रकाशजी नारायण फारसे उत्सुक नव्हते. एक तर ते मधुमेहाने आजारी असत आणि दुसरे म्हणजे मूत्रपिंडाच्या विकारामुळे ते त्रस्त झाले होते. त्यांना असे वाटायचे की, आपण लवकरच या जगाचा निरोप घेणार आहोत, आपले अनारोग्य आपणास विधायक कार्यापासून परावृत्त करीत आहे. त्यामुळे या नव्या क्रांती आंदोलनाचे नेतृत्व करण्यास त्यांचा नेहमीच नकार असे.

श्री. रामनाथ गोयंका यांनी वेल्लोर येथे जयप्रकाशजींच्या मूत्रपिंडाच्या विकारावर शस्त्रक्रिया करवून घेण्यात पुढाकार घेतला. तरीही जयप्रकाशजींचा नेतृत्व करण्याबाबतचा अंतिम निर्णय होत नव्हता. श्री. रामनाथजींनी नानाजींना घेऊन तिरुपती बालाजीला जाण्याचे ठरवले. तेथून तत्कालीन मद्रास शहरात येऊन त्यांनी आपल्या मूळ विधायक कार्यावर चर्चा करण्याचे ठरवून ठेवले. हिंदीतील प्रसिद्ध कवी रामधारी सिंह 'दिनकर' हे इंदिरा गांधींचे अगदी निकटचे मित्र होते. रामधारी सिंह 'दिनकर' हे नेहरू कुटुंबियांचे जवळचे मित्र असूनही त्यांनी नानाजींना साथ दिली. कारण या कविराजाला अशी खात्री होती, की आपण जे काही करीत आहोत ते राष्ट्रहिताचेच आहे.

तिरुपती येथील व्यंकटेश मंदिरात प्रकटपणे प्रार्थना करताना रामधारी सिंह 'दिनकर' यांनी जयप्रकाशजींना नेतृत्व करण्याची प्रेरणा मिळावी असे साकडे तिरुपतीकडे घातले. इतकेच नाही तर आपले उर्वरित आयुष्यही जयप्रकाशजींना मिळावे जेणेकरून त्यांना विधायक आणि व्यापक राष्ट्रकार्य करण्यासाठी भरपूर आयुष्य मिळेल अशी मनोकामना व्यक्त केली.

देवाची आळवणी करून ही मित्रमंडळी चेन्नईला आली. चेन्नई शहरातील माऊंट रोडवरील एक्स्प्रेस इस्टेटच्या निवासस्थानात श्री. रामनाथ गोयंकांसह सर्व मंडळी काही दिवस राहिली. दुर्दैवी योगायोग म्हणजे येथील वास्तव्यात एके

दिवशी कविराज रामधारी सिंह 'दिनकर' यांनी रामनाथ गोयंका यांच्या मांडीवर प्राण सोडला. यावेळी अच्युतराव पटवर्धन आणि नानाजी त्यांच्या जवळ बसलेले होते. 'दिनकर' यांची प्रार्थना तिरुपतीच्या बालाजीने ऐकली असाच याचा अर्थ होता. असंभवनीय वाटणाऱ्या या प्रसंगानंतर जयप्रकाश नारायण यांनी बिहार चळवळीचे नेतृत्व करण्याचे मान्य केले नसते तरच नवल. अनेकांनी विनंती करूनही हा प्रसंग 'इंडियन एक्स्प्रेस'मध्ये लिहिण्यास नानाजींनी नकार दिला. मग भारतीय जनतेला हे कसे कळणार? असा प्रश्न केल्यावर, 'आपण ही घटना दैनंदिनीमध्ये नमूद केली आहे. आपल्या मृत्यूनंतरच ती लोकांपुढे यावी, असे आपल्याला वाटते', असे उत्तर नानाजींनी दिले. नानाजी आता हयात नसल्याने त्यांच्या दैनंदिनीतील हा किस्सा अशा प्रकारे प्रकाशात आला.

जयप्रकाशजींनी प्रोस्टेटची शस्त्रक्रिया झाल्यानंतर दि. २ जून १९७४ रोजी पूर्ण शक्तीसह युवा आंदोलनात उडी घेतली आणि संपूर्ण क्रांतीचा आदर्श दिला. दि. ३, ४, ५ ऑक्टोबर १९७४ हे ३ दिवस बिहार बंदचे आवाहन केले. त्यावेळी नानाजींनी मोटरसायकलवर पूर्ण बिहारचा दौरा केला. ज्यामुळे बंद सफल झाला.

४ नोव्हेंबर १९७४ रोजी बिहार सचिवालयाला घेराव घातला. नानाजी पुन्हा बिहारच्या दौऱ्यावर जनजागरणासाठी गेले.

३० ऑक्टोबर १९७४ रोजी सकाळी सासाराम येथे जनसभेला पोलिसांनी घेरले. सभा चालूच होती. नंतर ते एका कार्यकर्त्याच्या घरी भोजनासाठी गेले. तेथेदेखील पोलीस दल पोहोचले. डीएसपींनी नानाजींना बिहारमध्ये प्रवेश बंदी लागू केल्याचे सांगितले. मला तुम्हाला बिहारच्या सीमेपलीकडे सोडण्यास सांगण्यात आले आहे; परंतु या घरच्या स्त्रियांनी जेवण केल्याशिवाय जाऊ दिले नाही. तेथे पुष्कळ गर्दी जमा झाली. त्यांनी मिरवणूक काढून नानाजींना निरोप दिला. नानाजी म्हणाले '४ नोव्हेंबर को मिलेंगे', त्यावर जिल्हाधीश म्हणाले की, 'आपका फोटो हर एक थाने में भेज दिया गया है । आप पटना कभी नहीं पहुचेंगे ।।' ४ नोव्हेंबरला नानाजी पोस्टमनच्या वेशात आर. एम. एस.च्या डब्यात बसून पटना येथे दाखल झाले. मिरवणुकीत नानाजींना बरोबर पाहून कार्यकर्ते आश्चर्यचकित झाले. कधी पायी तर कधी जीपमध्ये त्यांच्या बरोबर नानाजी होते. त्यांनी पाहिले की एक सीआरपीएफचा जवान जयप्रकाश नारायण यांच्या डोक्यावर लाठी मारत आहे. नानाजींनी उडी मारून त्या काठीचा मार स्वतःच्या हातावर घेतला. नानाजी

थोडेसे जरी चुकले असते तर? केवळ त्यांच्या पायाला मार लागला व ते मूर्च्छित होऊन पडले. नंतर त्यांना व नानाजींना पोलिसांनी अटक केली.

लोकनायक जयप्रकाशजींनी बिहारमध्ये भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलनाचे नेतृत्व स्वीकारले होते. त्या आंदोलनासाठी आवश्यक असणारी संघटनात्मक ताकद कोणत्याही गोष्टीची अपेक्षा न करता नानाजी आणि मंडळींनी प्रामाणिकपणे त्यांना दिली. त्यामुळे नानाजी जयप्रकाशजींच्या अधिक निकट आले. एक विलक्षण प्रतिभाशाली, बुद्धिमान, देशप्रेमाने ओतप्रोत भारलेले; पण तेवढेच भावनाप्रधान आणि हळवे व्यक्तिमत्त्व नानाजींना जवळून बघायला मिळाले. जयप्रकाशजींच्या पत्नी प्रभादेवी कॅन्सरने आजारी असताना त्यांच्या उपचाराच्या वेळी नानाजींनी केलेल्या मदतीमुळे जयप्रकाशजीही नानाजींच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालेले होते. त्याचदरम्यान गुजरातेत नवनिर्माण आंदोलन सुरू होते. त्या आंदोलनात भाषण देण्यासाठी जयप्रकाशजींना न्यायचे होते. लोकनायक जयप्रकाशजी खूप मोठे लोकनेते होते; पण त्यांना संघटनेचे पाठबळ नव्हते. ते नसेल तर फारशा मोठ्या सभा घेता येत नाहीत हे नानाजींना ठाऊक होते. त्यावेळी नानाजींनी आपल्या संघटनकौशल्याचा वापर केला. पत्रके, भित्तिपत्रके यांचा उपयोग केला. जयप्रकाशजी अहमदाबाद विमानतळावर उतरले तेव्हा किमान एक हजार मोटारी, स्कूटर्स तेथे उभ्या होत्या. ती प्रचंड गर्दी आणि प्रतिसाद पाहून जयप्रकाशजींमधला भावनाप्रधान माणूस गलबलून गेला. 'मुझे तो सन १९४२ की याद आती है ।' असे ते पुन्हा-पुन्हा म्हणत राहिले.

सत्तारूढ पक्षाची आणीबाणी लागू करण्याची मानसिकता नानाजींनी जणू आधीच ओळखली होती. म्हणून त्यांनी Seminar On Emergency In The Constitution Democracy या विषयावर दीनदयाल रिसर्च इन्स्टिट्यूट, नवी दिल्ली येथे १५ व १६ मार्च १९७५ रोजी कार्यशाळा आयोजित केली होती.

ही घटना आहे १२ जून १९७५ ची. गुजरातमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन जोरात सुरू होते. संघटना काँग्रेसचे नेते श्री. मोरारजी देसाई उपोषणाला बसले होते. त्याच दिवशी अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्याविरुद्ध लागला होता. श्रीमती इंदिरा गांधींचे लोकसभा सदस्यत्वही रद्द करण्यात आले होते. कोर्टाच्या निर्णयाविरुद्ध इंदिराजींनी निदर्शने घडवून आणली. न्यायालयाचा निकाल झुगारून त्या आणीबाणी आणणार असे सर्वांना वाटत होते. त्या दिवशी संघटना काँग्रेसच्या कार्यकारिणीची सभा चाळीसगावला,

संयुक्त समाजवादी पक्षाची बैठक पुण्याला, तर जनसंघाचे अधिवेशन अजमेरला सुरू होते. योगायोगाने नानाजी त्या अधिवेशनाला न जाता दिल्लीतच होते. १३ जूनच्या सकाळी नानाजी, रवी रे, संघटना काँग्रेसचे सिकंदर बख्त आणि स्वतंत्र पार्टीचे पिलू मोदी एकत्र जमले. आपापल्या पक्षाच्या नेत्यांना तारा करून लगेच बोलावून घ्यायचे ठरवले. या चार जणांनी राष्ट्रपती भवनासमोर धरणे धरले. हे चौघेही आपापल्या पक्षाचे मान्यवर पदाधिकारी होते. नानाजी जनसंघाचे महामंत्री, श्री. सिकंदर बख्त पक्षाचे सरचिटणीस आणि श्री. पिलू मोदी स्वतंत्र पार्टीचे होते. या साऱ्यांनी मिळून 'लोक संघर्ष समिती' स्थापन केली. नानाजींनी या समितीच्या अध्यक्षपदासाठी मोरारजी देसाईंचे नाव सुचवले आणि श्री. बिजू पटनाईक यांनी नानाजींच्या सांगण्यावरून त्याला पाठिंबा दिला. नंतर सर्वानुमते नानाजी सरचिटणीस आणि श्री. अशोक मेहता कोषाध्यक्ष झाले. २५ जूनला दिल्लीच्या रामलीला मैदानावर एक भव्य सभा झाली. त्या सभेत फक्त तीन जणांनी भाषणे केली. पहिले लोकनायक जयप्रकाशजी नारायण, दुसरे मोरारजी देसाई आणि तिसरे होते नानाजी देशमुख.

२५ जूनला रामलीला मैदानावर भाषण करताना इंदिरा गांधींना पंतप्रधानपदावरून हटविण्यासाठी २९ जूनपासून देशव्यापी आंदोलनाचा कार्यक्रम घोषित केला. कार्यक्रमानंतर नानाजी राजमाता सिंधियाजी यांना निरोप देण्यासाठी नवी दिल्ली रेल्वे स्टेशनवर गेले. ते प्लॅटफॉर्मवर फिरत असताना त्यांना गुप्तचर विभागाच्या एका अधिकाऱ्याने हळूच येऊन कानात सांगितले की, आणीबाणीची घोषणा होणार आहे आणि सर्व नेत्यांना अटक होणार आहे तरी तुम्ही येथून लवकर निघून जा. नानाजी स्टेशनवरूनच भूमिगत झाले.

या काळात इंदिराजींनी सर्वंकष सत्ताधारी होण्याचा डाव रचला होता. कारण निकाल त्यांच्याविरुद्ध लागला होता. त्यामुळे २६ जून १९७५ रोजी इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी जाहीर केली. नानाजींना आणीबाणीची सूचना आधीच मिळाली होती. जयप्रकाशजींच्या सांगण्यावरून बहुदलीय लोकसंघर्ष समितीच्या महासचिवपदाची जबाबदारी नानाजींनी स्वीकारली. आणीबाणीविरुद्ध संघर्षाचा बिगुल वाजवला गेला आणि नानाजी भूमिगत झाले. त्यावेळेस त्यांनी प्रसिद्ध लेखक, तत्कालीन दीनदयाल शोध संस्थानचे उपाध्यक्ष श्री. देवेंद्रजी यांची भूमिगत बुलेटीनच्या संपादकपदी नियुक्ती केली. ४ जुलैच्या संध्याकाळच्या वेळेस राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली गेली. त्याच दिवशी नानाजींनी

देवेंद्र यांच्या घरी भूमिगत नेत्यांची एक बैठक बोलावली होती. जनता पार्टीचे नेते श्री. सुब्रह्मण्यम स्वामी या बैठकीला हजर होते. भारतातच नव्हे, तर सर्व जगात कुप्रसिद्ध ठरलेल्या या आणीबाणीच्या काळात एक प्रकारचे भीतीचे वातावरण होते. या काळात सर्व विरोधी राजकीय नेते, संघ स्वयंसेवक आणि कार्यकर्त्यांची धरपकड सुरू झाली. नानाजीही भूमिगत झालेले होते. आणीबाणीच्या या कठीण काळात नानाजी सोन्यासारखे तावून-सुलाखून निघाले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू प्रकाशात आले. सहकार्य, मदत, मार्गदर्शन, त्याग, निष्ठा आणि अन्यायाचा प्रतिकार असे त्यांच्यातील विविध गुण प्रकट झाले.

आणीबाणीच्या काळात अटक चुकविण्यासाठी नानाजींनी आपला चेहरा आणि पेहराव यामध्ये मोठा फरक घडवून आणला. आपला नेहमीचा धोती-कुर्ता हा पारंपरिक पोशाख टाकून त्यांनी बुशशर्ट आणि पायजमा असा पोशाख केला. त्यांनी भरदार मिशा वाढवल्या. केसांना कलप लावून काळेभोर केले आणि चष्मासुद्धा बदलला. आणीबाणीच्या काळातही ते दिल्लीच्या सफदरजंग डेव्हलपमेंट परिसरात निर्भयपणे वावरत असत. त्यांच्या घरमालकालासुद्धा त्यांची खरी ओळख पटत नसे. कोणत्याही प्रकारच्या अभिनिवेशापासून दूर असलेल्या नानाजींनी आणीबाणीमध्ये विविध विचारांच्या राजकीय नेत्यांच्या सतत संपर्कात राहून भूमिगत चळवळ संघटित केली. त्या चळवळीचे ते महामंत्री होते. त्यांच्या भूमिगत होण्यामुळे इंदिरा गांधींची अस्वस्थता वाढली. जोपर्यंत नानाजींना अटक होत नाही तोपर्यंत त्यांचे भूमिगत कार्य जोरात चालू राहणार आणि ते आपल्याविरुद्ध जनतेत असंतोष पसरवणार, हे त्या जाणून होत्या. भूमिगत राहून संघटनात्मक कार्य करण्यासाठी नानाजींनी भारतभर प्रवास केला. वेगवेगळ्या ठिकाणचा मुक्काम त्यांच्या राजकीय सहकाऱ्यांनी, कार्यकर्त्यांनी ठरवलेला असे. भूमिगत राहून आणीबाणीविरुद्ध पत्रके वाटणे, तुरुंगात स्थानबद्ध करून ठेवलेल्या डाव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्यांच्या कुटुंबियांना थोर मनाने आर्थिक मदत करण्याचे गुप्त संदेश देणे अशा प्रकारची कामे ते करीत असत.

संघाचे स्वयंसेवक झापडबंद नसल्यामुळे कोणत्याही चांगल्या कार्यात सहभागी होण्याला संघाचा विरोध नसतो. वैर तर नसतेच नसते. प्रत्यक्ष संघाचे संस्थापक प.पू. डॉ. हेडगेवार यांनीही १९३० मध्ये गांधीजींनी पुकारलेल्या कायदेभंगाच्या आंदोलनात भाग घेतला होता. गांधीजींनी मिठासाठी सत्याग्रह केला होता. विदर्भात जंगल सत्याग्रह होता आणि डॉ. हेडगेवारांनी त्या सत्याग्रहात भाग घेऊन

कारावासही भोगला होता. तसेच पुढे संघाचे कार्यकर्ते विनोबांच्या भूदान चळवळीतही होते. नानाजींनी विनोबांजींच्या भूदान चळवळीत दोन महिने काम केले व ते त्या कामामुळे प्रभावित झाले आणि जयप्रकाश नारायण यांच्या नवनिर्माण कार्यात विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातूनही त्यांनी सक्रिय भाग घेतला होता.

आणीबाणीच्या काळात नानाजी भूमिगत असतानाच अकोला तरुण भारतचे तत्कालीन संपादक श्री. मा.गो. वैद्य यांनी लिहिलेला हा किस्सा. ते लिहितात - ''आणीबाणी घोषित झाल्यावर संघावर बंदी आली तरी मला लगेच पकडण्यात आले नाही. बऱ्याच उशिरा म्हणजे तीन महिन्यांनंतर 'मिसा'ची नजर माझ्याकडे वळली. भूमिगत अन् वेशांतर केलेल्या नानाजींचा मला दूरध्वनी आला की, मी त्यांना भेटायला हवे. भेट माझ्या घरी आणि तरुण भारतच्या कचेरीतही नाही असे ठरले. त्यांचे दुपारचे भोजन आटोपायचे होते आणि भोजन करता करताच बोलायचे होते. रामदास पेठेतील एक घर भेटीसाठी ठरवले. घरमालक अर्थातच संघ स्वयंसेवक होते. मी नानाजींना ते घर सांगितले. रामदास पेठेच्या मुख्य रस्त्यावरच ते घर होते. त्या घरासमोर मी उभा राहीन, असे त्यांना सांगितले; पण नानाजी तेथे आले तेव्हा त्यांना मी तेथे दिसलो नाही म्हणून ते तरुण भारतच्या कार्यालयाकडे चालत येऊ लागले. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने मी स्कूटरने निघालो. नानाजींनी हात दाखवून खूण केली. मीही नित्याची खूण समजून आपला हात वर उंचावला व पुढे निघालो. तेव्हा त्यांनी आवाज दिला 'ओ, बाबूराव!' मी थांबलो. आवाजावरून मी त्यांना ओळखले. पँट, बुशशर्ट, डोक्याचे काळे केस, हातात आधुनिक व्यापारी प्रतिनिधी घेतात तशी बॅग असा त्यांचा अवतार होता. मी त्यांच्या जवळ गेलो. त्यांना स्कूटरवर बसायला सांगितले, त्यांनी नकार दिला. ते पायीच आले. ज्या घरी त्यांच्या जेवणाची व्यवस्था केली होती त्या घरमालकाला अगोदरच सांगितले होते की, नानाजी देशमुख येणार आहेत. ते जेवतील त्या खोलीत आम्ही दोघेच असू. ताटात एकदाच वाढलेले असावे. पुन्हा वाढायला कोणीही येऊ नये. मी स्कूटरवर असल्यामुळे अगोदर पोहोचलो. माडीवरची ती खोली, तिथली व्यवस्था, वाढलेले ताट आणून ठेवलेले हे सर्व बघितले. ठरल्याप्रमाणे सुमारे अर्धा तास आमचे बोलणे झाले. प्रथम नानाजी बाहेर पडले आणि नंतर मी. मी जाताना घरमालकाला भेटलो तेव्हा त्यांनी प्रश्न केला, 'नानाजी येणार होते, त्याचे काय झाले?' मी म्हणालो, 'आता तुमच्या समोरून गेले तेच नानाजी होते.' त्यांनी आश्चर्याने तोंडात बोट घातले. नानाजींनी असे

बेमालूम वेशांतर केले होते.''

दीनदयाल शोध संस्थानचे तत्कालीन सचिव डॉ. जितेंद्रकुमार जैन यांच्या सुविद्य पत्नी डॉ. रागिणी जैन त्या काळात नानाजींच्या कारचालकाचे काम करीत असत. डॉ. रागिणींचा आदर्श समस्त स्त्रीवर्गाने घ्यावा, असे नानाजी आग्रहाने सांगत. गरोदरपण, बाळंतपण याचा प्रसंगविशेषी अनावश्यक बाऊ करू नये असे त्यांचे मत. तिला चालकाचे काम देण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पोलीस सर्व गाड्या अडवायचे, तपासायचे. अनेकांविरुद्ध वॉरंट निघाले होते. महिला चालक पाहून पोलीस त्यांना सोडून द्यायचे आणि नानाजी सहीसलामत सुटायचे. नानाजींना पकडण्यासाठी पोलीस जिवाचे रान करीत होते. दीर्घकाळ भूमिगत राहून नानाजींनी संघर्षाची चळवळ यशस्वी केली. नानाजींना जोवर अटक झाली नव्हती तोवर इंदिराजींना निवांत झोप लागत नव्हती, एवढा नानाजींच्या संघटनकौशल्याचा धसका त्यांनी घेतला होता. नानाजी काहीही करू शकतात असा दबदबा नानाजींनी आपल्या संघटनकौशल्यातून निर्माण केला होता. हाती कोणतेही सत्तेचे पद नसलेल्या व त्या स्पर्धेतही नसलेल्या एखाद्या व्यक्तीला सत्ताधीशाने एवढे घाबरावे, यातच नानाजींच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख पटते. नसानसांत भरलेल्या राष्ट्रभक्तीमुळे आणि अखंड कर्मशीलतेमुळे देशभरातील सर्वदूर भागांत विविध स्तरांवर निर्मिलेला व्यापक संपर्क आणि त्यांच्या जवळ असलेली स्वतंत्र प्रतिभाशक्ती यामुळे त्यांनी स्वत:ची अशी एक ओळख निर्माण केली होती. भूमिगत झाल्यापासून रोज बातम्यांतून त्यांच्या नावाचा घोष व्हायचा की, नानाजी अजून सापडले नाहीत आणि त्यांच्यावर पकड वॉरंट काढलेले आहे. सर्व वरिष्ठ नेत्यांनी नानाजींना अटक करवून घेण्यास सांगितले. राजकीय द्वेषामुळे नानाजींना संपविले जाईल की काय, अशी त्या सर्वांना भीती वाटत होती. म्हणूनच त्यांनी नानाजींना अटक करवून घेण्याची सूचना केली. किशनलाल शर्मा नावाचे जनसंघाचे एक कार्यकर्ते त्यांच्या सहकाऱ्यांसह नानाजींना भेटायला आले होते. पंजाब राज्याच्या गुप्तहेर खात्याच्या अधिकाऱ्यांनी त्यांचा मोठ्या चातुर्याने पाठलाग केला. दिल्ली पोलिसांनी नानाजींचे गुप्त ठिकाण शोधून काढले आणि तिथे असलेल्या त्या अनोळखी गृहस्थाला पोलीस ठाण्यात नेण्यात आले. त्यांनी स्वत:ची ओळख जेव्हा 'नानाजी देशमुख' अशी करून दिली तेव्हा पोलिसांचा त्यावर विश्वास बसेना. त्यांना तो नानाजींचा बहुरूपी असावा असे वाटले. त्यांनी त्रास देण्याचा प्रयत्न केला; पण नानाजींनी इंदिराजींना फोन करण्याची धमकी

दिली तेव्हा पोलीस ताळ्यावर आले. त्यांनी लखनौ पोलिसांना पाचारण केले. पक्की खात्री पटल्यावर नानाजींना 'मिसा'खाली अटक करण्यात आली. त्यांना दिल्लीतील तिहार तुरुंगात वॉर्ड क्र. १७ मध्ये ठेवण्यात आले. याच 'मिसानगरी'मध्ये विभिन्न विचारसरणीचे लोक एकत्र आले आणि तिथल्या सहजीवनातून नानाजींचे अनेक लोकांबरोबर मैत्रीचे संबंध जुळले. या मैत्रीतूनच जनता पक्षाची निर्मिती झाली अन् पक्षाचे शिल्पकार ठरले नानाजी देशमुख.

तुरुंगात असताना आपल्या मूल्यांचे जतन करण्यासाठी ते धडपडत असत. उत्तम दर्जाच्या अन्नासाठी आग्रह धरण्यात नानाजी अग्रेसर असत. कोंडमारा झालेल्या अवस्थेतसुद्धा नानाजी शांत असत. ते भरपूर वाचन करीत. राजकीय परिस्थितीचे चिकित्सक विश्लेषण करीत असत. तुरुंगातील या कालावधीचा उपयोग त्यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे केला. ग्रामविकासाविषयी सखोल वाचन त्यांनी याच काळात केले. महात्मा गांधींच्या ग्रामविकास कार्यक्रमांचे चिंतन आणि मनन केले. श्री. विनोबाजी आणि लोकनायक जयप्रकाशजी यांच्याशी केलेल्या चर्चेतूनच जनता पक्ष स्थापनेची मुहूर्तमेढ रोवली गेली. हासुद्धा तुरुंगातील वेळेचा नानाजींनी केलेला विलक्षण सदुपयोगच म्हणावा लागेल.

आणीबाणी लादून सर्वंकष सत्ता हाती घेण्याचे कृष्णकृत्य सफल होत नाही हे पाहून आपण मुळातच कसे लोकशाहीवादी आहोत असे लटके भासवून इंदिराजींनी देशात सार्वजनिक निवडणुका घेण्याचे घोषित केले. इंदिराजींनी ही चाल इतकी बेमालूम केली की, सरकारी गुप्तहेरांनादेखील त्यांनी या गोष्टीचा सुगावा लागू दिला नाही.

१९७७ ची निवडणूक जाहीर झाली. अन्य राजकीय कैद्यांना सोडण्यात आले; परंतु नानाजींना संघाचा कार्यकर्ता म्हणून सोडले नाही. कारण संघावर बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे श्री. रज्जूभय्या आणि लोकनायक श्री. जयप्रकाशजींनी नानाजींना निवडणूक लढवण्याचा आग्रह केला. लोकशाहीच्या जीवन-मरणाचा प्रश्न उभा ठाकला असताना नानाजींची सुटका होणे आवश्यक होते. सुटका व्हावी अशी स्वत:ची इच्छा नसताना केवळ श्री. रज्जूभय्या यांच्या आज्ञेवरून आणि इतरांच्या आग्रहाखातर नानाजींनी बलरामपूर येथून निवडणूक लढविली. निवडणुकीला उभे असताना त्यांनी चातुर्याने प्रचार केला. सर्व गावकऱ्यांवर उपकार करणाऱ्या, अडीअडचणीत प्रत्येकाला वेळेवर मदत करणाऱ्या राणी राजलक्ष्मीदेवी यांच्या विरोधात नानाजींनी फॉर्म भरला होता. त्यांच्या विरोधात

निवडून येणे सहजासहजी शक्य नव्हते. नानाजींनी आपल्या प्रचाराची दिशाच बदलली. प्रचारसभेत ते म्हणाले की, 'तुमच्या राणीला इंदिरा गांधींची दासी बनवायची असेल तर राणीला मते द्या आणि त्यांना निवडून द्या. राणीचा सन्मान राखायचा असेल तर मला मते द्या.' नानाजींची ही युक्ती कमालीची यशस्वी झाली. ते प्रचंड मतांनी विजयी झाले. प्रथमच लोकसभेत त्यांनी प्रवेश केला होता. तत्पूर्वी, नानाजींनी अशा उमेदवारीची अभिलाषा कधीही केली नव्हती. आपल्या पुरस्कृत उमेदवारांना निवडून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यातच त्यांना स्वारस्य होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पुढे गोंडा प्रकल्प सुरू करताना बलरामपूरच्या राणी राजलक्ष्मी देवी यांनी आपली जमीन प्रकल्पांसाठी रचनात्मक कार्य करण्यासाठी दान केली.

आणीबाणीतील मिसानगरीच्या सहजीवनातून आकाराला आलेल्या जनता पक्षाच्या स्थापनेतील नानाजींचा पुढाकार, त्यानंतरच्या सार्वत्रिक निवडणुकीतील त्यांची व्यूहरचना आणि ती कार्यान्वित करण्याची संघटित धडपड याची फलश्रुती म्हणजे जनता पक्षाला मिळालेले अभूतपूर्व यश. स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्यांदाच अस्तित्वात आलेले गैरकाँग्रेसी शासन आणि या सर्व घटनाक्रमांमधील नानाजींनी उचललेला वाटा विक्रमी आहे आणि म्हणूनच त्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वापुढे नतमस्तक व्हावे वाटते आणि त्यांच्याबद्दलचे कुतूहल वाढत जाते.

१९७७ मध्ये अनेक अडचणींवर मात करीत जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले. श्री. मोरारजीभाई देसाई पंतप्रधान झाले. श्री. जगजीवनराम यांनी मंत्रिमंडळात सामील होण्यास नकार दिला. पहिल्या दिवसापासूनच राजकीय खेळी सुरू झाली. राजकारणातील व्यक्तींची सत्तालोलुपता पुन्हा एकवार प्रत्ययास आली. जगजीवनराम आणि चौधरी चरणसिंग या दोघांनाही पंतप्रधान व्हायचे होते; पण मोरारजी पंतप्रधान झाल्यामुळे नाराज झालेल्या जगजीवनराम यांनी मंत्रिपद स्वीकारणार नसल्याचे जाहीर केले. मोरारजींनी नानाजींना जगजीवनराम यांचे मन वळवण्यास पाठवले. शिष्टाई करताना नानाजी जगजीवनराम यांना म्हणाले, 'बाबूजी, तुम्हीच पंतप्रधान व्हावे अशी आमची इच्छा आहे. तसे झाल्यास जनतेपुढे सामाजिक समरसतेचा धडा घालून दिल्यासारखे होईल; पण आणीबाणीचा प्रस्ताव तुम्हीच मांडला होता! आपले सरकार तर आणीबाणीविरोधात निवडून सत्तेवर आले आहे. यामुळे सध्यातरी तुम्ही पंतप्रधानपदावर हक्क सांगू नये.' नानाजींच्या या शिष्टाईमुळेच जगजीवनराम यांनी मंत्रिमंडळात सामील होऊन संरक्षण खाते स्वीकारले.

जनता पक्षाच्या स्थापनेत आणि १९७७ च्या निवडणुकीमध्ये भल्याभल्यांची भंबेरी उडवत उज्ज्वल यश संपादन केलेल्या नानाजींच्या कर्तृत्वाची दखल घेऊन पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांनी आपल्या पहिल्या मंत्रिमंडळात नानाजींना उद्योगमंत्री हे पद देण्याची घोषणा केली. नानाजींसारख्या सर्वांशी सहभावाने वागणाऱ्या अजातशत्रू व्यक्तीच्या समावेशाने अवघ्या देशालाही आनंद झाला; पण एवढ्या नेत्रदीपक यशानंतरही आपणहून चालत आलेले केंद्रीय मंत्रिपद नानाजींनी निरीच्छपणे नाकारले. याचा देशाला आश्चर्यपूर्ण अभिमानही वाटला. चांदीच्या तबकातून उद्योगमंत्रिपदाची महत्त्वाची जागा चालून आली असताना संघटनात्मक कामाची गरज लक्षात घेऊन नानाजींनी मंत्रिपदाला ठाम नकार दिला. मंत्रिपद नाकारण्याच्या त्यांच्या कृतीत केवळ त्यागवृत्ती होती.

नानाजी केवळ मंत्रिपद नाकारूनच थांबले नाहीत, तर त्यांनी ११ ऑक्टोबर १९७७ रोजी वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर राजकारणातून स्वेच्छेने निवृत्तीही घेतली. नानाजींची निवृत्तीची घोषणा राजकारणाच्या पराजयाच्या क्षणी नव्हे, तर विजयाच्या शिखरावर असताना आलेली होती.

जनता पक्षात अंतर्गत असंतोष सुरू झाला होता. प्रत्येक जण सत्तेसाठी अधीर दिसत होता. नानाजींना याचे खूप वाईट वाटत होते. त्यांच्या विचाराने राजकारणात तरुण मंडळींनी यायला हवे असे होते. त्यानुसार त्यांनी मोरारजीभाईंना तसे सुचवलेदेखील. तुम्ही पंतप्रधानपद एखाद्या तरुणाच्या हातात द्यावे, नाही तरी तुम्ही फार दिवस पंतप्रधानपदी राहणार नाहीत! या आशयाचे पत्रही त्यांनी पाठवले; पण सत्तेपुढे शहाणपण टिकत नाही याचा नानाजींनाही प्रत्यय आला. मोरारजींनी त्यांच्या पत्राची दखल घेतली नाही. त्या पत्रासंदर्भात चर्चा करायला नानाजी मोरारजींकडे गेले व श्री. राजनारायण आणि श्रीमती इंदिरा गांधींचे पुत्र काँग्रेसचे युवा नेते श्री. संजय गांधी एकमेकांजवळ येत असल्याचे, एकमेकांना भेटत असल्याचे सांगितले; पण मोरारजींचा त्यावर विश्वास बसला नाही. त्यांनी ती गोष्ट उडवून लावली. नानाजींनी परोपरीने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना यश आले नाही. योगायोग असा की, पुढे दोनच दिवसांनी संजय गांधी राजनारायणांच्या बंगल्यात जात असतानाचा फोटो वृत्तपत्रात छापून आला. फोटो पाहूनही मोरारजी निवांतच होते. त्यांच्या निर्णयात तसूभरही फरक पडला नाही. शेवटी २० एप्रिल १९७८ रोजी नानाजींनी वृत्तपरिषद घेतली आणि राजकारणातून संन्यास घेत असल्याची घोषणा केली.

पंतप्रधान असताना इंदिरा गांधींनी आपल्या अधिकारांचा गैरवापर करून राजकीय प्रतिस्पर्ध्यांना उपद्रव दिला. या कारणामुळे जनता दल सरकारने इंदिराजींवर खटले दाखल केले होते. एके दिवशी त्यांना अटकही करण्यात आली. इंदिरा गांधींना अटक झाल्याची बातमी सगळीकडे पसरली. त्याचे पडसाद उमटू लागले. महाराष्ट्रातील सातारा, सांगली व कोल्हापूर या जिल्ह्यांत इंदिरा गांधींच्या अटकेनिमित्ताने उसळलेल्या दंगलींचे केंद्र सांगली होते. ८ ते १० हजारांच्या गर्दीने सांगलीवर अक्षरश: चारीबाजूंनी हल्ला केला. सर्वत्र दगडफेक चालू होती. या घटनेचा वृत्तांत कार्यकर्त्यांकडून नानाजींना फोनवरून कळवण्यात आला.

दंगल आटोक्यात आणण्यासाठी केंद्रात सत्तेवर आलेल्या जनता दलाने उपाय योजावेत असेही सुचवण्यात आले. शेवटी तातडीची बैठक घेऊन पंतप्रधानांच्या आदेशानुसार चार खासदारांची एक तुकडी सांगलीतील दंगलग्रस्त भागाचा पाहणी दौरा करण्यासाठी आली. त्या तुकडीत नानाजी होते. सांगली, मिरज, इस्लामपूर, इचलकरंजी, कराड या सर्व ठिकाणी या नेत्यांनी पाहणी दौरा केला. दंगलग्रस्तांच्या भेटी घेतल्या. त्यांच्या व्यथा ऐकल्या. नानाजींचा हा दौरा झाल्यामुळे या भागातील समाजाला एक आश्वासन मिळाले की, आम्हाला देशपातळीवर कोणीतरी तारणहार आहे आणि त्या तारणहाराचे नाव आहे - नानाजी.

केंद्रातील जनता दल सरकार स्थापनेनंतर काही महिन्यांतच महाराष्ट्रामध्ये विधानसभेच्या निवडणुका झाल्या. राजकीय उलथापालथ होऊन शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुलोद सरकार स्थापन झाले. या सरकारात जनता पक्ष सामील झाला होता. आणीबाणीच्या कालखंडानंतर सांगली जिल्ह्याचे नेते व काही काळ महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष राहिलेले कै. राजाराम बापू पाटील यांनी सन्मानपूर्वक जनता दलात प्रवेश केला; परंतु निवडणूक हरलेले असल्यामुळे त्यांचा मंत्रिमंडळात प्रवेश होणे शक्य नव्हते. कार्यकर्त्यांनी नानाजींना गळ घातली आणि नानाजींच्या प्रयत्नांमुळे राजारामबापू पाटलांची मंत्रिमंडळात वर्णी लागली. योग्य वेळेवर कार्यकर्त्यांच्या शब्दाला प्रतिसाद देणारे नानाजी हे तर्कापलीकडील नेते होते.

१९७७-७९ च्या दरम्यान खासदार असताना नानाजी नांदेडला आले होते. बँक कर्मचारी त्यांना भेटावयास गेले असता पगारवाढीसाठी बँक संघटना संप करीत आहे हे नानाजींच्या लक्षात आले. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सेटलमेंट कधी होईल असे विचारले असताना नानाजींनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सरकारने भूतलिंगम कमिटीला अहवाल द्यायला सांगितला आहे. सरकारला 'समान काम, समान पगार'

हे धोरण लक्षात घेऊनच पोस्ट, बँक, रेल्वे, तहसील येथील कर्मचाऱ्यांचे वेतन कामाप्रमाणेच समान असावे असे वाटते. जोपर्यंत कमिटीचा अहवाल येत नाही तोपर्यंत सेटलमेंट होणार नाही. थोडक्यात, कमिटीने कोणत्या पद्धतीने काम करावे याची रूपरेषा नानाजींनी पक्षाच्या धोरणांतर्गत कमिटीला समजावून सांगितली होती. त्यावेळेस नानाजी जनता पक्षाचे सरचिटणीस होते.

काँग्रेसच्या राज्यात काहीही अघटित घडले की, त्याचे खापर संघावर अथवा विरोधी पक्षावर फोडले जाई, स्वयंसेवकांना जबाबदार धरले जाई. संजय गांधींच्या मृत्यूनंतर अनेक बातम्या बाहेर येत होत्या. हा अपघात आहे, असे बोलले जात होते. संजय गांधी यांचे साथीदार वैमानिक नानाजींचे घनिष्ठ मित्र होते. एवढा धागा पकडून काँग्रेसने नानाजींवर खुनाचा आरोप केला होता. अपघाताबाबत नानाजींची चौकशी झाली. त्या चौकशीतून काहीही निष्पन्न झाले नाही. नानाजी निर्दोष असल्याचे सिद्ध झाले. नानाजी या घटनेच्या वेळी गोंडा येथे कार्यरत होते. ते प्रसारमाध्यमांबद्दल म्हणाले की, ''पाहा, मी येथे चांगले रचनात्मक कार्य करीत असताना कोणत्याही प्रसारमाध्यमाचे लक्ष नाही; परंतु मी जे केले नाही त्याची मात्र प्रसिद्धी देण्याची चढाओढ करीत आहेत. हीच खरी प्रसारमाध्यमांची शोकांतिका आहे.''

नानाजींनी राजकारणाकडे पाठ फिरवल्यानंतर पुन्हा तिकडे वळूनही पाहिले नाही. या निर्णयाला अपवाद होता फक्त दि. ३१ ऑक्टोबर ८४ च्या घटनेचा. अतिरेक्यांकडून श्रीमती इंदिरा गांधींची हत्या झाल्यामुळे राजकीय पोकळी निर्माण होऊ नये म्हणून नानाजी तेव्हा म्हणाले होते की, हा विषय राजकीय नसून हा देशाच्या सार्वभौमत्वावर घाला आहे. पत्रकार परिषद घेऊन त्यांनी आवाहन केले की, श्री. राजीव गांधींचे हात बळकट करा. संघनिष्ठ असलेल्या नानाजींच्या अशा प्रकारच्या वक्तव्यामुळे बरीच खळबळ उडाली होती. ९ मार्च १९८५ च्या महाराष्ट्र टाइम्समध्ये तर अग्रलेखही छापून आला होता. राजीव गांधी सत्तेवर आल्यानंतर नानाजींनी त्यांचे अभिनंदन केले. नानाजी नुसते अभिनंदन करून थांबले नाहीत, तर भाजपसहित सर्व पक्षांनी त्यांना सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. 'इंदिराजींची हत्या ही आपला देश अस्थिर करून अराजकतेकडे नेण्याचा एक आंतरराष्ट्रीय कट आहे, अशा वेळी राष्ट्राने राजीवच्या पाठीशी एकदिलाने उभे राहणे ही राष्ट्रीय गरज आहे,' अशा प्रकारचे मतप्रदर्शन करून त्यांनी राजकीय विशाल मनाचा आदर्शच घालून दिला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्री. मा.गो. वैद्य लिहितात - ''राजकारणातून निवृत्त

झाल्यानंतर आणि रचनात्मक कार्य अंगीकारल्यानंतर नानाजी त्यांचे वैचारिक लेख, पत्रांच्या प्रतिलिपी मला पाठवत असत. एका पत्राचा उल्लेख करणे मी आवश्यक समजतो. मूळ पत्र नानाजींनी तत्कालीन सरसंघचालक श्री. रज्जूभय्यांना लिहिले होते. १९९८ हे साल असावे. भारतीय जनता पार्टी सत्तेवर आली होती. त्या सरकारमध्ये लालकृष्ण अडवाणी गृहमंत्री होते. नानाजी रज्जूभय्यांना लिहितात की, 'श्री. अडवाणींनी सरकारात सामील न होणे श्रेयस्कर. पक्ष संघटन कार्यात त्यांनी राहणे आवश्यक आहे. ते सरकारमध्ये गेले तर संघटन खिळखिळे होईल. कोणाचा धाक राहणार नाही.' नानाजी नेहमीच पक्ष संघटनेच्या बाजूचे होते. पक्षामध्ये संघटना बांधून ठेवण्यासाठी विशेष योग्यता असणारी, अनुभवसंपन्न ताकदीची व्यक्ती अधिकारपदावर असेल तरच संघटना मजबूत राहील आणि सरकारही ठीक प्रकारे चालेल असे त्यांना वाटे. काँग्रेस पक्षाच्या बाबतीत एकदा अनौपचारिक चर्चेत प.पू. श्री. गुरुजी म्हणाले होते, 'तत्कालीन पंतप्रधान पं. नेहरू आणि तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल यांच्यापैकी एक जण जरी सरकारात सामील झाला नसता आणि पक्ष संघटनेसाठी राहिला असता, तर काँग्रेसचे अध:पतन झाले नसते.' नानाजींचे पत्र वाचून मला प.पू. गुरुजींच्या त्यावेळच्या अभिप्रायाची आठवण झाली.''

नानाजींच्या चिंतनाचा मुख्य विषय म्हणजे, 'सगळ्याच शक्तिशाली कार्यकर्त्यांनी सत्तास्थानात पद घेऊ नये. त्यापैकी काहींनी पक्ष संघटनेसाठीसुद्धा वेळ दिला पाहिजे. पक्षातील बळकट संघटनेमुळे पक्षात शिस्त राहते आणि सरकारवर अंकुशही ठेवता येतो. राजकीय कार्याव्यतिरिक्त काही महत्त्वपूर्ण विधायक कार्यही करता येते. अन्यथा राजकीय पक्ष केवळ निवडणुका लढविण्याची एक यंत्रणा बनून जाईल. इंदिरा गांधींनी काँग्रेसचे संघटन समाप्त केले व अध्यक्षपदावर आपले म्हणणे ऐकणारा 'होय बा' बसवला. त्यामुळे त्या पदाची प्रतिष्ठा नष्ट झाली. पुढे तर इंदिरा गांधी स्वत:च दोन्ही जागांवर विराजमान झाल्या! पंतप्रधान आणि पक्षाध्यक्षपदावर एकच व्यक्ती. ही नीती राजीव गांधींनीही पुढे चालविली. नरसिंह रावांनीदेखील हेच केले. सोनिया गांधींचाही तोच इरादा होता; परंतु त्यांना अशीही शंका होती की, जनमानस आपल्याला पंतप्रधानपदी विराजमान होण्यासाठी कौल देणार नाही. म्हणून त्या पंतप्रधानपदापासून दूरच राहिल्या. डॉ. मनमोहनसिंगांसारखी राजकारणाला सर्वस्वी नवखी आणि कसलीही निवडणूक न लढवलेली व्यक्ती पंतप्रधानपदी नेमण्यात आली. याचा काँग्रेसला असाही एक

लाभ झाला की, संघटनेवर लक्ष देणारी शक्तिशाली महिला अध्यक्ष मिळाली आणि केवळ योगायोगाने त्यांच्यावर नि:स्वार्थी, त्यागी अशी गौरवाची पुटे चढत गेली. त्यांचे सुपुत्र राहुल गांधी यांनीसुद्धा तोच मार्ग अवलंबिला व सरकारमध्ये सामील न होता पक्ष संघटनेकडे लक्ष देण्याला सुरुवात केली. त्यामुळे काँग्रेस पक्षाची राजकीय प्रतिष्ठा वाढली. नानाजींना पक्ष संघटनेबद्दलचे विचार, त्यांचे महत्त्व आणि स्थान याचे भान होते. दुर्दैवाने आज कोणत्याही पक्षाच्या श्रेष्ठ-ज्येष्ठ नेत्यांमध्ये ते अभावानेच आढळते. याचाच अर्थ, पक्ष म्हणजे सत्ता संपादनासाठी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या लोकांची गोळाबेरीज, असा काढल्यास वावगे ठरू नये. मग ते पद सरपंचाचे असो अथवा जिल्हा परिषद, नगरपलिका, महानगरपलिका आणि विधानसभा, लोकसभा सदस्यत्वाचे असो.

१९९९ मध्ये राज्यसभेवर असताना खासदारांच्या पगारवाढीचे विधेयक आले होते. त्याला नानाजींनी स्वत: कडाडून विरोध केला. त्या विरोधामागची पार्श्वभूमी त्यांनी पत्राद्वारे सभागृहाला कळवली होती, इतके ते स्वत:च्या मतांबद्दल आग्रही असत.

२००२ मध्ये राष्ट्रपतिपदाच्या निवडीसंबंधीचे वृत्त दै. सकाळमध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यात अपेक्षित उमेदवारांची नावे दिली होती. त्यामध्ये तत्कालीन उपराष्ट्रपती श्री. के. आर. नारायणन, महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल श्री. पी.सी. अलेक्झांडर, मिसाईलमॅन श्री. ए.पी.जे. अब्दुल कलाम आणि श्री. नानाजी देशमुख हे होते. एकाहून एक अशा त्या महान व्यक्ती होत्या. नानाजींनी पुन्हा एकदा चाणक्य नीतीचा वापर केला आणि सर्वांचा प्रश्न एका दमात सोडवला. त्यांनी सांगितले की, मला राष्ट्रपतिपदाची निवडणूक लढवण्यात स्वारस्य नाही. मी त्यासाठी उत्सुक नाही. श्री. अब्दुल कलामांसारखा शास्त्रज्ञ या पदावर विराजमान झाला तर या पदाची शोभा वाढेल. अशा प्रकारे कोणत्याही पक्षाशी जोडले न गेलेल्या श्री. कलाम यांचे नाव नानाजींनी पुढे आणले. कोणालाही त्यांच्या नावाला विरोध करता आला नाही. नानाजींमुळे एक नि:स्पृह, थोर शास्त्रज्ञ आणि भविष्याचा वेध घेणारा राष्ट्रपती देशाला मिळाला.

शिवराज चौहान यांनी नानाजींच्या बाबतीत बोलताना सांगितले -''राजनीती काजल की कोठरी होती है। इसमें जो जाता है बिना दाग लिए वापस नहीं लौटता। लेकिन नानाजी काजल की कोठरी मे भी रहे तो वहाँ से भी बेदाग निकले जैसे किचड़ में कमल का पत्ता रहता है।''

राजकारणात प्रवेश केल्यापासून ते जीवनाच्या अखेरपर्यंत नानाविध भूमिकांतून

राजकारणाशी बांधले गेले होते. हे नानाजींचे वेगळेपण मनावर ठसल्यावाचून राहत नाही. लोकशक्ती पुनरुज्जीवित करण्याच्या निर्धाराने राजकीय लाभाकडे आणि लोभाकडेही निग्रहपूर्वक पाठ फिरवून लोकजागृती आणि ग्रामोद्धार अशा विधायक कार्यामध्ये स्वत:ला वाहून घेतले. सक्रिय राजकारणात गुंतण्याची त्यांची इच्छा तशी कधीच नव्हती. जेव्हा ते निवडणूक लढविण्यास तयार झाले तेव्हा त्यांनी इतर वरिष्ठ लोकांना तशी कल्पना दिली होती. नानाजींनी दाखवून दिले होते की, बोलणे आणि वागणे यात कधीही तसूभरसुद्धा फरक असू नये. यासंदर्भात मला एका सुविचाराचे स्मरण होते - 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले.'

■





# नानाजी आणि समाजकारण

आपले आयुष्य हा एक प्रवास आहे, असे नेहमीच म्हटले जाते. आपल्या जीवनास उद्देशून 'जीवन नौका' असाही शब्द वापरला जातो. त्या नौकेतून प्रवास करणाऱ्याला आपल्याला नेमके कुठे जायचे आहे, ते नीट कळले पाहिजे. ते कळण्यासाठी म्हणून काही ठोकताळे नौकानयनशास्त्रात रूढ आहेत. आकाशातील तारे बघून आपली जाण्याची दिशा निश्चित करायची हा एक मार्ग, तर होकायंत्राचा उपयोग करून त्याद्वारे दिशा जाणून मार्गक्रमण करायचे हा दुसरा मार्ग. या दोन्ही मार्गांव्यतिरिक्त आणखीही काही मार्ग उपलब्ध आहेत, त्यापैकी एक मार्ग म्हणजे दीपस्तंभ. समुद्रात जागोजागी दीपस्तंभ उभारलेले असतात, ते प्रामुख्याने दोन कारणांसाठी. एक जिथे दीपस्तंभ आहे तिथे काही अवघड किंवा अडचणीची जागा असू शकते आणि दुसरे कारण म्हणजे वादळवाऱ्यात त्याद्वारे योग्य दिशा समजू शकते. प्रवासात योग्य दिशेने जाण्यासाठी कोणती खबरदारी घेतली पाहिजे ते दीपस्तंभ आपल्याला सांगत असतात. भवसागरातही जनसामान्यांच्या जीवन नौका योग्य मार्गावरून जाव्यात म्हणून त्यांना आपल्या अजरामर कार्याच्या रूपाने पिढ्यान्‌पिढ्या योग्य मार्गदर्शन करणारे दीपस्तंभ जीवनाच्या भवसागरातही असतात. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, समर्थ रामदास स्वामी असे साधूसंत, छत्रपती शिवाजी महाराज, श्रीमंत बाजीराव पेशवे असे सेनानी आणि स्वत:च्या कर्तृत्वाने

पुढील पिढ्यांना आदर्शभूत ठरणारे समाजश्रेष्ठी हे अशाच प्रकारचे दीपस्तंभ होत. त्यांच्या जीवनाकडे पाहून सर्वसामान्य माणूस आपल्या जीवन नौकांची दिशा ठरवत असतो. त्यांचे कार्य समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. अशा थोर दीपस्तंभांपैकी एक म्हणजे कर्मवीर नानाजी देशमुख.

वर्तमानकाळातील समाजाच्या विकासासाठी आवश्यक असणारी महत्त्वाची बाजू म्हणजे लोकांना कार्यात जोडून घेणे. या विकासकार्यात शासन, सामाजिक, औद्योगिक, धार्मिक संस्था यांचा एकत्रित सहभाग असेल, तर होणारा विकास सर्वसमावेशक आणि स्थायी स्वरूपाचा होतो.

नानाजींनी या सर्व गोष्टी लक्षात घेऊन त्याला प्रयोगात्मक रूप दिले. त्यामुळेच नानाजींचे कार्य प्रेरणा देणारे आणि सर्वांगांचा विचार करणारे आहे. महात्मा गांधींचे ग्रामीण विकासाचे रचनात्मक कार्य पुढे नेण्यात आणि त्याचे चिंतन करण्यात नानाजींनी आपले जीवन सार्थकी लावले.

लखनौमध्ये कार्य करीत असताना नानाजी गोरखपूर विभागातील कार्यकर्त्यांच्याही संपर्कात राहत असत. त्यांच्या सुखदु:खात सहभागी होत. त्यांच्या अडचणींवर उपाय सुचवत. तेथील कृष्णकांत नावाचा कार्यकर्ता प्रचारकाचे जीवन संपवून गृहस्थाश्रमी होऊ इच्छित होता; परंतु विवाहानंतर आवश्यक असलेले उदरनिर्वाहाचे साधन काय हा प्रश्न त्याच्यापुढे होता. नानाजींनी त्या दाम्पत्याचे शिक्षण आणि त्याच्या अंगी असलेली संस्कारक्षमता ओळखली आणि त्यांना शिशुमंदिराची कल्पना सुचवली. अशा तऱ्हेने भारतात सर्वप्रथम १९५० मध्ये सरस्वती शिशुमंदिराची स्थापना झाली. गोरखपूरमध्ये स्थापन झालेल्या या सरस्वती शिशुमंदिराचे मार्गदर्शक होते नानाजी. शिशुमंदिराच्या धर्तीवर देशात अनेक शाळा निघाल्या आणि एक अखंडित शृंखला तयार झाली. पुढे विद्याभारती या संस्थेच्या मार्गदर्शनाखाली भारतात सरकारी अनुदानाशिवाय शिक्षणाची चळवळ सुरू झाली. नानाजी गोंडा व बलरामपूर येथे संघशाखा चालवीत. सायकलवरून ४० किलोमीटर अंतर ते तडफेने आणि जिद्दीने पार करीत. त्या भागात जमिनीखाली पाणी आहे आणि ते पंपाने वर आणता येईल ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली होती. पुढे त्यांनी या पाणी प्रकल्पाचा प्रारंभ गोंडा येथे केला. त्यात त्यांना यशही आले. अडचणींवर मात करण्याचे हे नानाजींनी घालून दिलेले उदाहरणच होय.

नानाजी माणूस घडवणारे होते. त्यांनी समाजशिल्पी दाम्पत्ये निवडली आणि त्यांना घडवले. त्यांचे मन तयार केले. त्यांना संपर्क साधण्याचे तंत्र शिकवले व

नंतरच त्यांना गावोगावी पुढील कार्यासाठी पाठवले. समाज, कुटुंब, गावाचा संपूर्ण आणि सर्वांगीण विकास हेच त्यांचे लक्ष्य होते. कुटुंबातील कोणत्याही वयाच्या सदस्याच्या समस्येचा ते अभ्यास करीत व त्यावर उपाय शोधत. हेच त्यांचे सर्वांगीण विकासाचे लक्ष्य आणि हीच सामाजिक कार्याची साधना होती. १९६८ मध्ये पं. दीनदयाल उपाध्याय यांची हत्या झाली. त्यांच्या पार्थिवावर पुष्प अर्पण करताना प.पू. गुरुजी म्हणाले, 'आता तुमच्या एकात्म मानवदर्शनाचे काय होणार?' हा प्रश्न नानाजींच्या मनात घर करून राहिला. दीनदयालजी नानाजींचे परममित्र आणि सहकारी होते. नानाजींच्या दु:खाला पारावार नव्हता; परंतु स्वत:चे दु:ख विसरून त्यांनी पक्षाला अवघड अवस्थेतून बाहेर काढले. १९६९ मध्ये पाटण्याला झालेल्या जनसंघाच्या अधिवेशनात त्यांनी पं. दीनदयाल स्मारक समितीची स्थापना केली. श्री. अटलबिहारी वाजपेयींना अध्यक्ष करण्यात आले. नानाजींनी पुढील काळात स्मारक समितीसाठी ३०-३५ लाख रुपयांचा निधी जमा करून नवी इमारत उभी केली, तीच आज 'दीनदयाल शोध संस्थान' या नावाने दिल्ली येथे दिमाखात उभी आहे.

नानाजी स्वत: चित्रकलेत पारंगत होते. ग्वाल्हेरमध्ये त्यांनी एका दुकानात चित्रे पाहिली. दुकानात जाऊन त्यांनी चित्रकाराची ओळख करून घेतली व त्याच्याशी मैत्री केली. आपले आदर्श असलेल्या प.पू. गुरुजींचे तैलचित्र नानाजींनी त्या चित्रकाराकडून काढून घेतले. ते तैलचित्र दीनदयाल शोध संस्थान, दिल्ली येथे लावण्यात आले. तत्कालीन राष्ट्रपती मा. श्री. झैलसिंग यांनी जेव्हा ते चित्र पाहिले तेव्हा त्यांनी नानाजींजवळ चित्रकाराची चौकशी केली. मा. झैलसिंगांना स्वत:चे आणि आतापर्यंत होऊन गेलेल्या राष्ट्रपतींची तैलचित्रे काढून घ्यावयाची होती. नानाजींनी आपल्या चित्रकार मित्राला राष्ट्रपती भवनात नोकरी मिळवून दिली. गरज ओळखून मदत करण्याच्या नानाजींच्या वृत्तीमुळेच त्या चित्रकाराला राष्ट्रपती भवनात प्रवेश मिळू शकला.

पं. दीनदयाल यांची अंत्योदय योजना ही संकल्पना आणि त्यांचा एकात्म मानवदर्शनवाद राबविण्याचे श्रेय नानाजींना जाते. या योजनेचा दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण जनतेला अन्न आणि औषधी पुरवणे हा हेतू होता. विशेषत: स्त्रियांच्या आरोग्याकडे लक्ष पुरवणे हेही या योजनेचे उद्दिष्ट होते. सर्व जनतेला दारिद्र्यरेषेच्या वर आणणे हे मनात ठरवूनच कार्याची आखणी करण्यात नानाजी मग्न असत.

सदाचार, शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबन या चतु:सूत्रीवर आधारित

अनेक योजना राबवून गावाचा आणि टंचाईग्रस्त ग्रामस्थांचा सर्वंकष विकास कसा होईल याचा नानाजी सतत शोध घेत असत. केवळ चिंतन करणे हा त्यांचा पिंड नव्हता. साठीच्या उंबरठ्यावर असताना जाहीर भाषणात त्यांनी ग्रामोद्धाराच्या नव्या कल्पनांची दिशा दिली. त्यासाठी वयाची साठी पूर्ण होताच सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेऊन त्यांनी स्वत:ला रचनात्मक कार्याला वाहून घेतले. ग्रामविकासाच्या विविधांगी योजना राबवणारे प्रकल्प उभे करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.

१९७२ ची गोष्ट आहे. विदर्भामध्ये दुष्काळ पडला होता. त्यावेळेस डॉ. जितेंद्रकुमार जैन हे दिल्लीच्या डॉ. इरविन हॉस्पिटलमध्ये रजिस्ट्रार म्हणून काम पाहत होते. कोणाची तरी आरोग्याची समस्या घेऊन नानाजी डॉ. जैन यांच्याकडे गेले होते. औषधी कंपन्यांनी विनामूल्य पुरवलेली भरपूर औषधे डॉ. जैन यांच्या कपाटात पाहून नानाजींनी आश्चर्यचकित होऊन त्यांना विचारले, 'तुम्ही या औषधांचे काय करता?' तेव्हा डॉक्टर म्हणाले, 'आम्ही हे परिचितांत वाटतो.' हे ऐकून नानाजी म्हणाले, 'याची आवश्यकता सध्या महाराष्ट्रात दुष्काळपीडित आणि गरजू लोक आहेत त्यांना आहे.' त्यावेळेस डॉ. जैन ज्युनिअर डॉक्टरांच्या संघटनेचे अध्यक्ष होते. नानाजींच्या सान्निध्यात आल्यावर सर्व डॉक्टर मंडळींनी एक ग्रुप तयार केला. विनामूल्य औषधांचे एकत्रीकरण करण्यात आले. साधारणपणे दोन ट्रक भरतील एवढी औषधी जमा झाली. नानाजींनी केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष श्री. सोहन नैचर यांचीही भेट घेतली. ते नानाजींच्या पहिल्याच भेटीने प्रभावित झाले. त्यांच्या सहयोगाने दीनदयाल शोध संस्थानमध्ये मेडिसीन बँक सुरू झाली. गरीब व गरजू लोकांना त्यातून औषधी पुरवण्यात येऊ लागली.

१९७७ मध्ये आंध्र प्रदेशातील समुद्री तटवर्ती भागात असलेला अवनीगुडा तालुका वादळाच्या तडाख्यात सापडला. फार मोठे नुकसान झाले. अनेक स्वयंसेवी संस्था मदतीला धावून आल्या. डॉ. जैन त्यावेळेस दीनदयाल शोध संस्थानचे सेक्रेटरी होते. नानाजींनी त्यांना आदेश दिला की, तुफानग्रस्त भागाचा दौरा करून एक प्रभावी योजना बनवावी. पू. राजमाता विजयाराजे सिंधिया आणि सेठ बिछानदास मेहता यांच्या सहकार्याने हेलिकॉप्टरची व्यवस्था झाली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आंध्र प्रदेशचे प्रांत प्रचारक श्री. सोमय्याजी, श्री. मेहताजी आणि डॉ. जैन हैदराबादहून विजयवाड्याला पोहोचले व तेथून त्यांनी हेलिकॉप्टरने अवनीगुडा तालुक्याचे निरीक्षण केले.

मुलापालम नावाचे गाव पूर्णपणे वादळाच्या तडाख्याने आणि पुराने वाहून

गेले होते. तेथील १०० कुटुंबे पूर्णपणे उघड्यावर पडली होती. त्यांना केवळ औषधी, कपडा, जेवण देऊन भागणार नव्हते. त्याबाबत त्या तिघांनी मिळून रिपोर्ट बनवला आणि नानाजींना दिला. नानाजींनी तो वाचल्यावर डॉ. जैन यांना बरोबर घेऊन ते इंडियन एक्स्प्रेसचे रामनाथजी गोयंका यांच्याकडे गेले. त्यांच्यासमोर रिपोर्ट ठेवून सर्व बाबी सांगितल्या. वादळग्रस्त लोकांसाठी घरे बांधून द्यावी लागतील असा प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेवला. रामनाथजी म्हणाले की, 'धनाची व्यवस्था झाली तरी पुढचे काम कोण पाहणार?' त्यावर नानाजींनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तिथे करीत असलेल्या कार्याचे फोटो दाखवले. पैशाचा योग्य विनियोग करून संघ घरबांधणीच्या या कार्यात मदत करील अशी ग्वाही दिली. नानाजींनी दिलेल्या आश्वासनावर रामनाथजींनी विश्वास ठेवला आणि त्यांना ताबडतोब ५ लाख रुपयांचा धनादेश दिला. शिवाय एक्स्प्रेस समूहातर्फे मदतनिधी उभा करून एक कोटी रुपये देण्याचे त्यांनी कबूल केले. पीडित देशबांधवांसाठी वृत्तपत्रांतून जाहिराती देऊन पैसा उभा केला. जनतेच्या आर्थिक सहकार्याने आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या श्रमदानाने १०० घरे उभी राहिली. त्या वसाहतीला 'दीनदयालपुरम्' असे नाव देण्यात आले. या अभिनव प्रकल्पाचे उद्‌घाटन देशाचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री मा. श्री. अटलबिहारी वाजपेयी आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री श्री. चेन्ना रेड्डी यांनी केले. त्यांनी केवळ नानाजी आणि दीनदयाल शोध संस्थानची नाही, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचीही तोंडभरून प्रशंसा केली. नानाजींच्या या मानवतावादामुळे सेठ रामनाथजी गोयंका आणि परिवार त्यांच्या अधिक जवळ आले आणि अनेक प्रकल्पांना ते मदत करू लागले.

१९७८ मध्ये नानाजींनी गोंडा जिल्हा दत्तक घेतला व तेथे काम सुरू केले. गोंडा येथे काम करीत असताना नानाजींनी प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यासाठी ७ औद्योगिक कार्यशाळा सुरू केल्या. त्यासाठी सरकारकडून अर्थसाहाय्य मिळाले होते. कार्यशाळा मनाप्रमाणे संपन्न न झाल्यामुळे या प्रयोगात्मक कार्यात नानाजींना अपयश आले. कार्यशाळेचा काहीही उपयोग न झाल्यामुळे सरकारकडून मिळालेले अर्थसाहाय्य त्यांनी सरकारला परत केले. या अपयशाने खचून न जाता त्यांनी जयप्रभाग्राम येथील कामावर लक्ष केंद्रित केले. जनशिक्षण संस्थान या सरकार पुरस्कृत संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी अर्ध्या पगारावर काम करून संस्थेला 'सर्वोत्तम केंद्र' हा किताब मिळवून दिला. कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणारे मान्यताप्राप्त केंद्र म्हणूनही ते मानले जाऊ लागले. संस्थेच्या या प्रगतिशील वाटचालीमध्ये नानाजींचे

मार्गदर्शन आणि कार्यकर्त्यांचा सहभाग मोलाचा होता.

गोंडा येथे भक्तिधाम मंदिर बांधायचे असे नानाजींनी ठरवले. त्यासाठी लागणारे धन संकलन करणे आणि नवनिर्माण कार्यासाठी लागणारे कार्यकर्ते जमविणे हा दुहेरी हेतू नानाजींनी मनात योजला होता. त्यामुळे त्यांनी समाजशिल्पी दाम्पत्यासाठी एक महिन्याचे प्रशिक्षण शिबीर घेण्याचे ठरवले. त्या शिबिरासाठी येणाऱ्या कार्यकर्त्यांना घेऊन २,८१२ गावांत पोहोचता येईल आणि प्रत्येक परिवाराकडून मंदिर निर्माणासाठी धन गोळा करता येईल हा उद्देश नानाजींच्या मनात होता; परंतु शेतकरी धान्याच्या रूपानेच मदत करतील. तेव्हा सुगीच्या दिवसांतच त्यांच्याकडे गेल्यास सढळ हाताने ते मदत करू शकतील असे त्यांना वाटले. मंदिराच्या भूमिपूजनाच्या तारखेसंबंधी जेव्हा विचारविनिमय होऊ लागला तेव्हा तेथील पंडितांनी सांगितलेल्या तारखेलाच सकाळी भूमिपूजन आणि दुपारी प्रशिक्षण शिबीर घेण्याचे ठरले. कार्यकर्ते जमा झाले. त्यांना घेऊन पुढे धनसंचय केला गेला. सकाळी शास्त्रोक्त पद्धतीने भक्तिधाम मंदिराचे भूमिपूजन झाले. दुपारी समाजशिल्पींसाठी प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. मंदिर निर्माणाचे काम जसे महत्त्वाचे होते तसेच प्रशिक्षणाचेदेखील होते. हे दोन्ही कार्यक्रम एकाच दिवशी राबवण्याची योजना मोठी अभिनव होती. त्याला ग्रामस्थांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. पुढे धीरूभाई अंबानी यांनी भक्तिधाम प्रकल्पास अर्थसाहाय्य केले. नानाजींचा दुहेरी हेतू सफल झाला. मंदिर निर्माण झाले आणि समाजशिल्पी कार्यकर्तेही मिळाले.

अच्युतराव पटवर्धन आणि सुरेंद्र मोहन हे दोघे समाजवादी आणि नानाजी जनसंघाचे. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने लखनौ विद्यापीठात एकत्र आले. थोर स्वातंत्र्यसेनानी श्री. अच्युतराव पटवर्धन महाराष्ट्रात सामाजिक सेवा प्रकल्प राबवत होते. नानाजींच्या नियोजनबद्ध चाललेल्या प्रकल्पाविषयी त्यांना कल्पना होती. त्यामुळेच त्यांनी नानाजींना विचारले, ‘माझे प्रकल्प तुम्ही राबवाल का?’ नानाजी म्हणाले, ‘मी संघाचा, तुम्ही मला विचारत आहात? तुमच्या मंडळींना सांगून पाहा!’ त्यावर श्री. पटवर्धन म्हणाले ‘हे कार्य तुम्हीच करू शकता.’ एवढा विश्वास होता त्यांचा नानाजींवर! त्याचप्रमाणे आचार्य विनोबाजींनीही नानाजींना विनंती केली होती की, त्यांनी गोंडाप्रमाणेच वर्धा जिल्ह्यातील रचनात्मक कार्य हाती घ्यावे.

स्वत: अविवाहित राहून विवाह संस्थेविषयी बोलताना नानाजी म्हणत की,

'लग्न करणे हे फक्त समाज सातत्यासाठी नाही, तर मानवी संस्कृतीचे सातत्य टिकवण्यासाठी आणि संवर्धन करण्यासाठीही जरूरी आहे.' लग्न केवळ तरुण-तरुणींचे मिलन नसून व्यक्तिगत जीवनाचे सहजीवनात होणारे विलीनीकरण आहे असे त्यांना वाटे. त्यांच्या मते एखाद्या देशाचे भविष्य त्या देशात जन्मणाऱ्या बालकावर अवलंबून असते. कारण बालक परिवारातच जन्मते आणि शाळा-कॉलेजात शिक्षित होऊन सामाजिक जीवनाची आधारशिला बनते. त्या प्रक्रियेमध्ये त्याच्या पाठीशी संघटित अशी कुटुंबव्यवस्था असते. ती जर सक्षम असेल, तर देशाची प्रगती व्हायला वेळ लागत नाही.

त्यांना कार्यकर्त्यांवर अन्याय झालेला खपत नसे. एकदा चित्रकूटमध्ये विद्यापीठ परिसरात दंगल झाली. पोलिसांनी दीनदयाल शोध संस्थानचे प्रधान सचिव श्री. भरतजी पाठक यांना त्यात गोवले, कारण ते पूर्वी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते होते. आपल्या कार्यकर्त्यांची अटक टळावी म्हणून नानाजींनी प्रयत्न केला. चौकशी अहवाल विधिपटलावर यावा यासाठीही त्यांनी पुष्कळ प्रयत्न केला. त्यावेळी भाजपचे सरकार असूनही सरकारने त्याची दखल घेतली नाही. तेव्हा नानाजींनी मुख्यमंत्र्यांना खडसावून पत्र लिहिले. 'विधिमंडळात चौकशी अहवाल ठेवून पास करून न घेतल्यास मी उपोषणास बसेन' असे त्यांचे धमकीवजा पत्र पाहून चक्रे फिरली. चौकशी अहवाल सभेपुढे आला आणि भरतजी पाठक यांची अटक टळली.

विभागप्रचारक म्हणून काम करीत असताना त्यांचा लोकनायक मा. जयप्रकाशजी नारायण यांच्याशी संबंध आला. श्री. नानाजींच्या व्यक्तिमत्त्वाने जयप्रकाशजी इतके भारावून गेले होते की, पुढील काळातील 'संपूर्ण क्रांती' या त्यांच्या आंदोलनाचे संचालन त्यांनी नानाजींना करावयास लावले.

नानाजींच्या मते, आपण भारतीय लोक आदर्श व्यक्तीला महापुरुष मानतो, त्याचे देवात रूपांतर करतो आणि आपली जबाबदारी संपवतो. मला फक्त भारतासाठी नव्हे तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी प्रभू रामचंद्राला देवरूपात न दाखवता मनुष्यरूपात दाखवायचे आहे, तरच त्यांचे हे रूप लोकांसाठी प्रेरणादायी ठरेल. रामदर्शन प्रकल्प हाती घेण्याचे हेच कारण होय. हा प्रकल्प चित्रकूटमध्ये उभा करण्याचे कारण म्हणजे प्रभू रामचंद्र वनवासाच्या १४ वर्षांपैकी साडेबारा वर्षे तेथे राहिले होते.

नानाजींनी १४ रामायणे वाचली. असंख्य टिपणे काढून तपशिलात जाऊन

सतत ५ वर्षे त्यांनी अभ्यास केला. नानाजी किती खोलवर जाऊन विचार करायचे, चिंतन करायचे याचे उदाहरण द्यायचे झाल्यास रामदर्शनच्या नामकरण विधीचे देता येईल. एक्स्प्रेस टॉवर पेंट हाऊसमध्ये रामदर्शन प्रकल्पाचे नामकरण करण्यासाठी बैठक होती. त्यात उत्तर प्रदेशचे निमंत्रित मान्यवर, अभ्यासक, राजमाता श्रीमती विजयाराजे सिंधिया, आमदार श्री. राज पुरोहित, श्रीमती अनघा, श्री. विवेक गोयंका, सुप्रसिद्ध चित्रकार श्री. सुहास बहुलकर आणि चतुरंग प्रतिष्ठानचे श्री. विद्याधर गोखले यांचा समावेश होता. या प्रकल्पाचे नाव सुटसुटीत, अर्थपूर्ण आणि लक्षात राहणारे असावे असा चर्चेचा सूर होता. अखेरीस रामदर्शन की रामसंदेश यावर चर्चा थांबली. यावर नानाजी म्हणाले, 'प्रकल्प पाहताना आधी दर्शन घडते व नंतर संदेश मिळतो.' अशा तऱ्हेने 'रामदर्शन' या नावावर शिक्कामोर्तब झाले.

नानाजी म्हणत की, नुसत्या गप्पा मारायच्या नसतात तर रिझल्ट दाखवायचा असतो, म्हणजे लोक विश्वास ठेवतात. ते नेहमी सांगत की, स्वावलंबनाबरोबर सदाचारही असला पाहिजे. त्यांनी जनतेला कर्जफेडीचे महत्त्व सांगितले. आज कर्ज बुडवाल तर उद्या मिळणार नाही हे सूत्र ते गावकऱ्यांना पटवून देत. ९० टक्के कर्जाची परतफेड त्यांनी गावकऱ्यांकडून करवून दिली. त्यापूर्वी ग्रामीण भागात कर्जफेडीचे प्रमाण ३३ टक्के इतकेच होते. ही नोंद सरकार दरबारी झाली. गोंड्यातील ही आकडेवारी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला चक्रावून सोडणारी होती. श्री. मनमोहनसिंग तेव्हा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर होते. त्यांनी पाहणीसाठी खास पथक पाठवले. नानाजींचे काम पाहून मनमोहनसिंग यांचे समाधान झाले. तेव्हापासून नानाजी - मनमोहनसिंग मित्र झाले. ते नानाजींचा सल्ला सातत्याने पुढेही घेत असत. नियोजन आयोगाच्या बैठकांमध्ये नानाजींचा सल्ला घेतला जाऊ लागला.

नानाजी जेव्हा प्रचारक म्हणून बलरामपूरला आले तेव्हा त्यांची तेथे राहण्याची सोय झालेली नव्हती. ते आलटून पालटून ७-७ दिवस धर्मशाळेत राहत असत. त्या गावात श्री. कैलासचंद्र अग्रवाल नावाचे एक सद्‌गृहस्थ राहत होते. व्यवसायाने सोन्या-चांदीचे व्यापारी असलेले कैलासचंद्रजी राष्ट्राभिमानी होते. गावातही त्यांची बरीच प्रतिष्ठा होती. संघाच्या प्रथेप्रमाणे नानाजी त्यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या दुकानात गेले. त्यावेळेस एक खडेवाला त्यांच्या दुकानात आला. नानाजींना खड्यांची पारख होती. त्यांनी त्या व्यवहारात भाग घेऊन कैलासचंद्रजी यांना


मदत केली. श्री. अग्रवाल यांना नानाजींचा हा गुण आवडला. नानाजींशी चांगली दोस्ती झाली. कैलासजींनी नानाजींना आपल्या घरातच ठेवून घेतले. नानाजींनी बलरामपूर येथील शाखेचा श्रीगणेशा श्री. कैलासचंद्रजींच्या सहकार्याने केला. श्री. कैलासचंद्र, श्री. गोकुळचंद आणि नानाजी असे तिघे जण भावाप्रमाणे राहू लागले. नानाजींनी श्रद्धेने आणि आत्मीयतेने ते घर जोडले होते. अग्रवालजींच्या घराच्या कमानीवर नानाजींचेही नाव लिहिले आहे. दोन पिलरवर इतर दोन भावांची नावे आहेत, इतके नानाजी त्या घराशी समरस झाले होते. पुढे दीनदयाल शोध संस्थानचा कारभार गोकुळजीच पाहत. श्री. कैलासचंद्र अग्रवाल यांचा मुलगा श्री. गोकुळजी यांच्यावर काही कारणांमुळे गोळीबार झाला व त्यांना गोळी लागली. नानाजींनी त्यांना लखनौ येथे नेले, त्यांच्यावर उपचार करवले आणि त्यांचे प्राण वाचवले.

अलाहाबाद येथे भगवान श्रीरामाचे मंदिर बांधावे अशी डॉ. राजाराम जयपुरिया यांच्या वडिलांची तीव्र इच्छा होती. त्यासाठी त्यांनी जमीन मिळवण्याचा प्रयत्नही केला होता; परंतु तेथील जास्तीत जास्त जमीन संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीत असल्यामुळे मिळू शकत नव्हती. जयपुरिया कुटुंबाचे इंदिरा गांधी यांच्यासोबत मैत्रीचे संबंध असूनही त्यांची इच्छा पूर्ण होत नव्हती. डॉक्टरांच्या वडिलांना १९७८ मध्ये हृदयविकाराचा झटका आला. आजारी असताना त्यांनी आपली इच्छा मुलाकडे म्हणजेच डॉक्टरांकडे बोलून दाखविली. ही गोष्ट नानाजींना माहीत होती. नानाजींनी डॉक्टरांना त्यासंदर्भात बोलण्यासाठी दीनदयाल शोध संस्थानमध्ये बोलावले. चित्रकूटमध्ये राममंदिर बनवून वडिलांची इच्छा पूर्ण करा असा प्रस्ताव डॉक्टरांपुढे ठेवला. त्यांच्या वडिलांची इच्छा तर अलाहाबादमध्ये मंदिर व्हावे अशी होती. त्यावर नानाजींनी प्रभू रामांच्या वास्तव्याने पावन झालेल्या चित्रकूटचे महत्त्व वर्णन केले आणि मंदिर चित्रकूटमध्ये झाल्यास आपल्या वडिलांची इच्छा पूर्ण होईल असे सांगितले. डॉक्टरांनी बनारस येथील पंडितांशी विचारविनिमय केला आणि चित्रकूट येथे मंदिर निर्माणासाठी सहमती दिली. नानाजींनीही डॉक्टरांना पूर्ण वेळ देऊन मंदिर पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. वयाच्या ८० व्या वर्षीही दिलेल्या शब्दाप्रमाणे ४-५ वर्षे मंदिरनिर्माणाच्या कार्यात नानाजींनी स्वत:ला झोकून दिले आणि डॉक्टरांच्या वडिलांची इच्छा पूर्ण केली. भव्य रामदर्शन प्रकल्प उभा राहिला. ही किमया नानाजींच्या हातून घडली. नानाजी म्हणाले होते की, ‘मी ३०-३१ वर्षे राजकारणात होतो. त्यावेळेस माझा

जनतेशी संपर्क येत होता. मला असे दिसून आले की, सरकारने खूप सारा पैसा आणि मनुष्यबळ खर्च केलेले असूनही ग्रामीण विकास झालेला नाही. याचे कारण म्हणजे विकासकामात लोकांचा सहभाग आणि आस्था दिसली नाही. लोकशक्तीची उपेक्षाच होत राहिली. माझ्यासमोर माझे प्रेरणास्रोत लोकनायक श्री. जयप्रकाशजी होते. त्यांच्यासमोरच रचनात्मक कार्य करण्याची मी घोषणा केली होती. त्यांचा आशीर्वाद घेतला होता आणि गोंडासारख्या अतिमागास भागात माझ्या साथीदारांसह कार्यरत झालो होतो.'

राममंदिर निर्माण करावयाचे जेव्हा ठरले तेव्हा ते केवळ मंदिर न राहता लोकांनी त्यापासून प्रेरणा घ्यावी असा नानाजींचा कटाक्ष होता. त्याप्रमाणे त्यांनी अभ्यास करून रामायणातील ३३ प्रसंग निवडून त्यासमोर ती घटना लिहिली, जेणेकरून प्रत्येकाला चित्र पाहून आणि वाचून प्रेरणा घेता यावी. कोणताही प्रकल्प निवडताना त्याचा अभ्यास, चिंतन आणि त्यावर लिखाण करून त्यात त्रुटी राहणार नाहीत याची संपूर्ण काळजी नानाजी घेत असत. तसेच ते कार्य करण्यासाठी लागणाऱ्या माणसांची निवड करणे, त्यांना सांभाळून घेणे इत्यादीविषयीसुद्धा नानाजी दक्ष असत. ज्याचे श्रेय त्याला देणे हेसुद्धा नानाजींचे वैशिष्ट्यच. ते म्हणायचे, जर मला श्री. बहुलकरजी भेटले नसते तर 'रामदर्शन' झाले नसते. तीच गोष्ट प्रा. श्री. राम शेवाळकर यांच्याबाबतीत. प्राचार्यांची रामकथा ऐकून नानाजींनी 'रामदर्शन' या प्रकल्पात त्यांनी सहभागी व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. शेवाळकर सरांनी तात्काळ सहमती दर्शविली. आर्थिक अपेक्षेचा प्रश्न विचारला असता प्रा. शेवाळकर म्हणाले होते की, नानाजींबरोबर काम करायला मिळतेय हे माझे भाग्य! आर्थिक मोबदल्यासाठी मी हे काम स्वीकारले नाही. समाजासाठी नानाजी जी धडपड करतात त्यात खारीचा वाटा उचलायचा म्हणून मी हे काम करणार आहे.

'आनंदयात्री' या श्री. दत्तप्रसाद दाभोळकर यांच्या मुलाखतवजा पुस्तकात नानाजींवर भाष्य केले आहे. नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर करण्यावर नानाजींचा भर असायचा. नानाजींमधील प्रयोगशील कर्मयोगी कायम जागा असायचा. "प्रदूषित दिल्लीतील ज्या केंद्रात मी नानाजींची मुलाखत घेतली त्या केंद्राच्या गच्चीवर नानाजींनी बाग फुलवली होती, त्याला तोडच नाही. सौरशक्तीचा पुरेपूर वापर करून फुललेला तो मळा पाहून मी तर केवळ अवाक् होऊन गेलो." असे दाभोळकर म्हणतात.




**चित्रकूट येथील रामनाथ घाटाचे निरीक्षण करीत असताना नानाजी**



**चित्रकूट येथील 'नन्ही दुनिया' प्रकल्पातील एक दृश्य**




**चित्रकूट येथील रामदर्शन प्रकल्पातील राम-भरत भेटीचे दृश्य**



**चित्रकूट येथील 'नन्ही दुनिया' प्रकल्पातील एक दृश्य**




**चित्रकूट येथील रामदर्शन प्रकल्पाच्या प्रांगणातील हनुमानाची मूर्ती**



**चित्रकूट येथील रामदर्शन प्रकल्पाचे विहंगम दृश्य**



**गोंडा प्रकल्पातील देशी गायीसमवेत नानाजी**



**गोंडा प्रकल्पातील एक विहंगम दृश्य. प्रकल्पाचे निरीक्षण करताना नानाजी**

वयाच्या साठीच्या आसपास लोक निवृत्तीचा विचार करतात, त्या वयात नानाजींनी समाजस्वास्थ्य योजना कार्यान्वित केली. सामाजिक क्षेत्रात कार्य करण्याची आस्था बाळगणारे कार्यकर्ते शोधून सापडत नाहीत. जे सापडतात त्यांना टिकवून ठेवणे हे एक आव्हानच होऊन जाते. त्यासाठी आईचे हृदय, वडिलांचा कठोरपणा, मित्रासारखा मदतीचा हात पुढे करण्याचा गुण असावा लागतो. नानाजींचे समाजकारण पाहिले की, नानाजींमधील या सर्व गुणांची प्रचीती येते. नानाजींच्या सहवासात आलेले समाजशिल्पी दाम्पत्य त्यांची अशी एक आठवण सांगतात की, नानाजींनी दिलेली वर्तमानपत्रातील 'समाजशिल्पी दाम्पत्य हवे' ही जाहिरात बघून इंजिनिअर योगेश आणि त्यांची पत्नी दोघे चित्रकूटला आले. कामाला सुरुवात झाली. एक दिवस चित्रकूटला बैठक चालू असताना फोन खणखणला. बीडहून योगेशच्या घरून फोन आला होता. योगेशच्या वडिलांना हृदयविकाराचा झटका आला होता. उपचार चालू असतानाच्या काळात नानाजी बीडला आले होते. वेळात वेळ काढून ते योगेशच्या वडिलांना भेटले. प्रसिद्ध हृदय शल्यचिकित्सक डॉ. नीतू मांडके यांच्याकडून हिंदुजा रुग्णालयात शस्त्रक्रिया करवून घेण्यात नानाजींची खूप मदत झाली. शस्त्रक्रिया सुरळीत आणि नाममात्र शुल्कात झाली हे वेगळे सांगायला नकोच. सामान्य कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी करावी लागणारी धडपड आणि मदत नानाजी सदैव करीत असत.

गोंडा जिल्ह्यात चंद्रशेखरसिंह नावाचा कार्यकर्ता होता. पोटाच्या विकाराने त्रस्त असलेल्या आपल्या कार्यकर्त्याला नानाजींनी दिल्लीला उपचारासाठी आणले. रात्रभर प्रवासात त्यांच्या जवळ बसून त्यांनी सेवा केली. सेवाव्रती नानाजींचे असे पैलू हृदयाला सहज स्पर्शून जातात.

जयप्रभाग्राम येथे नानाजींचे मित्र उद्योगपती श्री. आर.व्ही. पंडित यांचा मुलगा आला होता. बावीस वर्षांचा हा तरुण विदेशातून शिक्षण घेऊन आला होता. दीनदयाल शोध संस्थानचे काम करण्यासाठी तो नानाजींसोबत राहू लागला. नानाजींचे त्याच्यावर प्रेम होते, माया होती. परदेशातून आला म्हणून त्याची खास वेगळी व्यवस्था नव्हती. आहे त्या व्यवस्थेतच त्याला राहावे लागत होते. पडेल ते काम करावे लागत होते. पहिल्याच दिवशी वसंतला गोठ्यातील शेण गोळा करण्याचे काम सांगितले. त्याने ते केलेही. भोजनगृहात काम करीत असताना तेथील लोकांचे अस्वच्छ कपडे पाहून त्याने त्या कार्यकर्त्यांना चांगले कपडे द्यावेत अशी मागणी नानाजींकडे केली. त्यावर नानाजी म्हणाले, ''नवे कपडे देण्यापेक्षा त्यांना स्वच्छतेकडे लक्ष द्यायला आपण शिकवले पाहिजे. स्वच्छ कपडे घालणे

कसे गरजेचे आहे हे सांगायला हवे. अशा प्रकारची त्यांची मानसिकता तयार करण्याची जबाबदारी संस्थानची आहे.'' कार्यकर्त्यांना जबाबदारीची जाणीव करून द्यायला नानाजी मागेपुढे पाहत नसत. हा मोठा, तो शिकलेला अशा गोष्टींना त्यांच्या दृष्टीने दुय्यम स्थान असे.

१९७९ मधील ही घटना. गोंडा जिल्ह्यातील एका गावी नानाजींचा कार्यक्रम होता. त्या गावाचा रस्ता अरुंद व कच्चा होता. त्यातच पुलाचे काम झालेले. पुलाचा भाग जमिनीपासून ८ ते ९ इंच उंचीवर होता. ड्रायव्हिंग करणाऱ्या श्री. गणेश पाठकांना वाटले की गाडी पुढे जाणार नाही. त्यांनी गाडी थांबवली. ताबडतोब नानाजींनी काहीही न बोलता गाडीचा ताबा घेतला. गाडी रिव्हर्समध्ये घेतली, एक चाक वळवून तिरपे केले आणि गाडी पुढे काढली. अडून न बसता पुढे कसे जायचे आणि मार्ग कसा काढायचा याचा नानाजी कायम विचार करीत. त्याचेच हे एक उदाहरण.

नामधारी पंथाच्या शिखांच्या केंद्राला जात असताना वाटेत अंबाला लागले. १९७५ मध्ये आणीबाणीच्या काळात नानाजींना अंबाला जेलमध्ये ठेवण्यात आले होते. बरोबरच्या कार्यकर्त्यांनी आग्रह धरला की, 'तुम्हाला ज्या खोलीत ठेवले होते ती खोली पाहूया.' कार्यकर्त्यांचे मन मोडायला नको म्हणून नानाजींनी गाडी जेलकडे वळवली. संध्याकाळचे ६ वाजून गेले होते. जेलची भेटीगाठीची वेळ संपली होती. नियमात बसत नसल्यामुळे ती खोली पाहता आली नाही; पण जेलरच्या घरी मात्र जायला मिळाले. जेलरच्या परिवारातील सर्व मंडळींनी नानाजींचे उत्तम प्रकारे स्वागत केले. पुढे प्रवासात नानाजींनी त्या जेलरच्या स्वभावाविषयी वर्णन केले. तो फार कडक स्वभावाचा असल्याचे सांगितले. त्यांच्यावर जेलमधील बाकीचे सर्व जण नाराज असायचे; पण नानाजींचा मात्र तो चांगला मित्र झाल्याचे त्यांच्या बोलण्यातून कळाले. त्या काळातही ग्रामविकासासंबंधी पुस्तके त्या जेलरने उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

जयप्रभाग्राममध्ये कार्यकर्ता शिबिरासाठी सर्व तालुक्यांमधून कार्यकर्ते आले होते. तालुकानिहाय कबड्डीच्या स्पर्धा झाल्या. स्पर्धेदरम्यान दोन संघांत वाद निर्माण झाले. वादाचे रूपांतर भांडणात झाले. योगायोगाने नानाजी तिथे आले. झालेला प्रकार त्यांच्या लक्षात आला. वातावरणावरून परिस्थितीचे आकलन आणि त्यावर उपाय हे नानाजींचे वैशिष्ट्य. लगेच त्यांनी एका संघाकडून आपण खेळणार असल्याचे घोषित केले. वातावरण एकदम बदलून गेले. आनंदाचे

वातावरण तयार झाले. नानाजींसारखे व्यक्तिमत्त्व आपल्याबरोबर खेळणार याचे ग्रामीण युवकांना कौतुक वाटले आणि अत्यानंद झाला.

गोंडा येथील कार्यकर्ता शिबिराचे नानाजींच्या हस्ते उद्घाटन झाले. ते दिवस कडाक्याच्या थंडीचे होते. कार्यकर्त्यांना राहण्यासाठी तलावाच्या अवतीभोवती गवताच्या पेंढीच्या झोपड्या तयार करण्यात आल्या होत्या. नानाजींची झोपण्याची व्यवस्था तेथे असलेल्या पक्क्या झोपडीमध्ये केली होती; परंतु नानाजींनी तेथे झोपण्यास नकार दिला व कार्यकर्त्यांसोबत तात्पुरत्या बांधलेल्या गवताच्या झोपडीतच ते झोपले. वरिष्ठ कार्यकर्त्यांनी सांगूनही नानाजी कडाक्याच्या थंडीत त्याच झोपडीत राहिले. मानापमानाच्या पोकळ कल्पनांपासून नानाजी स्वत:ला नेहमीच बाजूला ठेवत.

गोंडा जिल्ह्यात काम करीत असताना जयप्रभाग्रामला नानाजींना नेहमी जावे लागे. एकदा एका कार्यकर्त्याला मुलगा झाला. त्याने नानाजींसहित सर्व कार्यकर्त्यांना पेढे वाटले. घरातील सर्वांची चौकशी करताना त्याला ७ मुलींच्या पाठीवर मुलगा झाल्याचे समजले. पहिलाच मुलगा झाल्यामुळे पेढे वाटून आनंद व्यक्त करीत असल्याचे कळाले. तात्काळ नानाजींनी त्याला सुनावले आणि गमतीखातर म्हणाले, 'तुझे तो गोली मारनी चाहिए!' कुटुंब नियोजनाचे पुरस्कर्ते असणाऱ्या नानाजींना तो पेढा गोड लागणे शक्यच नव्हते.

लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त दिला जाणारा पुरस्कार श्री. अच्युतराव पटवर्धन यांना जाहीर झाला. अच्युतरावांनी पुरस्काराची रक्कम नानाजींनी बीड जिल्ह्यात डोमरी येथे सुरू केलेल्या गुरुकुलाला देण्याचे जाहीरपणे सांगितले. योगायोग असा की, १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत भूमिगत असताना मा. अच्युतराव ज्या दऱ्याखोऱ्यात दडून राहत होते त्याच जागी 'सोनदरा गुरुकुलम्'ची १९८६ मध्ये नानाजींनी स्थापना केली. तेथेच धन्यता अभियान राबविले गेले.

९ फेब्रुवारी १९९२ रोजी जयप्रभाग्राम येथे एक भव्यदिव्य कार्यक्रम घेण्यात आला होता. संघाचे ज्येष्ठ-श्रेष्ठ नेते त्यानिमित्ताने तेथे आले होते. त्यात दीनदयाल शोध संस्थानचे तत्कालीन प्रधान सचिव श्री. श्रीकृष्ण भिडे, श्री. यादवरावजी देशमुख, श्री. देवेंद्र प्रतापसिंह, तत्कालीन सरसंघचालक प. पू. रज्जूभय्या यांच्या भेटीचा योग नानाजींनी जुळवून आणला होता. निमित्त होते पं. दीनदयाल, प.पू. गुरुजी, प.पू. डॉ. हेडगेवार या महापुरुषांच्या भव्य-दिव्य मूर्तींचे अनावरण. नानाजींनी बौद्धिक घेताना ग्रामीण विकासाची योजना सर्वांसमोर ठेवली. रज्जूभय्यांनी

श्री. गुरुजी आणि डॉक्टरांनी दाखविलेल्या मार्गाचे अवलंबन करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला उत्तर प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्रीही उपस्थित होते. ग्रामोदय विश्वविद्यालयाचे काम तेथे उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीने केले जात असे. नानाजी नेहमीच स्वदेशीचा आग्रह धरीत. म्हणूनच ग्रामोदयमध्ये यात्रा (मेळा) भरवणे यासारख्या उपक्रमांसाठी नानाजी नेहमी उत्सुक असत.

नानाजींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील डाकूंच्या उपद्रवाचा प्रश्न भेडसावत असे. डाकूंशी संघर्ष आणि भांडण करण्यातून तो प्रश्न सुटण्यासारखा नव्हता. या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन नानाजींनी विचारमंथन केले. स्थानिक लोकांना नानाजींचे म्हणणे पटत गेले. समाजातील वाढत्या विषमतेमुळे, अन्यायामुळे उफाळून आलेला तो एक विद्रोहाचा प्रकार होता. कोणत्या आई-बापाला आपला मुलगा डाकू व्हावा असे वाटेल? डाकूंच्याही मनात नानाजींनी आपल्या निरपेक्ष प्रबोधनाने नवजागृतीची ज्योत पेटवली. कार्यकर्त्यांना डाकूंसाठी वेळप्रसंगी भोजनाची व्यवस्था करायला नानाजी सांगत. नाही म्हटले तरी डाकूसुद्धा आम जनतेमधूनच निर्माण झाले, इथलेच ते भूमिपुत्र होते. प्रबोधनाचा इच्छित परिणाम लवकरच दिसून आला. डाकूंनाही नानाजींच्या कार्याचे महत्त्व पटू लागले आणि त्यांचा त्रास असा सहजपणे नाहीसा झाला.

चित्रकूट येथील जमिनीचा पोत फारसा चांगला नाही. त्यामुळे शेतीतून फारसे पीक हाती येत नसे. जे काही उगवे तेही तेथील डाकूंच्या भीतीमुळे शेतकऱ्यांच्या हाती येत नसे. एके दिवशी रात्री १० वा. नानाजी शेतावर गेले. त्या रात्री डाकूंची सशस्त्र टोळी आली. नानाजींनी त्यांचे स्वागत केले. चहापाण्याची विचारपूस केली. डाकूंनी 'हम खिचडी खायेंगे' असा हुकूम सोडला. खिचडी खाणे झाल्यावर नानाजींसोबत त्यांचा संवाद झाला. नानाजींनी डाकूंना सांगितले, 'हे अन्नधान्य आदिवासी मुलांना आम्ही पुरवू. संस्थानिकांना देणार नाही.' हे ऐकून डाकूंनी नानाजींना 'तुम्ही निर्धास्तपणे शेती करा, आम्ही तुम्हाला त्रास देणार नाही, उलट आम्ही तुम्हाला मदतच करू.' असे सांगितले. एवढे सांगून डाकू थांबले नाहीत तर नानाजींच्या पायावर डोके ठेवून त्यांनी नमस्कार केला.

२ जुलै २००२ रोजी सतना जिल्ह्यात मझगवा ब्लॉकमध्ये काम करणारे समाजशिल्पी दाम्पत्य श्री. राजेंद्र व सौ. मंजूसिंह यांचे डाकूंनी अपहरण केले. या घटनेच्या दिवशी गावात कोठेही चूल पेटली नाही. सौ. मंजूसिंह यांना जबरदस्त धक्का बसला आणि त्या बेशुद्ध झाल्या. डाकूंनी त्यांना तिथेच सोडून दिले. मात्र,

राजेंद्रला डोंगर-रानातून डोळे बांधून रात्रभर चालवत त्यांच्या मुखियासमोर उभे केले. मोठ्या खंडणीची मागणी करण्यात आली. त्याशिवाय सुटका शक्यच नव्हती. ती पूर्ण केली नाहीतर त्यांच्या जिवाला धोका होता. राजेंद्र त्या ४४ तासांच्या काळात शांत व निर्भय होता. राजेंद्रची सर्व माहिती जेव्हा त्या मुखियाला कळाली तेव्हा तो सरदार गहिवरून गेला. त्याच्या तोंडून उद्‌गार आले, 'बालपणी माझ्यावर राजेंद्रसारखे कुणी संस्कार केले असते तर मी या मार्गात आलो असतो का?' त्याने त्या रानात राजेंद्रची मिरवणूक काढली, त्याचा सत्कार केला आणि त्याच्या खिशातून काढलेले पैसे परत केले. राजेंद्रला सुखरूप त्याच्या गावी परत पाठवले. इतकेच नाहीतर त्यापैकी आठ डाकूंनी उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीत चित्रकूटला शस्त्रे खाली ठेवून आत्मसर्मपण केले, सन्मार्ग पत्करला.

नानाजींनी केलेली माणसांची निवड आणि कार्यकर्त्यांची आपल्या कामाप्रती असणारी निष्ठा दोन्हीही वाखाणण्याजोगी. समाजशिल्पी दाम्पत्याला जर विचारले, तुम्हाला इथे भीती वाटत नाही का? तर क्षणाचाही विलंब न लावता उत्तर येते, आम्हाला भीती कशाची? आमचे ध्येय आमच्या कार्याशी संबंधित आहे आणि ते आहे जनसेवा. गनिवा ब्लॉकमध्ये कुंडुग्राम येथील हेमचंद्र आणि नीरजा पटेल हे समाजशिल्पी दाम्पत्य. दोघेही एम.ए. झालेले. हेमचंद्रांना तीन वर्षांत तीन वेळा विंचू चावला. नीरजाच्या अंगावर साप पडला. इतक्यावरही त्याच जागेत राहून ते कार्य सिद्धीस नेत राहिले.

ज्याप्रमाणे नानाजींनी कार्यकर्त्यांची निवड केली होती, त्याप्रमाणे ते सर्वांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहत असत व सर्वांची काळजी घेत असत. बीड येथील कृषिविज्ञान केंद्रातील वैज्ञानिक श्री. सुरेश कुलकर्णी यांना दुर्धर आजार झाला होता. पहिल्यांदा अंबाजोगाई येथील दवाखान्यात आणि नंतर औरंगाबाद येथील धूत हॉस्पिटल येथे त्यांना दाखल करण्यात आले. नानाजींना त्याप्रमाणे कळवले. नानाजींनी ताबडतोब धूत हॉस्पिटलचे मालक खा. धूत यांच्याशी संपर्क साधला. त्यांना आपल्या पेशंटकडे लक्ष ठेवण्यास व लागेल ती मदत करण्यास सांगितले. नानाजींच्या ओळखीमुळे कुलकर्णींना व्ही.आय.पी. ट्रीटमेंट आणि शिवाय बिलातही सूट मिळाली.

आपण जे काम करतो ते समाजोपयोगी आहे का समाजाला घातक हे प्रत्येकाने तपासून पाहिले पाहिजे यावर नानाजींचा कटाक्ष असे. पुण्यातील संभाजी बिडी कारखान्याचे मालक श्री. साबळे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे पुरस्कर्ते असूनही नानाजींचे

मित्र होते. त्यांचे सुपुत्र नितीन साबळे दीनदयाल शोध संस्थानचे कार्यकर्ता तर होतेच, शिवाय संस्थानचे कोषाध्यक्षपदही सांभाळत. तत्पूर्वी ते उपाध्यक्षपदीही कार्यरत होते. त्यांच्या व्यवसायाबद्दल नानाजी टीकात्मक बोलले तेव्हा त्यांच्यावर चांगलाच परिणाम झाला. हळूहळू त्यांनी आपला व्यवसाय बदलला. त्यांच्यातील या बदलाला नानाजींच्या संस्कारांचाच परिणाम म्हणावा लागेल. व्यवसाय असा असावा की त्यापासून तुम्ही पैसे किती कमावता यापेक्षा समाजाला त्यातून किती लाभ होतो हे महत्त्वाचे असे नानाजींना वाटे.

निधी संकलनाच्या कामी नानाजींची काही तत्त्वे असत. ती तत्त्वे काटेकारेपणे आचरणात यावीत यासाठी ते सदैव जागरूक असत. जनसंघाचे विभाग संघटनप्रमुख आणि महाराष्ट्र विभागाचे निधी संकलन सहायक म्हणून भूमिका बजावलेले श्री. वसंतराव पटवर्धन यांनी त्यांना आलेले अनेक अनुभव सांगितले. निधीप्रमुख म्हणून काम करण्याच्या त्यांच्या प्रयत्नात नानाजींनी केलेले संस्कार आणि निधी संकलनातील सांगितलेले बारकावे हे फार मोलाचे ठरले. ते सांगतात की, ''एकदा एका उद्योगपतींना भेटण्यासाठी मी नानाजींबरोबर गेलो होतो. वेळ दु. ३ वाजता ठरली होती. नियोजित ठिकाणी आम्ही थोडे लवकर म्हणजे २० मिनिटे आधी पोहोचलो. जवळच गाडी उभी केली. नानाजींनी गाडीतच थोडे वाचन केले आणि निर्धारित वेळेवर आम्ही त्या उद्योगपतींकडे गेलो. नानाजी मला म्हणाले, 'अशा लोकांकडे जाताना वेळ पाळणे महत्त्वाचे असते. आधी जाऊन त्यांना अडचणीत टाकू नये.' निधी संकलनात याचा मला खूप उपयोग झाला. ज्यांच्याकडे निधी मागावयाचा त्यांना आपण प्रथमच भेटतो, तेव्हा काय करावे याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. ज्यांच्याकडे निधी मागायला जायचे आहे, त्या व्यक्तीपेक्षा मोठ्या किंवा त्यांच्या तोलामोलाच्या व्यक्तीने आपल्याला त्या व्यक्तीचा परिचय करून दिला पाहिजे, अन्यथा आपल्या कामात अपयश येऊ शकते. नानाजींनी स्वत: मुंबईत निधी संकलनाला कशी सुरुवात केली हेही सांगितले. त्यावेळी मुंबईचे व गुजरातमधील सर्व उद्योगपती कै. धरमसीभाई खटाव यांना गुरुस्थानी मानत. त्यांच्याकडून शब्द गेला म्हणजे पहिल्या भेटीपासूनच चांगला अनुभव येई. ज्यांच्याकडे जायचे त्यांची पूर्ण माहिती, विशेषत: आवडीनिवडी, नातेवाईक, घरातील विशेष कर्तृत्ववान व्यक्ती वगैरेची माहिती घ्यावी. समोरच्याला आनंद वाटेल, आपल्याबद्दल आस्था वाटेल, असे संभाषण करावे. यशस्वी निधी संकलक व्हावयाचे असेल तर अशाच अनेक बारकाव्यांचा कसा विचार

करावा याचे उत्तम मार्गदर्शन नानाजींबरोबर काम करण्यामुळे मिळाले.''

ते पुढे सांगतात की, एकदा एका छोट्या अनौपचारिक समारंभात गप्पागोष्टी चालू असताना एका कार्यकर्त्याने नानाजींना सांगितले की, मी अन्य कामे करू शकतो; पण निधी संकलन मला जमणार नाही. ते माझ्या स्वभावातच नाही. यावरचे नानाजींचे भाष्य लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणाले, ''ही पराभूत मनोवृत्ती काय कामाची? स्वभाव नाही म्हणजे काय? पडेल ते काम करण्याची एकदा मनाची तयारी केली की सारे काही जमते. निधी मागण्यात कमीपणा वाटत असेल तर तो न्यूनगंड ठरेल. आपण सार्वजनिक कामासाठी पैसे मागतो, त्यात संकोच करण्याचे कारण काय?'' नानाजी सांगतात, ''एकदाच निधी मागावयाचा असतो; पण हा निधी मिळावा म्हणून वर्षभर येनकेन प्रकारेण त्या व्यक्तीच्या संपर्कात राहावे लागते. असा संपर्क राहिला तर निधी मागावाच लागत नाही. ती व्यक्ती आपोआपच निधी देते.'' देशभर असंख्य लोकांशी असलेला नानाजींचा संपर्क पाहता मन थक्क होऊन जाते. त्या त्या व्यक्तींची वैशिष्ट्ये आणि बारकावे लक्षात ठेवून त्यांच्याशी संपर्क ठेवण्याचे नानाजींचे कसब, त्यासाठी घ्यावी लागणारी मेहनत हे सारे पाहून अचंबित व्हायला होते. खरंच जनसंपर्कात नानाजी अद्वितीय असेच होते.

एकदा संघाचा एक मोठा कार्यक्रम होता. त्यासाठी निधी संकलन करण्यासाठी टाटा समूहाचे संस्थापक श्री. जे.आर.डी. टाटांकडे जायचे होते; पण त्यांच्याकडे जाणार कोण? हा प्रश्न निर्माण झाला. शेवटी नानाजींची निवड झाली. जे.आर.डी. टाटांचे आणि नानाजींचे मित्रत्वाचे संबंध होते. तिघे - चौघे जण जे.आर.डी. टाटांकडे गेले. विषय निघाला तेव्हा टाटांनी सांगितले की, ''नानाजी जी रक्कम सांगतील ती रक्कम मी देईन, पण मी ती दीनदयाल शोध संस्थानला देईन, संघाला नाही!'' इतकी जे.आर.डी. टाटांकडे नानाजींची प्रतिष्ठा होती. त्यावेळी नानाजींनी दिलेले उत्तरही तितकेच समर्पक होते. ते म्हणाले, ''द्यायचे असेल तर संघालाच द्या, सध्या संघाला गरज आहे.'' असाही संघनिष्ठेचा प्रत्यय.

गाय या प्राण्याबद्दल नानाजींना फारच ममत्व वाटे. नानाजींना अभिप्रेत असलेल्या खेड्याच्या संपूर्ण विकासात गायीला महत्त्वपूर्ण स्थान आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा तो कणा आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार जनता आणि जमीन दोघांनाही पौष्टिकता मिळते ती गायीमुळेच. जमिनीला पौष्टिकता मिळते खतापासून. खत तयार होते शेणापासून. गायीचे दूध सर्वांत पौष्टिक. सर्वसामान्यांचे पूर्णान्न

म्हणजे दूध. गायीचे उपयोग समजावून सांगताना नानाजी भरभरून बोलायचे. गोमूत्रापासून कीटकनाशके, शेणापासून खत तर मिळतेच, शिवाय हाडांपासून खत मिळते. म्हणून गाय ही एक शक्ती आहे असे नानाजींना वाटे. नानाजींनी गायीला जेवढे महत्त्व दिले तेवढेच महत्त्व बैलालाही दिले. ट्रॅक्टर आदी मशिन्समुळे शेती व्यवसायात बैलांचा वापर कमी होत चालला होता. गाय का पूजनीय आहे? याचे स्पष्टीकरण नानाजी वैज्ञानिकदृष्ट्या देतात. आजसुद्धा गाय देशाला आणि गावाला आवश्यक आणि उपयुक्त आहे. चित्रकूटमध्ये नानाजींनी गोसंवर्धनावर मोठे प्रकल्प उभे केले आहेत. १३ प्रजातींवर शोधकार्य चालू आहे. छोट्या शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या ट्रॅक्टर उपयोगी नाही. त्यांना 'गोरक्षा' हा शब्द विशेष रुचत नसे. त्याऐवजी ते 'गोसंवर्धन' हा शब्द वापरत असत.

नानाजींचा राजकारणात फार मोठा दबदबा होता. त्यांच्या वडीलकीचा दबदबा असायचा. त्यामुळे कायमच त्यांना टीकेचे लक्ष्य व्हावे लागे. विशेषत: काँग्रेसवाले आणि कम्युनिस्ट त्यांच्यावर टीकेची झोड उठवत असत. ब्लिट्झचे संपादक श्री. आर.के. करंजिया यांनीही त्यांच्या वृत्तपत्रातून अग्रलेख लिहून नानाजींवर व्यक्तिगत टीका केली. करंजिया कट्टर कम्युनिस्ट होते. त्यांनी अग्रलेखात असे लिहिले होते की, 'नानाजींनी राजकारण संन्यास घेऊन जयप्रभाग्राम येथे २०० कुटीर बांधून त्यात महिला ठेवल्या आहेत!' या लिखाणाने व्यक्तिगत मानहानी झाल्यामुळे नानाजींनी करंजियांवर अब्रूनुकसानीचा दावा केला. तो कोर्टाने मान्य केला व करंजियांवर नोटीस बजावली. त्यावर करंजियांनी आपल्या प्राणाला धोका असल्याचे सांगून दावा लखनौ कोर्टात चालवावा अशी विनंती केली. नानाजींनी त्या विनंतीविरुद्ध सडेतोड उत्तर दिले. कोर्टाने करंजियांची विनंती अमान्य करून दावा गोंडा येथेच चालेल असे सांगितले. राजकीय वैमनस्यातून उभा केलेला दावा आपल्यावरच बेतेल अशी करंजियांना भीती वाटू लागली, तेव्हा करंजियांनी 'कॉम्प्रमाईज आऊट साईड दी कोर्ट'साठी प्रस्ताव ठेवला. निर्मळ मनाचे नानाजी सर्वांना माफ करीत असत. त्यामुळे त्यांनी करंजियांना सांगितले की, तुम्ही पेपरमधून माझी बदनामी केलीत तशीच आता पेपरमधूनच माझी माफी मागा. करंजियांनी ब्लिट्झमधूनच नानाजींची माफी मागितली. अर्थातच तेव्हापासून करंजिया आणि नानाजींचे मैत्रीचे संबंध दृढ झाले. पुढे करंजिया दीनदयाल शोध संस्थानच्या परिवारातच सामील झाले. करंजियांनी गोंडा प्रकल्पाला भेट दिली. एवढेच नव्हे तर नानाजींनी करंजियांना डोमरी, ता. पाटोदा, जि. बीड येथेही

बोलावले होते. आपल्या भाषणात करंजियांनी नानाजींचा गौरव 'कृष्णाचा अवतार' असा केला होता.

स्वावलंबन कार्यक्रमानिमित्त नानाजी एका खेड्यास भेट देण्यास गेले होते. ते गाव समाजशिल्पी दाम्पत्याने आणि कार्यकर्त्यांनी पूर्ण स्वावलंबी केले होते. खेडे पूर्ण स्वावलंबी झाल्याबद्दल तेथे कार्यक्रम होता. कार्यक्रम संपल्यानंतर खेड्यातील नागरिक आणि कार्यकर्त्यांशी नानाजी चर्चा करीत होते. भेटीगाठी चालू असताना एक आजी तिथे आल्या आणि नानाजींना म्हणाल्या, 'नानाजी, सगळे गाव स्वावलंबी झाले; परंतु मी मात्र अजून परावलंबीच आहे.' ताबडतोब नानाजींनी उत्तर दिले, 'तुम्ही परावलंबी राहू शकत नाही. तुम्हालाही देण्यासारखे काम आहे. ते तुमच्याकडून करून घेऊ व तुम्हाला स्वावलंबी बनवू.' कार्यकर्त्यांना त्यांनी सांगितले, 'या आजींना रोज टोपलेभर आवळे आणून देत जा. दिवसभरात त्यांच्याकडून ते आवळे टोचून घेत जा. पाकात जर ते आवळे टाकले तर त्यात पाक लवकर शिरेल. आवळ्यांचा मुरब्बा करायला मदत होईल.' गावात जाण्यापूर्वी नानाजींना तेथील भौगोलिक माहिती, विकासाच्या योजना अशा गोष्टींची माहिती असायची. त्यामुळे तेथे काय आहे, काय करावे लागेल, कसे करावे लागेल याचा अभ्यास नानाजींचा आधीच झालेला असायचा.

गोंडा येथे ग्रामोदय प्रकल्पाचे उद्घाटन होणार होते. त्यासाठी ग्रामोदय गीत बसवायचे होते. त्याची कल्पना नानाजींच्या डोक्यात तयार होती. तसे गीत कोण रचून देईल हा विचार मनात चालू असताना त्यांच्या डोळ्यांपुढे सिनेस्टार देवानंद यांचे नाव आले. त्यांच्या आई-वडिलांचे आणि नानाजींचे घरगुती संबंध होते. त्यांच्या घरी नानाजींचे जाणे-येणे असे. गीतरचनेसंबंधी नानाजींनी देवानंदला विचारले. त्यांनी कवी अंजान यांचे नाव सुचवले. दोघे मिळून अंजान यांच्या घरी गेले. नानाजींनी ग्रामोदय गीतात अपेक्षित असलेली कल्पना अंजान यांना सांगितली. त्यांनी त्यावर गीत लिहिले, 'हर हाथ को देंगे काम, हर खेत को देंगे पानी' नानाजींना गीत आवडले. संगीताची जबाबदारी कोणावर टाकावी? संगीतकार श्री. सुधीर फडकेंचे नाव आठवले. नानाजींच्या विनंतीला मान देऊन बाबूजींनी चाल बांधली. नानाजींच्या मनात गाणे रुचले नाही. देवानंद यांनी संगीतकार श्री. लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांचे नाव सुचवले; परंतु तीही चाल बाबूजींच्या चालीशी मिळतीजुळती होती. २४ नोव्हेंबर १९९८ रोजी प्रकल्प उद्घाटनाचा सोहळा पार पडला. संगीतकार श्री. सुधीर फडके यांनी ग्रामोदय गीत सादर केले होते.

लक्ष्मीकांत-प्यारेलाल, जयवंत कुलकर्णी इ. संगीतकार निमंत्रितांत होते. कुठल्याही गोष्टीचा एकदा ध्यास घेतल्यानंतर नानाजी तो पूर्ण करण्यात किती कष्ट घेत हेच या घटनेतून स्पष्ट होते.

'पाचस्तंभ' मासिकाच्या संपादिका आणि सुप्रसिद्ध लेखिका मृदुला सिन्हा त्यांच्या लेखात लिहितात, 'एकदा श्रीमती राजमाता विजयाराजे सिंधियांबरोबर त्या चित्रकूटमध्ये थांबल्या होत्या. नानाजींनी स्वत: राजमातांना सगळे प्रकल्प दाखवले होते. त्यावेळेस गाडीमध्ये मीसुद्धा होते. मी राजमातांना म्हणाले, 'मी एक नाटक लिहिले आहे. ते अटलजींना वाचण्यासाठी दिले आहे. त्या नाटकाचे प्रमुख नायक नानाजीच आहेत.' हे ऐकल्यावर नानाजी म्हणाले, 'तुम्ही कागदावर लिहिता तर मी जमिनीवर लिहितो.' नानाजींचे हे वाक्य खरेच होते. जमिनीत जसे धान्याच्या एका दाण्याचे रूपांतर हजारो दाण्यांत होते त्याप्रमाणे नानाजींनी समाजात पेरलेले हे संपूर्ण समाजविकासाचे बीज असेच वाढत जाणारे आहे. नानाजींचे जीवितकार्य या दोन ओळींमधून जणू प्रत्ययास येते.

*''सात समिंदर मसि करूँ । लेखनी सब बनराई,*
*धरती सब कागज करूँ । हरिगुण लिखा न जाई ।''*

नानाजींना कलेची फार आवड होती. म्हणूनच संघप्रणीत संस्कारभारतीची स्थापना होताच नानाजी त्याचे सदस्य झाले. प्रचारक श्री. योगेंद्रजींकडे संस्कार भारतीचे काम सोपवावे असे ठरले. जेव्हा संस्थेच्या जागेचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा श्री. योगेंद्रजी नानाजींकडे गेले. नानाजींनी संस्कारभारतीच्या कार्यालयासाठी दीनदयाल शोध संस्थानच्या इमारतीत जागा दिली. वेळोवेळी त्यांची आणि त्यांच्या कामाची विचारपूस नानाजी करीत असत.

■



# स्मरणरूपी नानाजी

एखाद्या माणसाचे व्यक्तिमत्त्व ‘अष्टपैलू’ आहे असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा तो माणूस कुठल्याही क्षेत्रात अग्रस्थानीच असतो. फारच थोड्यांना हे भाग्य लाभते. श्रद्धेय नानाजींच्या बाबतीत तर या भाग्याचा त्यांच्यावर वरदहस्तच होता असे म्हणावे लागेल. म्हणून त्यांना सर्वच क्षेत्रांत श्रेष्ठपदी जाण्याची संधी मिळाली. त्या भाग्याला त्यांनी कठोर परिश्रमाची जोड दिली आणि त्या संधीचे सोने केले. वाट्याला आलेल्या संधीचा, मग त्या राजकीय असोत वा सामाजिक, कौटुंबिक अथवा वैयक्तिक, त्या संधीचा सदुपयोग करून स्वत:बरोबरच देशाचा विकास साधण्याचा त्यांनी अहोरात्र प्रयत्न केला. व्यक्ती ते समष्टी असा आयुष्यभर प्रवास करून ‘वसुधैव कुटुंबकम्’ची कल्पना साकारणारे नानाजींसारखे व्यक्तिमत्त्व विरळाच.

नानाजींजवळ कल्पकता आणि सर्जनशीलता होती. ते रात्री केव्हाही झोपले तरी सकाळी तीन वाजता उठायचे. ते नेमाने रोज दोन तास लिखाण करीत. रोजचा पत्रव्यवहार पूर्ण करीत. नानाजी कोणत्या एकाच विषयात पारंगत नव्हते तर सगळ्या विषयांचा त्यांचा सखोल अभ्यास होता. मग तो विषय कोणताही असो. अर्थ, विज्ञान, स्थापत्यशास्त्र, शेती, आरोग्य, वास्तुशास्त्र, कला, संस्कृती आणि तंत्रज्ञान यासंबंधात त्यांच्याकडे मोठमोठे विशेषज्ञ चर्चा करण्यासाठी येत असत. त्यांची स्मरणशक्ती अफाट होती.

नानाजींचा शुभ्र पेहराव पाहून वाटायचे की, जसे पांढऱ्या रंगात सात रंग आहेत तसेच नानाजींच्या व्यक्तिमत्त्वामध्ये सातपेक्षाही जास्त गुण आहेत. त्यांच्या कामातून, बोलण्यातून ते जाणवतही असे. मनाची प्रसन्नता, धैर्य, सहनशीलता, नम्रता, मनाचा सच्चेपणा, वागण्या-बोलण्यातील सरलता, एकात्मता, नि:स्वार्थ सेवाभाव, परोपकार, नि:स्पृहता, अखंड कृतिशीलता, कार्यप्रवणता, कणखरपणा, उदात्त, उन्नत, प्रगल्भ विचार, विलक्षण सामर्थ्य आणि आचरणातील शिस्त इ. गुणविशेष नानाजींमध्ये एकवटलेले दिसतात.

प्रसंगी कठोर तर कधी मृदू आणि नैतिकतेचा आदर्श असणारे असे पुरुषोत्तम नानाजी, खेडेगावात शेतकऱ्यांच्या घरात डाळ-रोटी खाऊन थंडीत खाटेवर झोपणारे नानाजी, दुर्धर आजाराने त्रस्त झालेले लोकनायक जयप्रकाश नारायण यांची आपल्या हाताने शुश्रूषा करणारे नानाजी, वृत्तपत्रातल्या अग्रलेखातले पोलादी पुरुष नानाजी, लोकसभेतले संयमी नेते नानाजी, जमिनीवर बसून लहान मुलांत रममाण होणारे नानाजी, निवडणूक प्रचारात प्रभावी भाषण करणारे नानाजी, रोग-पीडा-अज्ञान आणि गरिबीच्या उच्चाटनासाठी तासन्तास देश-विदेशांतील विद्वानांशी चर्चा करणारे नानाजी, राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डींना शेतकऱ्यांबरोबर जमिनीवर पंगतीला बसवून त्यांना भात-भाजी वाढणारे नानाजी, इंदिरा गांधींच्या नजरेतले 'खतरनाक' नानाजी, जे.आर.डी. टाटांना आपल्या रचनात्मक कामाचे महत्त्व पटवून देणारे नानाजी! व्यक्तिमत्त्वाच्या अशा बहुविध पैलूंचे वरदान किती जणांना मिळते?

नानाजींची भूमिका एखाद्या पक्ष्यासारखी गगनविहारी होती. संपूर्ण देशभर त्यांचा प्रवास होत असे. पक्षी एका शेतातील बी दुसऱ्या शेतात टाकतात आणि तेथे पीक येते. त्याप्रमाणे नानाजींचे काम चालत असे. ते एका प्रदेशातील चांगल्या चालीरीती दुसऱ्या प्रदेशात रुजवत असत. बिहार आणि उत्तर प्रदेशातील परिचितांच्या स्वयंपाकघरात नानाजींनी महाराष्ट्राची पुरणपोळी व श्रीखंड पोहोचवले होते, तसेच उत्तर भारतातील छोले-भटुरे, चुडा-दही त्यांनी महाराष्ट्रात आणले. त्याची बनवण्याची कृती, खाण्याची पद्धतही त्यांनी आत्मसात केली होती. विशेष म्हणजे हे सगळे पदार्थ ते स्वत: करून दुसऱ्याला खाऊ घालत असत. कोणत्याही चांगल्या कामाचा विचार करणे आणि प्रसार आणि प्रचार करणे हे त्यांना चांगल्या प्रकारे जमत असे. कार्यकर्त्यांना सक्रिय ठेवण्यासाठी त्यांच्याकडे पुष्कळशा टिप्स होत्या. त्यांच्या

जवळ जणू जादूची पोतडीच होती. कोणत्याही कामाबद्दल आळस त्यांना आवडत नसे, आळस करणारा त्यांच्या संपर्कात राहतच नसे.

श्री. नानाजी देशमुख ध्येयवादाने झपाटलेले झाड होते. त्याची पाळेमुळे भूमीत खोलवर रुजलेली होती. त्यांचे पोषण झाले ते स्वातंत्र्य चळवळीतील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून मिळालेल्या संस्कारांनीच. आपले जीवन इतरांसाठी आहे याची नानाजींना प्रखर जाणीव होती. त्यातले बारकावे, पेच आणि संघर्ष याचीही त्यांना जाण होती; परंतु सत्तेचे राजकारण करणारे अनेक नेते सत्तास्पर्धेच्या, वैयक्तिक महत्त्वाकांक्षेच्या भोवऱ्यात अडकतात आणि साधनच साध्य बनते, हे नानाजींना पूर्णपणे कळून चुकले होते. म्हणून त्यांनी स्वत:च्या बाबतीत असे घडू दिले नाही. पक्का मनोनिग्रह करून त्यांनी तशी कृती केली.

नानाजी रोज योगासने करीत. त्यांचा हा परिपाठ त्यांनी जेलमध्येही चालू ठेवला होता. जेलमध्ये ते बॅडमिंटनही खेळत असत.

**वेळेचे महत्त्व जाणणारे नानाजी :**

एकदा पाहिलेले घर आणि रस्ता नानाजी कधीही विसरत नसत. एकदा नानाजी बीडहून अंबाजोगाईला चालले होते. गाडीचा ड्रायव्हर रस्ता चुकला. तो दुसऱ्याच गावाच्या दिशेला लागला. त्याला नानाजींनी थांबवले आणि त्याला अंबाजोगाईचा रस्ता कोणता आहे ते सांगितले. त्यामुळे वेळेचा अपव्यय झाला नाही. कित्येक वर्षांनी नानाजी त्या रस्त्यावरून प्रवास करीत होते. त्यांच्या स्मरणशक्तीचे त्या ड्रायव्हरला आणि सोबतच्या कार्यकर्त्यांनाही खूप कौतुक वाटले.

प्रचार कार्यात असताना नानाजी परळी येथे गोपीनाथ मुंडे यांच्या प्रचारासाठी आले होते. त्यांची राहण्याची व्यवस्था डाकबंगल्यात केली होती. नानाजींची नात सौ. अरुणा अंबेकर त्यावेळी परळीला राहत होती. नानाजींनी कार्यकर्त्यांना तशी कल्पना दिली. कार्यकर्ते त्या नातीचे घर शोधत गेले आणि नानाजी येणार असल्याचा त्यांना निरोप दिला. नात आणि नातजावई श्री. कमलाकर अंबेकर त्यांना भेटायला गेले असताना नानाजींनी गोपीनाथ मुंडे यांना साांगितले की, 'मी नातीच्या घरी जात आहे. ज्या गावात माझा परिवार असतो, त्या गावात मी परिवाराकडेच थांबतो. मी डाकबंगल्यात थांबत नाही.' ठरल्याप्रमाणे नानाजी नातीकडे मुक्कामाला गेले. ते त्यांच्या वेळेनुसार झोपण्यासाठी गेले. नैसर्गिक हवेत म्हणजे गच्चीवर त्यांची झोपण्याची सोय करण्यात आली होती.

जेलमधून बाहेर पडल्यानंतर प्रथमच ते घरी आले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ५.३० वा. त्यांना पुढील प्रचारासाठी जायचे होते. नातीने त्याप्रमाणे गजर लावला होता. गजर झाल्यावर त्यांना उठवण्यासाठी ती गच्चीवर गेली असता नानाजी आधीच उठून बसलेले होते. 'अरुणा मला अलार्म लावावा लागत नाही, जेव्हा पाहिजे तेव्हा मी उठू शकतो.' असे म्हणून त्यांचा मनोनिग्रहीपणा आणि वक्तशीरपणाही दर्शविला. वक्तशीरपणा, पक्षनिष्ठा आणि आत्मसंयमन या गुणांमुळेच त्यांच्यातला स्वयंसेवक कामासाठी सदैव सज्ज असायचा.

**सेवाव्रती नानाजी :**

१९७० मध्ये समग्र क्रांती चळवळीच्या निमित्ताने नानाजी जयप्रकाशजींच्या संपर्कात आले होते. त्या वेळेस एक दुर्दैवी घटना घडली. जयप्रकाशजींच्या पत्नी प्रभावती देवी यांना कर्करोग झाला होता. असह्य वेदनेने त्या तळमळत असत. कर्करोगाची ती शेवटची अवस्था होती. त्या बरे होण्याची जवळजवळ शक्यताच नव्हती; पण तरीही प्रयत्न करावेत असे सर्वांनाच वाटत होते. मुंबईच्या टाटा रुग्णालयात उपचारासाठी जावे असे ठरले; पण कोणतीच खोली रिकामी नसल्यामुळे प्रभावती देवींना प्रवेश मिळत नव्हता. नानाजींचे मित्र जे.डी. चोक्सी हे जे.आर.डी. टाटा रुग्णालयाचे व्यवस्थापकीय व्हाईस चेअरमन होते. त्यांच्या आणि टेल्कोचे चेअरमन श्री. सुमंत मुळगावकरांच्या मदतीने रुग्णालयात एक खोली मिळाली. प्रभावती देवींच्या शेवटच्या दिवसांत नानाजींनी त्यांची मनापासून सेवा केली. जयप्रकाशजींच्या अधिक जवळ येण्यास हेही एक निमित्त झाले.

नानाजींचे श्रद्धास्थान असलेली त्यांची बहीण श्रीमती सखूबाई देशमुख यांची नानाजींनी खूप सेवा केली. त्यांना दिल्ली येथे आणून डॉ. जे.के. जैन यांच्या दवाखान्यात दाखल केले. सखूबाईंना फुफ्फुसाचा आजार झाला होता. त्याचे निदान होण्यासही बराच वेळ लागला. त्या आजारावरची औषधे भारतात उपलब्ध नव्हती. नानाजींनी प्रयत्न करून परदेशातून ती औषधे मागविली, त्यामुळे सखूबाईंना जीवनदान मिळाले. नानाजींच्या परिश्रमांचे चीज झाले. त्यांनी त्यांची आत्मीयतेने सेवा केली होती.

वाशिमच्या वास्तव्यात सणावाराच्या निमित्ताने घरी काही गोडधोड पदार्थ झाला असल्यास मित्रांना खाऊ घालण्यात नानाजींना अतिशय आनंद होई. घरातील लहान भावंडांना खाऊ घालण्यात त्यांनी कधीही हात आवरता घेतला

नाही. फळफळावळ आणणे हे तर ठरलेलेच असे. घरात जर कोणी आजारी असेल तर त्याची सेवाशुश्रूषा करण्यात नानाजींना कधीच संकोच वाटत नसे. हे सर्व करीत असताना अभ्यासाकडे त्यांनी कधीही दुर्लक्ष केले नाही.

**आधी केले मग सांगितले :**

नानाजींकडे काम घेऊन आलेली व्यक्ती, भले तिचे काम न होवो नाराज होऊन परतत नसे. त्यांचे वाक्‌चातुर्य आणि लाघवी स्वभाव यामुळे निराश झालेली व्यक्ती आनंदाने बाहेर पडत असे. त्यांच्या नातजावयाच्या बाबतीत घडलेला हा किस्सा. त्या नातजावयाने सांगितलेले काम नानाजींनी केले नव्हते. नातजावई नाराज झाले. नानाजींचे त्यावर असे म्हणणे होते की, 'स्वत:च्या हिमतीवर माणसाने पुढे यावे. कोणाच्याही शिफारशीची त्याला गरज पडू नये. मी तर स्वबळावर शिकलो, पुढे आलो, तसे प्रत्येकाने यावे.' त्यांचे हे बोलणे ऐकून नातजावई काय समजायचे ते समजले. ते दुसऱ्याच दिवशी दिल्ली सोडून निघाले. नानाजींनी त्यांना थांबवले. पुढे जावयांनी स्वबळावरच आपली कामे करून दाखविली, तेव्हा नानाजींनीच त्यांचे अभिनंदन केले. होतकरू व्यक्तीचे कौतुक करणे हा नानाजींचा स्वभावधर्म होता.

**स्वदेशाभिमान :**

नानाजींच्या पाठीचे ऑपरेशन करावे लागणार होते. त्यांच्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्यांमध्ये अनेक श्रीमंत व्यक्ती होत्या. त्या सर्वांचे मत ऑपरेशन लंडनला व्हावे असे होते; पण नानाजींनी त्याला स्पष्ट नकार दिला. 'माझे ऑपरेशन माझ्या देशातच होईल,' असे त्यांनी निक्षून सांगितले. त्यानुसार ऑपरेशन मुंबईला जसलोक रुग्णालयात मार्च १९९० मध्ये झाले. देशाभिमान काय असतो ते नानाजींनी कृतीतूनच दाखवून दिले.

**साधे आणि साहसी नानाजी :**

नानाजी हैदराबादला एका कार्यक्रमासाठी जात होते. वाटेत नांदेडला आपल्या बहिणीकडे जायचे असे त्यांनी ठरवले. त्यांच्यासोबत माजी पंतप्रधान चंद्रशेखर होते. नानाजींनी चंद्रशेखर यांना नांदेडला सोबत येण्याविषयी सांगितले. दोघे मिळून नांदेडला आले. त्यानिमित्ताने नातेवाईकांनाही त्यांनी भेटायला बोलावले. नानाजींसोबत चंद्रशेखर यांना पाहून सर्वांनाच नवल वाटले. त्या दोघांच्या साधी राहणी व उच्च विचारसरणीचा प्रत्यय साऱ्यांना त्यावेळेस आला.

वाशिमला शिकत असताना नानाजी आणि पाठक कुटुंबातले सगळे मिळून

कडोळीला गेले होते. परतीच्या प्रवासात पेनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे त्यांना अडकून पडावे लागले. नदीकिनारी असलेल्या भगवती या गावातील गावकऱ्यांनी थांबण्याविषयी विनंती केली; पण शाळेच्या ओढीने नानाजी आणि आबा पाठक यांनी गावकऱ्यांची विनंती मानली नाही. पाठक काका-पुतण्यांनी सांगडीवरून कोळ्यांच्या मदतीने नदी पार केली. नानाजींनी मात्र स्वत: पोहून पैलतीर गाठला. यातूनच साहसी वृत्ती दिसते.

**कुटुंबवत्सल नानाजी :**

कार्यकर्त्यांच्या आणि नातेवाईकांच्याही लग्न समारंभांत नानाजी नेहमी हजर राहून शुभाशीर्वाद देत असत. दु:खद प्रसंगीही नानाजी त्यांच्या नातेवाइकांच्या आणि कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन त्यांचे सांत्वन करीत असत. भाऊ, पुतणजावई, थोरली बहीण सखूबाई, मोठी बहीण मनकर्णिकाबाई, पुतणी शांता यांच्या निधनानंतर त्या त्या वेळी नानाजींनी स्वत: जाऊन त्यांच्या कुटुंबियांना आधार दिला आणि कुटुंबवत्सलतेचे आपले कार्य मनापासून केले.

नागपूर येथे नानाजींची 'एकसष्टी' साजरी करण्यात आली होती. त्यांचे जावई श्री. रंगनाथराव देशपांडे यांच्याकडे हा कार्यक्रम होता. त्यांच्याबरोबर एक्स्प्रेस वृत्तसमूहाचे संचालक श्री. रामनाथ गोयंकाही उपस्थित होते. नागपूर येथे संघाचे केंद्रीय कार्यालय असल्यामुळे भेटायला येणाऱ्यांची खूप गर्दी होत होती. त्या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन सरसंघचालक प.पू. बाळासाहेब देवरस, माजी आमदार श्रीमती सुमतीताई सुकळीकर यांचीही उपस्थिती होती. राष्ट्रसंत धर्मभास्कर पू. श्री. पाचलेगावकर महाराज यांच्या हस्ते हवनाचा कार्यक्रम विधीपूर्वक झाला. त्या कार्यक्रमाचा शेवट सांगावासा वाटतो. त्याप्रसंगी नानाजींनी उखाणे घेण्याचा कार्यक्रम ठेवला. उखाणे घेणाऱ्या प्रत्येकाला त्यांनी १ रु. दिला. पत्नीच्या उखाण्याला पतीने उत्तर द्यायचे, अशीही स्पर्धा लावली. कार्यक्रम खूपच रंगला होता. मनोरंजनात्मक कार्यक्रमातही नानाजी रंगून जायचे.

नानाजींच्या अमृत महोत्सवाचा कार्यक्रम औरंगाबादला त्यांचे नातू डॉ. विनय बाऱ्हाळे यांच्याकडे झाला. कार्यक्रमाला दीनदयाल शोध संस्थानचे तत्कालीन सचिव श्री. यादवराव जोशी आले होते. त्यानिमित्त केलेल्या होमहवनास नानाजींनी पूर्ण वेळ दिला होता. या कार्यक्रमाच्या वेळी अनेक परिवारांचे स्नेहमीलन झाले होते. पुढे दोन्ही बहिणींनी नानाजींचा सहस्रचंद्रदर्शनाचा कार्यक्रम नांदेडलाच ठरविला. याप्रसंगी ८१ दीप प्रज्ज्वलित करून त्यांचे औक्षण करण्यात आले.

सगळा परिवार त्यानिमित्ताने पुन्हा एकदा एकत्र आला होता.

सर्वसामान्य माणसे आपले वाढदिवस, एकसष्टी, अमृत महोत्सव, सहस्रचंद्रदर्शन समारंभासारखे साजरे करतात. नानाजींनी त्यांचे हे कार्यक्रम आग्रहाखातर केले; पण आपला मनोदय पुढीलप्रमाणे व्यक्त करून अमलात आणला.

६० वर्षे पूर्ण झाल्यावर नानाजींनी राजकारणाचा संन्यास घेऊन पुढील जीवन सामाजिक कार्याला वाहून घेण्याचे ठरवले. ७५ व्या वर्षी सर्व सामाजिक संस्थांची अधिकारांची पदे सोडून एक कार्यकर्ता म्हणून राहिले. ८१ व्या वर्षाच्या वाढदिवशी इच्छापत्राद्वारे मरणोत्तर देहदानाचा निर्णय घेऊन राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांना एक आदर्शच त्यांनी घालून दिला.

नानाजींना 'ज्ञानेश्वर पुरस्कार' मिळाला होता. त्यांच्या पणतूने ताम्रपत्र पाहायची इच्छा प्रकट केली. त्याला ते दाखवत असताना 'यात जसे लिहिले आहे तशी मुले झाली पाहिजेत!' असा संदेशही नवदाम्पत्याला द्यायला ते विसरले नाहीत. पणतू त्या ताम्रपत्राचा फोटो काढत असल्याचे त्यांच्या लक्षात आले तेव्हा नानाजी म्हणाले, ''ते तू घेऊन जा, फोटो काढू नकोस. नाही तरी मला त्याचा काय उपयोग? तुझ्या घरी त्याची शोभा वाढेल. हे वाचून तुमची मुले माझ्यासारखीच समाजसेवक बनतील.'' खरंच केवढी दूरदृष्टी आणि आशावाद! स्वीय सचिव हेमंतने त्या पणतूला ताम्रपत्र दिल्याची त्यांनी स्वत: होऊन खात्री करून घेतली होती.

नानाजींचं सर्वांवर मनापासून प्रेम करण्याचं कसब फार विलोभनीय आणि वेगळंच होतं. कोणाचीही प्रकृती चांगली नाही किंवा कुणाच्या सुख-दु:खाविषयी त्यांना कळाले की वेळात वेळ काढून नानाजी त्या व्यक्तीच्या घरी जाणार, सर्व चौकशी घरातल्याच व्यक्तीसारखी आपलेपणाने करणार आणि काही मदत हवी असेल तर तीही आत्मीयतेने करणार. नानाजींची नातेवाईक, कार्यकर्ते आणि सर्वच हितचिंतकांप्रती त्यांच्या मनात असणारी ही अलौकिक ओढ सहजसुंदर अशी होती. त्यातूनच त्यांचा अमाप लोकसंग्रह तयार झाला. आस्थेने माणसे जोडणारी अशी ओढ ईश्वरी वरदान असल्यासारखीच होती. हा त्यांचा गुण अनेकांना मायेची सावली देऊन गेला. त्यांच्याकडून हा गुण खरोखर घेण्यासारखा आहे.

नानाजींची जीवनकथा एक अनुशासनप्रिय, सिद्धांतप्रिय आणि संघर्षशील व्यक्तीच्या जीवनयात्रेचे कथन करते. त्यांची देशभक्ती, दीन-दुर्बल, दु:खी

यांच्याप्रती त्यांची संवेदना त्यांच्या सहवासात राहूनच जाणून घेता येऊ शकत होती. अनेकांनी ती समजून घेतली, जाणून घेतली म्हणूनच त्यांच्या भोवती एवढा मोठा समाज आपलेपणाने जमा झाला होता.

एकदा नानाजींच्या पुतण्याला कोणीतरी विचारले की, नानाजी तर शासनाकडून कुठलीच मदत घेत नाहीत. मग एवढे कोट्यवधी रुपयांचे प्रकल्प यशस्वी करण्यासाठी ते पैसा कसा उभा करतात? एका व्यक्तीने रतनजी टाटांनी नानाजींबद्दल काढलेले उद्‌गार त्याला सांगितले. स्वत: रतनजी टाटांनी दीनदयाल शोध संस्थानला रु. ५ कोटी दिले होते. इतकी मोठी रक्कम देण्याची कारणमीमांसाही त्यांनी दिली होती. त्यांनी सांगितले होते की, ''जो माणूस मंत्रिपद नाकारू शकतो, त्या माणसाची यापेक्षा अधिक परीक्षा ती कोणती असणार? नानाजी या पैशांचा सदुपयोगच करतील. तो पैसा जनतेसाठीच वापरतील याची मला खात्री वाटते.'' नानाजींच्या शब्दांमध्ये एवढे सामर्थ्य होते की, देणगीचे प्रयोजन दात्यांना पटवून देण्याची त्यांना गरजच पडत नसे.

१९७८ मध्ये नानाजी कडोळीला आले होते. तेथील ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार करण्याचे ठरवले होते. सन्मानाचे प्रतीक म्हणून त्यांना एक चांदीचा ग्लास भेट देण्यात आला. सत्काराला उत्तर देताना नानाजींनी कडोळी गावात असलेल्या पाण्याच्या दुर्भिक्षाचे विवेचन केले. सन्मानाप्रीत्यर्थ मिळालेला ग्लास त्यांनी तत्कालीन आमदारांना भेट म्हणून दिला आणि म्हणाले, 'या ग्लासने पाणी प्याल तेव्हा कडोळी गावात पाण्याचे दुर्भिक्ष आहे हे तुम्हाला आठवेल आणि तुम्ही गावकऱ्यांना मुबलक पाणी कसे देता येईल यावर विचार कराल.' वैयक्तिक लाभापेक्षा समाजहित महत्त्वाचे हा धडाच नानाजींनी घालून दिला.

नानाजी एकदा लखनौहून दिल्लीकडे रेल्वेने येत होते. दिल्ली २ कि.मी. दूर असताना गाडीचे ५-६ डबे रुळावरून घसरले. बरोबरचा कार्यकर्ता म्हणाला, 'टॅक्सीने दीनदयाल शोध संस्थानमध्ये जाऊ.' त्यावर नानाजी उत्तरले, 'नको, स्टेशनवर कार्यकर्ते वाट पाहत असतील, त्यांना आधी भेटू मगच पुढे जाऊ.' त्याप्रमाणे आपले सामान त्यांनी उचलले आणि २ कि.मी. पायी चालत स्टेशनवर आले. कार्यकर्त्यांप्रती असणारा हा जिव्हाळाच त्यांना भला माणूस बनवून गेला.

अशा समृद्ध व्यक्तिमत्त्वाची सेवा करण्याची संधी अनेकांना मिळाली. सार्थक जीवन जगण्याच्या कलेचे बीजारोपण नानाजींनी अशा सगळ्याच सोबत आलेल्या लोकांमध्ये केले. त्यामुळे प्रत्येकाच्या मनात त्यांच्याविषयी श्रद्धा आणि

विश्वास दृढ राहून वृद्धिंगतही झाला. अनेकांच्या मते आजही नानाजी संस्कारांच्या रूपाने आमच्या जवळच आहेत.

नानाजी युगद्रष्टे तर होतेच त्याबरोबर त्यांना दूरदृष्टीही होती. ते लोकांच्या मानसिकतेत बदल घडवून त्यांना समाजकार्यात आणण्यात निपुण होते. असेच एकदा चित्रकूट येथे काही पाहुणे आले असताना एका कार्यकर्तीला नानाजींनी 'क्लिअर सूप' बनवण्यास सांगितले. त्यांना सूप बनवता येत नव्हते. ही गोष्ट नानाजींच्या लक्षात आली. ते स्वत: स्वयंपाकघरात आले आणि त्यांनी सूप बनविण्याची प्रक्रिया भाजी चिरण्यापासून ते सूप बनवण्यापर्यंत समजावून सांगितली. आई जशी मुलीला सांगते त्याप्रमाणे एक प्रकारे आईची भूमिका नानाजींनी निभावली आणि सगळे तयार झाल्यानंतर स्वत: बैठकीत जाऊन बसले आणि जणू काहीच झाले नाही असा आविर्भाव त्यांच्या चेहऱ्यावर होता.

नानाजी त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांमध्ये कोणताही भेदभाव करीत नसत. ते नेहमी सर्वांना सांगत की, सर्वांत मोठी सेवा कोणती असेल तर जेवू घालणे. त्यामुळे स्वयंपाक करून, जेवण करून वाढणाऱ्या स्त्रियांबद्दल त्यांना अभिमान होता आणि मनोमन ते त्यांना धन्यवाद देत असत.

नानाजी नेहमी म्हणत, 'काम करा, परिश्रम करा. काम करण्याचा अभ्यास करा आणि जीवन काय आहे ते सर्वार्थाने ओळखा. परिश्रम केल्याने माणूस थकत नाही तर बसून राहिल्याने थकतो.'

कपडे व्यवस्थित ठेवणे, अंथरूण-पांघरुणाच्या घड्या व्यवस्थित लावणे, स्वच्छ ठेवणे हे सर्व ते स्वत: अनेकांना शिकवत. हा केवढा मोठा गुण म्हणायला हवा.

नानाजींची कोणत्याही विचारामागची भूमिका स्पष्ट आणि पारदर्शी असायची. त्यांची प्रामाणिक सामाजिक धारणा ते तेवढ्याच सडेतोडपणे समजावून सांगत. कुठल्याही कार्यक्रमाला त्यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले जायचे तेव्हा ते आयोजकांना कुठलाच त्रास देत नसत. ते म्हणत, 'माझ्या प्रवास-निवासाची किंवा कार्यक्रमस्थळी पोहोचण्याची तुम्ही काळजी करू नका. त्यासाठी व्यवस्था किंवा पैसे खर्च करणे हा आपला चिंतेचा विषय होऊ देऊ नका. आमंत्रण स्वीकारल्यानंतर ती संपूर्णत: माझी जबाबदारी आहे. तिथे पोहोचल्यानंतरच मी आपला पाहुणा.' आताच्या प्रमुख पाहुण्यांच्या अपेक्षा पाहता नानाजींच्या या विचारांप्रती नतमस्तकच व्हावे असे वाटल्यास नवल नाही. आपल्या विचारांशी सुसंगत असे वर्तन करून कार्यकर्त्यांतही ते रुजवण्याचा हा केवढा मोठा आदर्श!

नानाजी जसे जातपात मानत नव्हते तसेच ते गरीब-श्रीमंत हा भेदही मानत नव्हते. त्यांच्या दृष्टीने कोणीही मोठा-लहान नसतो. माणुसकीच्या नात्याने सर्व समान असतात. नानाजींच्या या गुणवैशिष्ट्याबद्दलची प्रतिक्रिया एका ८५ वर्षांच्या शेतकऱ्याने दिली. तो म्हणतो, 'आम्हा खेड्यातील लोकांना कारकुनापासून ते अधिकाऱ्यांपर्यंत कोणीही समोर उभे राहू देत नाही; पण नानाजींनी तर देशाच्या सर्वांत मोठ्या माणसाबरोबर - राष्ट्रपतींसोबत आम्हाला जेवायला बसवले होते.' अशा प्रकारच्या प्रतिक्रिया नानाजी अजातशत्रू होते हेच सिद्ध करीत नाहीत काय?

वाचन, अभ्यास आणि चिंतन हा नानाजींचा स्थायीभाव होता. रेल्वे प्रवासाच्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी ते स्वत:जवळ नेहमी बॅटरी ठेवत असत. त्या प्रकाशातही त्यांचे वाचन चालू राही. मिळालेला वेळ अध्ययन, चिंतन आणि मनन यातच ते सत्कारणी लावत असत.

नानाजी विलक्षण प्रतिभेचे संघटक होते. ज्याला कोणाला आपल्यासोबत घ्यायचे असेल त्याच्या प्रत्येक छोट्या-मोठ्या गोष्टीकडे ते लक्ष ठेवायचे. एकदा असेच प्रवासाला निघताना एका कार्यकर्त्याला त्यांच्या सामानात कथ्थक नृत्य करताना लागणाऱ्या घुंगरांचा सेट दिसला. त्याने प्रश्नार्थक मुद्रेने त्यांच्याकडे पाहताच नानाजी म्हणाले की, आपला एक प्रमुख कार्यकर्ता आहे त्याची मुलगी कथ्थक नृत्य शिकत आहे. तिच्यासाठी मी हा सेट घेऊन जात आहे. अशा लहानसहान भेटवस्तूंद्वारे नानाजी त्या परिवाराला आपलेसे करून घेत. अशा अनेक प्रकारच्या माध्यमातून त्यांनी कार्यकर्त्यांचे एक प्रभावी संघटन तयार करून दाखवले होते.

नानाजींनी इतके मोठे भव्य काम चित्रकूट येथे उभे केले आहे तरी त्यांचे नाव कुठेही कोरलेले नाही. त्याबद्दल विचारले असता नानाजी म्हणाले की, अजिंठा-वेरूळमधली इतकी सुंदर शिल्पे कोरणाऱ्या कलाकारांची नावे कोणाला माहीत आहेत का? समर्पित वृत्तीने काम करणारे ते हजारो शिल्पकार अज्ञातच आहेत ना! तसाच मीही राहू इच्छितो. असा आदर्श आज पाहायला मिळेल का?

त्यांनी सेवावृत्तीने, नि:स्वार्थी स्वभावाने, सामान्यांपासून मोठ्यापर्यंत सर्वांठायी आत्मीयतेची स्नेहभावना आणि कौटुंबिक जिव्हाळा निर्माण केला होता, यात शंका नाही.

*'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुलें*
*तोचि साधू ओळखावा देव तेथेची जाणावा ।'*

असे तुकाराम महाराज म्हणतात. नानाजींचे जीवन साधुत्व आणि देवत्वाने भरले आहे. या ओळी त्यांच्या जीवनाला स्पर्श करून जातात. गर्भवती, कुपोषित महिलांचे प्रश्न सोडवण्याचे काम पुरुष आणि महिलांनी मिळून केले पाहिजे, हे त्यांनी केवळ स्वप्न पाहिले नाही तर ते करून दाखविले. त्यांनी त्यांची ३० वर्षांची शक्ती उपेक्षित, पीडित, गरीब लोकांच्या चिंतन, मनन, कल्याणासाठी खर्ची घातली. त्यांची कामे उत्कृष्ट आणि पारदर्शक होती. ते म्हणत, माझे नाव कोठेही नको. त्यांनी नेहमीच सर्वांच्या सहकार्याने आणि सहयोगाने काम केले. ते कधीच कोणाला हे करू नका, ते करू नका असे सांगत नसत. लोकांना जोडणे, राष्ट्राचा सर्वांगीण विकास आणि राष्ट्रसेवा या गोष्टी त्यांनी आत्मसात करून आपले जीवन आदर्श बनवले होते.

चित्रकूट हे डोंगरात वसलेले आहे. तेथील डोंगर रुक्ष होते. वाळवंटासारखी परिस्थिती होती. पावसाळ्यात पाणी येत होते; पण ते वाहून जात होते. लोकांना पिण्यासाठी पाणी नव्हते; परंतु एक चमत्कार घडला, नानाजी देशमुख यांनी आपल्या परिश्रमाने तो घडवून आणला. आता झाडे सुकलेले नाहीत, डोंगर रुक्ष पडलेले नाहीत, त्यावर हिरवळ पाहायला मिळते, पाणी रोखण्यात यश आले. पशुपालनाला चालना मिळाली, गृहउद्योग सुरू झाले, पीक येऊ लागले, बाहेरून अन्नधान्य आणायची गरज भासत नाही. चित्रकूटच्या परिसरात दरोडेखोरांची टोळी कार्यरत होती. आतंक होता. लोकांचे जगणे कठीण होते; परंतु जेव्हा पहाडावरून येणारे पाणी अडवले, पावसाचे पाणी अडवून बांध टाकले तेव्हा जीवनाचे रूप बदलले. देशात बदल होऊ शकतो आणि देश बदलत आहे याचे नानाजींचे चित्रकूटवरचे कार्य हे द्योतक आहे आणि हा आदर्श सामान्य जनांनी घेतल्यास देश बदलण्यास वेळ लागणार नाही.

संस्कृतमध्ये एक श्लोक आहे. बहुतेकांना तो माहीत नसतो.

**अमंत्राक्षये नास्ति । नास्ति मूलमनौषधम् ।।**
**अयोग्य पुरुषो नास्ति । योजक स्तत्र दुर्लभः ।।**

असा तो पूर्ण श्लोक आहे.

**अर्थ :** कोणतेही अक्षर असे नाही, की ज्यापासून मंत्र बनत नाही.

कोणतेही झाडाचे मूळ अनौषधी म्हणजे औषधी गुणधर्माशिवाय नसते.

कोणताही पुरुष (व्यक्ती) पूर्णपणे अयोग्य नसतो. फक्त त्या त्या वस्तूतील, व्यक्तीतील चांगले शोधून त्यांचा योग्य जागी उपयोग करणारा योजक मात्र दुर्लभ

असतो. नानाजी असा शोध घेऊ शकणारे दुर्लभ योजक होते म्हणून ते महान राजकारणी आणि चाणक्य होऊ शकले.

नानाजी केवळ वैचारिक मतभेदामुळे किंवा त्याच्यातल्या काही दोषांमुळे त्याला हातचा जाऊ देत नसत. कारण कोणत्याही माणसात बरे, वाईट गुण असतात. वाईटाकरता त्याला सोडून देण्यापेक्षा त्याच्यातले चांगले गुण पाहणे व त्याचा चांगल्या गुणांचा आपल्या कामाकरिता उपयोग करून घेत असत.

नानाजी व गांधीजी यांच्यातील एक समान घटक म्हणजे दोघांनीही राजकारण आणि अध्यात्म या परस्परविरोधी गोष्टी स्वीकारल्या आणि त्यांची योग्य अशी सांगड घातली; परंतु दोघातला फरक म्हणजे गांधीजी त्यांच्या तत्त्वाच्या बाबतीत कर्मठ आग्रही होते, तर नानाजींनी राजकारण आणि अध्यात्माला किंवा इतरत्रही युगानुकूलतेचे अधिष्ठान दिले होते.

नानाजींच्या थोर उदात्त अशा विचारांचा पाया माणूसकी हा असायचा. माणुसकीचा त्यांच्या इतका सहज आणि खोलवर विचार फार थोड्या लोकांना विशेषत: नेतेमंडळीस करता येत असावा. नानाजींचे ते वैशिष्ट्य होते. आपल्या इतक्या प्रदीर्घ राजकीय आणि सामाजिक कारकीर्दीत असंख्य माणसे त्यांच्या संपर्कात आली. समोरची व्यक्ती कुणीही असो, सामान्य कार्यकर्ता असो वा मोठा मंत्री त्यांची वागण्याची रीत सर्वांसाठी सारखीच असायची. ते त्याच जिव्हाळ्याने खोलवरच्या आपुलकीने प्रत्येकाशी बोलत. भाषा कोणतीही असो. मराठी, हिंदी, इंग्रजी ती माध्यमापुरती असायची. त्यांची खरी भाषा हृदयाची असायची. समोरच्याशी थेट संवाद साधणारी, त्यांच्या मताला जाऊन भिडणारी, त्यांच्या निष्ठा, सामाजिक बांधिलकी, राजकारण, कळकळ या सगळ्या गुणांना माणुसकीचे तलम अस्तर असायचे. म्हणूनच कदाचित त्यांच्या निव्वळ राजकारणापलीकडचा सर्वसामान्यांच्या उन्नतीचा विचार करता येत असावा. त्यांच्या संपर्कात येणाऱ्या अनेकांना त्यांनी आपापल्या परीने त्यांचा स्तर, त्यांची पात्रता जाणून घेत कार्यात समावून घेतले. मात्र, त्यांच्यातील माणसाला नेहमी माणुसकीने वागविले. तिथे कधीही स्तरभेद केला नाही. त्यांनी सदैव उत्कटतेचा, भव्यतेचा ध्यास घेतला. नुसता ध्यास घेतला नाही तर ते प्रत्यक्षातही उतरविण्याचा सतत प्रयत्न केला. चळवळीचे सामर्थ्य त्यांनीच जाणले. त्याला सत्तेचे अधिष्ठानही दिले. ते कर्मयोगी होते म्हणूनच केल्याने होत आहे रे हे जाणून त्यांनी आधीच ते करून पाहिले. सगळ्यांना दाखवले.

कार्यकर्ता तितुकाही त्यांनीच मिळविला आणि कामालाही लावला. मोठी कामे करून दाखविली, अशी व्यक्ती आपल्यात होती. आपण तिच्या सहवासात होतो. याचे आता अप्रूप वाटते.

नानाजी चालते बोलते विद्यापीठच होते, ज्ञानाचे भांडार होते. आपल्या वर्तनातून, प्रभावी व्यक्तिमत्त्वातून समोरच्यांच्या जाणिवा पक्क्या करणे हे त्यांचे फार मोठे कौशल्य होते. एखाद्या बैठकीत वाटायचे, व्यवस्थेमधली एवढी छोटी गोष्ट कुठे नानाजींच्या लक्षात येणार आहे. म्हणून दुर्लक्षित केली जायची; पण लगेचच तीच गोष्ट समोर घेऊन त्यातील चुका शास्त्रीय पद्धतीने दुरुस्त करण्याची चर्चा होई आणि दुर्लक्ष केल्याची चपराक बसलीय असे वाटे व लक्षात येई की नानाजी तर कलावंत आहेत. कलेच्या क्षेत्रात चुकीचे करणे व समाजापुढे देणे किती चुकीचे आहे याची जाणीव निर्माण झाली.

एखाद्या कार्यक्रमात आपण सर्व व्यवस्था उत्तम केलेली आहे, असा समज घेऊन कार्यकर्ते वावरत असत आणि कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच लक्षात आले की माईक खराब आहे. आता काय करणार? असे होताच नानाजी त्यावर उपाय करून दाखवून तो माईक कसा तपासून ठेवावा, काय काय लक्षात घेतले तर वेळेवर त्रास होणार नाही हे सांगून ते एक उत्तम माईक सेटर आहेत याचे दर्शन घडवायचे. प्रसंगावधानाचे भान द्यायचे. नंतर पित्याच्या नात्याने रागवायचे; पण खूप कार्यक्रम करताना कशाकशाची जाणीव ठेवणे आवश्यक आहे हे त्यांच्या कृतीतून कार्यकर्त्यांना समजत गेले. मनात पक्के ठसले.

बैठकीत बसावे कसे याबद्दलही बोलता बोलता ते सांगत, आजकाल तरुण टेकून बसतात व वयस्कर ताठ बसून बैठक घेतात. अशा बोलण्यामुळे तरुण कार्यकर्त्यांच्या हे आपल्यासाठीच आहे हे लक्षात येई आणि एक चूक सुधारून जाई.

आपण व्यक्तीच्या शिरोभागाकडे पाहत असतो व त्याचे मोठेपण शोधत असतो; पण ते त्याच्या पावलात असते हे मला नानाजींच्या पावलातून, चालण्यातून जाणवले. त्यांची पावले ज्या मार्गावर चालतात तो मार्ग तर मोठा होतोच; पण त्या पावलांमागे चालणाऱ्या व्यक्ती त्या मार्गाच्या जाणिवा प्राप्त करून त्या महामार्गवर चालण्याचे काम करीत राहतात. अशा अनेक 'जाणिवा' देऊन मला व माझ्यासारख्या अनेकांना समाज, राष्ट्र याकडे वेगळ्या दृष्टीने पाहावयाचे ज्ञान दिले, भान दिले आमच्या जागण्याला अर्थ दिला, भव्य स्वरूपातील एका बिंदूचा मी एक छोटा

घटक आहे व कायम राहील याचा विश्वास मला आहे. नानाजींनी काय शिकवले असे विचारले तर त्याचे उत्तर असेल 'जाणिवांचे शिक्षण.'

*यश मार्गावर बहुरिपु लपले । लढून त्यासह नीज बाहुबले ।*
*वाट सुगम जो करी । सुयश त्या मिळेल अंती तरी ।।*
*यत्न अपेशी जरी भासले । त्यात यशाचे बीज पेरले ।*
*सदैव हे जो स्मरी । सुयश त्या मिळेल अंती तरी ।।*

ही सर्वांत मोठी जाणीव त्यांनी सर्वांना दिली.

चित्रकूट निवासी ऋषी नानाजी देशमुख बालपण सुखद करणारं अद्‌भुत व्यक्तित्व होतं. 'नन्हीं दुनिये'चा तपस्वी शिल्पकार, बालपण जपण्यासाठी झपाटलेले ते विलक्षण योगी होते.

नन्हीं दुनियेच्या विश्वात हरवलेले नानाजी...बालाहून बाल होऊन रंगवलेल्या नन्हीं दुनियेच्या स्वप्नातील नानाजी... कलावंतापेक्षाही अतिशय संवेदनशील व मातृहृदयी नानाजी... ध्येयापुढे पैसा, प्रसिद्धी, प्रभावांना क:पदार्थ मानणारे नानाजी...नानाजी देशमुखांची अशी असंख्य रूपे आजही आपल्या मन:चक्षूंसमोर रुंजी घालतात. अशा विलक्षण व्यक्तित्वाचा अनेकांना लाभलेला सहवास केवळ आणि केवळ शब्दातीत आहे.


गीतेमधील एक श्लोक त्यांच्या जिज्ञासेचा कारण झाला. श्रीकृष्णाने सांगितले की, मी वृक्षात पिंपळ आहे. काय असेल या पिंपळ वृक्षात? नानाजींनी लखनौ येथील वनस्पती उद्यानाच्या संचालकाला विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, वृक्षामध्ये एकच वृक्ष असा की जो २४ तास प्राणवायू देतो तो म्हणजे पिंपळ. नानाजींची जन्मापासून शोधक वृत्ती अशी होती. नानाजी उत्तम चित्रकार होते. त्यांना चित्रे काढण्याची आवड होती. त्यांनी सूर्यास्ताचे चित्र काढले होते. त्यात मेंढपाळ शेळ्या हाकत आहे, असे दाखवले होते. अत्यंत विलोभनीय असे ते चित्र होते. असे म्हणतात की, ते आजही बिर्ला इन्स्टिट्यूट येथे लावलेले आहे.

आयुष्यभर सतत मातृभूमीचे चिंतन करणारे, त्यासाठी अक्षरश: सर्वस्व अर्पण करणारे आणि मृत्यूनंतर देहदान करणारे नानाजी आधुनिक दधिचीच नव्हेत काय? समर्पित असा जीवनाचा उत्तुंग मानदंड आता पाहायला मिळणे दुर्मिळ आहे.


अशा अलौकिक स्वयंसेवकाचे, कुशल संघटकाचे, धुरंधर राजकारण्याचे, देशाच्या महान चिंतकाचे, समाजपरिवर्तनाचे शिवधनुष्य लीलया पेलणाऱ्या नेत्याचे,

आदर्श मार्गदर्शकाचे आणि भारताच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या आधुनिक ऋषीचे, म्हणजेच नानाजींचे स्मरण आपल्या दैनंदिन जीवनात आणि स्वीकारलेल्या कार्यात सदैव प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.

■



**नानाजींची एक छबी**



# विचारांचा महामेरू

नानाजींचे जीवनकार्य आपण आधीच्या प्रकरणांतून पाहिले आहे. त्यांचे कार्य त्यांच्या विचारांच्या आणि तशाच आचाराच्या बळावर पुढे जात राहिले आणि देश म्हणूनच त्यांचा आदर करतो आणि त्यांच्या आदर्शावर उभं राहून वाटचाल करीत आहे आणि करीत राहणार आहे. म्हणूनच त्यांच्या विविध ठिकाणी त्यांनी सांगितलेल्या विचारांचे सार आपण या प्रकरणात पाहूया. त्याचा तरुणांना निश्चित उपयोग होईल आणि योग्य दिशा मिळेल यात शंका नाही.

ते म्हणत, की लहान मूल आईची आशा आणि वडिलांची आकांक्षा असते. लहान मूल हा आपल्या भावी कुटुंबाचा आधार असतो त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जबाबदार कुटुंबाची जितकी आवश्यकता आहे तितकीच स्वस्थ समाजासाठी अनिवार्यता आहे. तो समाजाचा आणि कुटुंबाचा उत्तराधिकारी आहे. त्यामुळेच त्याचे पालन, पोषण, वाढ आणि अभ्यास यात दोघांचेही तेवढेच योगदान असेल तेव्हाच तो कुटुंबाचा गौरव आणि सामाजिकतेचा उत्कर्ष होण्यासाठी सबल बनेल.

ज्याप्रमाणे संख्यांचं मूल्यमापन नेहमी होत असते, तसेच व्यक्तीच्या विचारांचे, त्याच्या जिव्हाळ्याचेही मूल्यमापन व्हायला पाहिजे. एवढेच नव्हे तर त्या व्यक्तीने स्वत: स्वत:चेही निरपेक्षपणे मूल्यमापन करायला हवे यावर नानाजींचा भर होता. ते म्हणत, की गांधीही मूल्यांचे स्रोत होते. स्रोताचे मूल्यमापन केले नाही जात,

मूल्यमापन परिणामांचे होत असते, जे या कार्यामध्ये संलग्न असणाऱ्या व्यक्तींच्या क्षमतांवर आधारित असते.

शिक्षणाचे महत्त्व नानाजी कुटुंब, शाळा, समाजाबरोबर जोडतात. त्यांचे म्हणणे असे आहे की, बालपणात मुलावर कुटुंबाने चांगले संस्कार केले असता त्याचे बीजारोपण चांगल्या रीतीने होते. हे निसर्गत: कुटुंबाचे कर्तव्य आहे. त्यांची वृत्ती, दूरदृष्टी, निर्लेप, त्यागी, इदं न् मम् इ. राष्ट्रीय सद्‌गुणांमुळे त्यांचे जीवन ऋषितुल्य झाले आहे. ते भारतीय संस्कृतीचे प्रवक्ते ठरतात.

शिक्षणाबद्दल बोलताना नानाजी तळमळीने बोलत. त्यांच्या मते, विश्वविद्यालयाची पदवी धारण करून, जीवनासाठी क्षमता अर्जित करून स्वत:ला शिक्षित मानणे हे आपण आपल्याला धोका देण्यासारखे आहे. यामुळे मानव पशुसमान स्वार्थी बनतो. वास्तविक शिक्षणाचे ध्येय म्हणजे मानवाच्या संतानाला मानवीय गुणांनी संपन्न करणारे शिक्षण होय. विश्वविद्यालयाची पदवी धारण करून, जीवनासाठी क्षमता अर्जित करून स्वत:ला शिक्षित मानणे हे आपण आपल्याला धोका देण्यासारखे आहे. यामुळे मानव पशुसमान स्वार्थी बनतो. वास्तविक शिक्षणाचे ध्येय म्हणजे मानवाच्या संतानाला मानवीय गुणांनी संपन्न करणारे शिक्षण होय. 'आत्मकेंद्रित वृत्ती वाढते आहे. मला काय त्याचे?' ही भावना बळावत आहे, आजच्या शिक्षणाचा भर सुरक्षिततेवर दिला जातो, स्वातंत्र्यावर नाही याची खंतही त्यांना होती.

स्वाभिमानाबद्दल बोलताना त्यांनी फार महत्त्वाचे विचार आपल्याला दिले आहेत. ते म्हणतात, विदेशी पैशावर आधारित नवरचना आत्मनिर्भरता किंवा टिकाऊ स्थिरता प्राप्त करू शकत नाही. एखादा स्वतंत्र देश स्वावलंबन आणि स्वाभिमान यांच्या आधारावरच उभा केला पाहिजे. इतर देशांकडून जास्तीत जास्त तांत्रिक सहकार्य घेणंच योग्य असते. हा किती मोठा विचार त्यांनी दिला असून दैनंदिन जीवनातही याचा विचार करून आपण जगले पाहिजे. कुणाचे मिंधेपण घेऊन आपण जीवनात स्थिरता आणू शकत नाही.

समाजकार्य करताना कोणत्या गोष्टीची खरी आणि तीव्र आवश्यकता असते हे सांगताना ते म्हणत, की व्यक्तिगत किंवा संस्थांतर्गत समाजसेवी कार्य कुठल्याही अभिलाषेपासून अलिप्त राहिले तरच त्याचे परिणाम खूप चांगले मिळू शकतात. जे कार्य आपण करीत असतो त्यात केवळ समाधान पुरेसे असता कामा नये, तर त्यात जीवनाची सार्थकता अनुभवास यायला हवी. दुसरा असाच विचार सांगताना

ते म्हणतात, की प्रायव्हेट लिमिटेड कंपनी किंवा केवळ धनलालसेने व्यवसाय न करता विश्वस्ताची भावना मनात ठेवून समाजकल्याण आणि दु:ख निवारणाचे कार्य होणे आवश्यक आहे. अशी भावना तुम्हाला खरा आनंद आणि सार्थकता यांचा अनुभव देऊन जाईल.त्यांच्या विचारांची खोली आपल्याला यातून दिसून येते. समाज माझा आहे, त्याची समस्या माझी आहे, त्याचे निराकरण करणे माझे कर्तव्य आहे, हा विचार त्यांनी दिला.

जीवनाचे साफल्य कशात आहे? यावर बोलताना ते म्हणतात, की या जगात दोन प्रकारची माणसे असतात, एक, दु:ख विसरण्याचे उपाय सांगतात, तर दुसऱ्या प्रकारचे लोक दु:ख दूर करण्यासाठी प्रयत्न करतात. दुसऱ्यांचे दु:ख दूर करण्यातच जीवनाची खरी सफलता आहे. कुठलेही समाजकार्य करताना जशी एकनिष्ठता आणि प्रामाणिकता लागते तसेच 'ग्रामोदय' या संकल्पनेबाबतही त्यांची अपेक्षा आहे. ते म्हणतात, 'ग्रामोदय'शी संबंधित व्यक्तींना मानसन्मान, स्वत:ची प्रसिद्धी आणि प्रतिष्ठेची अभिलाषा चिकटू नये, तेव्हाच असे कठीण कार्य संपन्न करण्यासाठी संस्थेत सक्रिय सहकारी मिळू शकतील. ग्रामोदयचे यश एका व्यक्तीवर नसून, समर्पित सहकाऱ्यांच्या निष्ठावान आणि परिश्रमी समूहावर अवलंबून आहे. आपल्या राष्ट्राच्या अस्तित्वाचे मर्म लोकाभिमुख चरित्रवान व्यक्तींमध्येच अध्याहृत असते. ग्रामीण भाग हाच उत्पादनाचे केंद्र असतो, शहर नव्हे. मानवी समाजाच्या बाल्यावस्थेची शिल्पकार आईच असते, अर्थात एक स्त्रीच असते हे त्यांनी किती समर्पकपणे सांगितले नाही का?

आजच्या विजेच्या समस्येवर त्यांनी सौरऊर्जा हाच इंधन समस्येवरचा उपयुक्त उपाय असल्याचे त्याचवेळी सांगून दूरदृष्टीचा परिचय दिला आहे.

याचप्रमाणे लोकशाहीचे खरे मर्म खरेतर त्यांनी ओळखले होते आणि लोकशाही हीच खरी विकासाची जननी कशी आहे हे त्यांना माहीत होते. त्याबद्दल बोलताना त्यांनी मोलाचे विचार आपल्याला दिले आहेत. ते म्हणतात की, 'मी स्वत:साठी नसून आपल्या लोकांसाठी आहे, आणि पीडित आणि उपेक्षित लोक हेच आपले असतात हे लक्षात ठेवले पाहिजे. लोकशाही ही विकासाची वाहक व्हावी आणि सामान्य माणूस या विकासकार्यात सहभागी कसा होईल हे पाहिले पाहिजे. लोकशाही स्वत:च्या विकासासाठी नसून सर्वांच्या विकासासाठी आहे. ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधींनी आपल्या क्षेत्रात स्वावलंबी जीवन विकसित करायला हवे, तरच देश सुखी आणि समृद्ध होण्याचा मार्ग सुकर होणार आहे.'

विकास म्हणजेच संपूर्ण क्रांती आणि राजनीती हा संघर्ष नाही, समन्वय आहे, असेही ते मानत असत. कोणताही समाज हा आपल्या सामर्थ्य आणि कर्तृत्वाने मोठा आणि स्वयंपूर्ण होतो. केवळ सरकार, शासन, समाजोद्धार करू शकत नाही, असे ते कळकळीने सांगत.

खरे तर समाजविकासासाठी नैतिकतेचा पाया मजबूत हवा. या देशाचे काय होणार, असा प्रश्न आज सर्वांना पडला आहे. सत्ताधीश व कोट्यधीश यांनी देशभर व्यभिचार व भ्रष्टाचार माजवला आहे. अशा परिस्थितीत मिळालेल्या पद्मविभूषण या पदवीलाही काही अर्थ राहिलेला नाही, असे त्यांचे मत होते. त्यावर बोलताना त्यांनी म्हटलेय की, प्रत्येकाने आधी स्वत:कडे वळून पाहिले पाहिजे. ते म्हणतात, की ज्या सामाजिक जीवनाची, चारित्र्यशील आणि नैतिक जीवनाची आपण अपेक्षा करतो, त्यानुसार आपण आधी वागायला सुरुवात केली पाहिजे. म्हणजे त्या प्रश्नाचे अस्तित्वच उरणार नाही. मानवतेचे सार आहे सदाचार, सदाचाराची सदैव साधना प्रत्येकाच्या घरातील जीवनाचे अभिन्न अंग आहे. असे वातावरण आपल्या गावात निर्माण करावे लागेल. प्रत्येक व्यक्तीने या विषयामध्ये दुसऱ्याकडे पाहू नये. स्वत:हून प्रत्येकाने सदाचाराच्या रस्त्यावर अविरतपणे चालत राहावे. यामुळेच परस्पर प्रेम, विश्वास, सहकार्याचे जीवन निर्माण होईल. हाच राष्ट्राला वैभवाकडे नेणारा मार्ग आहे.

सर्वसाधारणपणे देशाला आणि समाजाला ज्या समस्या भेडसावत असतात त्याबद्दल त्यांची कळकळ दिसून आली आहेच. त्यावर बोलताना त्यांनी म्हटले आहे की, तथाकथित विकसित देश अविकसित देशांचे शोषण करत आहेत. विषमता, बेकारी आणि प्रदूषण यामुळे जनजीवन झिजत चालले आहे आणि ज्यांना शिक्षणाचा गंध नाही असे लोक शिक्षणनीती निश्चित करीत आहेत. लोकशाहीला सामान्य लोकांच्या विकासाचे साधन बनवावे अशी म्हणूनच देशातील जागरूक नागरिकांना माझी विनंती आहे. या जगात जेव्हा केव्हा मानव समाजाच्या निवनिर्माणाची आणि परिवर्तनाची वेळ येते तेव्हा तरुण पिढीच पुढे येते. परिवर्तनाचे स्वागत कधी वृद्धांनी केले नाही. आज आमच्या देशाला परिवर्तनाची गरज आहे. तरुणांनी ही जबाबदारी घेतली पाहिजे.

नानाजींना तरुणांबद्दल अत्यंत प्रेम आणि तेवढीच त्यांच्याकडून अपेक्षा आहे. त्यांच्या मते ज्याला दिवसातील २४ तास कमी पडतात तो तरुण, ज्याला २४ तास खावयास उठतात तो म्हातारा. स्वास्थ्य चांगले किंवा खराब राहणे हे

अधिकांशपणे मनाच्या स्थितीवर अवलंबून आहे.

संस्थेसाठी काम करताना त्यांना नि:स्वार्थपणाची अपेक्षा आहे. ते म्हणतात की, जेव्हा संस्थेसाठी व्यक्ती ही अडचण ठरते तेव्हा व्यक्तीने आपला स्वत:चा विचार बाजूला ठेवून संस्थेचे हित जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मी कधीच पुरस्कार मिळावा या लालसेने कार्य केले नाही आणि कुणीही त्या लालसेने काम करू नये. जोपर्यंत स्वत: कठोर होऊन नियम बनवून त्याचे पालन करणार नाही, तोपर्यंत इच्छित कार्य आपल्या हातून होणार नाही. जर जीवनात प्रगती करायची असेल तर स्वत:च स्वत:साठी नियम बनवून त्याचे पूर्णपणे पालन केल्यास प्रगतीकडे जाण्यासाठीचे द्वार मोकळे होते.

नानाजी तळमळीने सांगतात की, केवळ बौद्धिक चिंतनातून, अर्थपूर्ण गीतांतून समाज घडत नाही. उच्च विचार, व्यवहार होणे आवश्यक आहे. प्रत्येक शिबीर, बैठकांतून सर्वमान्य व्यक्तिमत्त्वाचा नानाजी आग्रह धरतात. भोवतालच्या समाजातील प्रत्येक घटकास हे जाणवायला हवे की, ही व्यक्ती निष्कलंक, चारित्र्यसंपन्न, जात, पंथ, संप्रदाय, पक्ष, वर्ग यांच्या पलीकडे जाऊन अजातशत्रू असावी. कोणत्याच क्षेत्रात सर्वमान्य व्यक्तिमत्त्व उरलेले नाही. म्हणून समाज दिशाहीन होत आहे. देश महान होण्यासाठी भावी नागरिक अर्थात लहान मुले संस्कारित व्हायला हवीत. सामान्यातला सामान्य माणूसही त्याच्यामधील गुणांचा विकास होत राहिल्यास असामान्य कर्तृत्वाचा धनी होऊ शकतो. आपला इतिहास दाखवतो की, अनेक महापुरुष साधारण परिवारातूनच आले आहेत. तसे पाहता हा विकास बाल्यावस्थेपासूनच होणे आवश्यक आहे; परंतु याकडे कोणाचेही लक्ष दिसत नाही. हे काम केले गेल्यास आपल्या समाजाची नवी पिढी अधिक कर्तृत्वशाली होऊ शकेल, हा माझा दृढ विश्वास आहे.

**यशाची गुरुकिल्ली**

स्वराज्याचा अर्थ आहे स्वावलंबन. परकीय शासकांच्या हातून सत्ता देशी शासकांच्या हाती येणे हाच केवळ स्वराज्याचा अर्थ होऊ शकत नाही.


स्वराज्याचा अर्थ काही निवडक लोकांचे राज्य असा नाही. त्याचा अर्थ देशाच्या आम जनतेचे राज्य असा आहे. जे आपल्या गावाच्या प्रगतीचा विचार करतात, अशा सर्वच लोकांचे राज्य. ज्यांना वाटते की, त्यांच्या गावातील सगळे लोक सुशिक्षित आणि समजदार असावेत, गावात पाण्याचे दुर्भिक्ष नसावे, पिण्याच्या पाण्याची सोय असावी, मुलांना खेळण्यासाठी स्वच्छ मैदाने असावीत,

चांगली साधने उपलब्ध असावीत, फुलझाडे असावीत, प्रत्येक व्यक्तीला आपल्या मेहनतीतून अर्थार्जन करण्याची संधी असावी, याला स्वराज्य म्हणावे.

हे काम सन १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ताबडतोबच हातात घेणे आवश्यक होते; परंतु आजपर्यंत अनेक वेळा शासनकर्ते बदलूनही त्याकडे दुर्लक्ष झाले. ज्या कामांमुळे देशाच्या सर्वसाधारण माणसाचे भले होईल आणि त्यामध्ये गावातल्या निरक्षर माणसांचाही सहभाग असेल! ही स्थितीच यशाची गुरुकिल्ली आहे.

■





# नानाजींचे व्यक्तिमत्त्व

नानाजी स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचे, मोकळ्या मनाचे, सगळ्यांत मिसळणारे, सर्वांना सारखे वागवणारे होते, मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा, श्रीमंत, गरीब, लहान अथवा मोठा असो. नानाजी नेहमी म्हणत, प्रत्येकाने काम करीत राहिले पाहिजे, नुसता देखावा नको. नानाजींचे जीवन सर्वसमावेशक, दिव्य, व्यापक, अनेक गुणांनी परिपूर्ण होते. दुरून पाहिले तर हिमालयाची शिखरे बर्फाच्छादित दिसतात; पण जवळ जाताच त्याची व्यापकता विशालता, समृद्धी लक्षात येते. तसेच नानाजींचे व्यक्तिमत्त्व उत्तुंग होते.

नानाजींचे कर्तृत्व उच्च स्थानावर होते. ज्या ज्या क्षेत्रांत त्यांनी डोकावले तेथे त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा दिसून आला. त्यांनी नेहमी यशच मिळवले. अपयशाला जवळ फिरकू दिले नाही. त्यामागचे कारण म्हणजे त्यांचा गाढा अभ्यास. त्यांनी जो जो विषय हाताळला त्याची काही माहिती नसतानाही त्या विषयाचा प्रथम अभ्यास करीत विषयाच्या खोलात जात. अगदी बारीकसारीक तपशिलासह जोपर्यंत त्यांचे समाधान होत नाही तोपर्यंत विषयाचा अभ्यास करीत. विषयात प्रावीण्य असणाऱ्यांची भेट घेतील, चर्चा करतील; मग ती व्यक्ती लहान असो की मोठी. या त्यांच्या स्वभावामुळे त्यांनी शेती, स्थापत्य, कला, मानसशास्त्र, आरोग्य, काष्ठशिल्प, पेंटिंग अशा विविध सर्वच क्षेत्रांत प्रावीण्य मिळवले.

नानाजी सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, सुधारक, निर्माणकार, रचनाकार होते. नानाजी जेव्हा भाषणे देत तेव्हा त्यांचे शब्द समोरच्या व्यक्तीच्या मनाला स्पर्श करीत असत. कारण त्यांचे बोलणे मनापासून, अंत:करणापासून असे.


ते उत्तम चित्रकार होते. पिलानी येथे कॉलेजमध्ये असताना चित्रे काढण्यात ते रंगून जात. ते उत्तम वास्तुशास्त्रज्ञही होते. त्यांचा त्यात सखोल अभ्यास होता. त्याचा एक नमुना म्हणजे दीनदयाल शोध संस्थान, दिल्ली येथील वास्तू. त्याचे नकाशे त्यांनी स्वत:च काढले. त्यांच्या विचारांतूनच आरोग्यधामचे लँडस्केपिंग झाले. नानाजींना त्या त्या विषयाच्या तज्ज्ञापेक्षा कांकणभर तरी अधिक माहिती असायचीच.

त्यांना घरगुती औषधांचीही बरीच माहिती होती. ते पुष्कळदा त्याबद्दल मार्गदर्शन करीत.

नानाजींना खेळाचीदेखील आवड होती. ते फुटबॉल, हॉकी, कबड्डी या खेळांमध्ये चांगले पारंगत होते. बॅडमिंटनही खेळत असत. नानाजींना साहित्य, शास्त्रीय संगीत आदी कलांची भरपूर माहिती होती. लोकसंगीत आणि लोकसंस्कृतीचा अभ्यासही त्यांनी केला होता. त्यांना गावातील शेती, शिल्पकौशल्य, उद्योग, खेळ, सुतकताई, विणकाम, शिवणकाम, रंगाई, छपाई इ.बद्दल चांगली माहिती होती. म्हणूनच नानाजींची गुणग्राहकता आणि समयसूचकता वाखाणण्यासारखी होती.

नानाजी देशमुख यांच्या प्रकल्पातील संशोधित प्रयोग राज्य व केंद्र शासनाने आपल्या कार्यक्रमात समाविष्ट करून घेतले, यातच त्यांचे द्रष्टेपण लक्षात येते.

■



# अजातशत्रू

एखाद्या व्यक्तीच्या मित्रमंडळाची आपण चर्चा करतो, तेव्हा त्या व्यक्तीची माणसे जोडण्याची कला, जिज्ञासू वृत्ती, त्याचा स्वभाव, दुसऱ्यासाठी कष्ट करायची वृत्ती, नि:स्पृह, नि:स्वार्थ, निष्काम कर्मयोग हे सगळे गुण विचारात घ्यावे लागतात. नानाजींचे मित्रमंडळ हा एक स्वतंत्र लेख लिहिण्याजोगा विषय आहे. परमेश्वराने वरील सर्व गुणांचे नानाजींना जणू वरदानच दिले होते. त्याबरोबरच दीर्घायुष्य आणि आरोग्य देऊन त्या कृपावंताने त्यांच्यावर वरदहस्तच ठेवला होता. त्यामुळेच त्यांना अनेक मित्र मिळाले, त्यांच्या सहवासात आले यात नवल नाही.

जगन्मान्य आठ पैलूंपेक्षाही जास्त पैलू असलेले नानाजींचे व्यक्तिमत्त्व विविध अंगांनी फुललेले, बहरलेले आपल्याला दिसते. नानाजींचे कार्य सर्व दिशांनी अनेक क्षेत्रांत विस्तारलेले पाहायला मिळते. त्यामुळेच त्यांचा संबंध निरनिराळ्या क्षेत्रांतील व्यक्तींशी येत गेला. त्या त्या क्षेत्रातील संबंधितांशी त्यांची जुजबी ओळख न होता त्या व्यक्ती त्यांचे मित्र बनत गेल्या. माणसे जोडणे, जोडलेल्या माणसांशी संबंध टिकवून ठेवणे या त्यांच्या वृत्तीमुळेच त्यांचा मित्रपरिवार दांडगा होता. 'काम संपले की संबंध संपला' ही वरवरची तात्पुरती जवळीक त्यांना आवडत नसे. क्षेत्र कुठलेही असो, नानाजी त्या क्षेत्रातील सर्वसामान्यांपासून ते

अगदी उच्चपदस्थांपर्यंत ओळख वाढवून आपुलकीने जवळीक प्रस्थापित करीत. सर्वांनाच ही कला अवगत नसते. नानाजींनी स्वत:जवळ असलेल्या या कलेचा जीवनात वेळोवेळी उपयोग करून घेतला. फिल्मी दुनियेपासून ते औद्योगिक, राजकीय, व्यापारी, शैक्षणिक, कृषी, विज्ञान एवढेच नव्हे तर चित्रकला, मूर्तिकला, संगीत, खेळ या विविध क्षेत्रांतील व्यक्तींशी नानाजींचे जिव्हाळ्याचे संबंध होते. विरोधी पक्षातील लोकांबरोबर त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. त्या अर्थाने नानाजी अजातशत्रूच होते असे म्हणावे लागेल. तत्त्वासाठी काही जणांशी वाद झाला असेल, तो होणेही स्वाभाविक होते; पण नानाजींनी शत्रू निर्माण केले नाहीत. ते कार्यकर्ते, प्रचारक, नेते झाले आणि शेवटी ते स्वत:च एक स्वतंत्र संस्था झाले. हे सर्व होत असताना आणि ते सर्व व्हावे म्हणूनच त्यांनी स्वत:चा पिंड एका वेगळ्या मुशीत घडवला, असे म्हणायला हरकत नाही. श्रीकृष्ण, शिवाजी, चाणक्य या लोकांनी आपल्या उद्देशावरून दृष्टी बाजूला न जाऊ देता, वेळ पडली तर मार्गात येणाऱ्या अडथळ्यांवर मात करण्यासाठी टोकाच्या आदर्शवादाला फाटा देऊन अंतिम ध्येय त्यांनी प्राप्त करून घेतले.

जे पक्ष आपला विरोध करतात, त्यांना शत्रू समजणे, जे लोक आपला विरोध करतात, त्यांच्याशी फटकून वागणे, असे न करता सर्वांसोबत चांगले संबंध ठेवून त्या संबंधांचा उपयोग वेळ पडल्यावर आपल्या चांगल्या कार्याला करून घेणे हे धोरण नानाजी ठेवत असत. नानाजींचा प्रामाणिकपणा, राष्ट्रनिष्ठा, वागण्यातला सहजपणा या गोष्टींमुळे लोक आपोआपच त्यांच्या जवळ येत. त्यांचे सर्वच क्षेत्रांत स्नेही होते. त्यांच्या स्नेह्यांमध्ये श्री. आबा पाठक, श्री. के.बी. देशपांडे, श्री. बाबासाहेब धनागरे, श्री. सुखदेवजी सोनी, श्री. अण्णासाहेब डबीर, श्री. बाबाजी सोनटक्के, श्री. व्ही.वाय. देशमाने, श्री. अनसिंगकर, श्री. कोल्हटकर, श्री. नारायण काळे, श्री. भाऊ पाठक, श्री. गंगाधर साने, श्री. दातार, श्री. शंकरलालजी सोनी, श्री. रंगनाथ देशपांडे आदींचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल.

नानाजींनी लोकमान्य टिळक, स्वा. सावरकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी, प.पू. डॉ. हेडगेवार यांच्याकडून देशकार्याची प्रेरणा घेतली. तत्कालीन सरसंघचालक प.पू. श्री. गुरुजी, प.पू. रज्जूभय्या, प.पू. बाळासाहेब देवरस आणि प्रचारक श्री. भाऊराव देवरस, श्री. दादाराव परमार्थ, श्री. बाबासाहेब आपटे, श्री. माधवराव मुळे, श्री. वसंतराव ओक, श्री. एकनाथजी रानडे, श्री. भिडेजी, श्री. यादवराव जोशी, श्री.

मोरोपंत पिंगळे, श्री. दत्तोपंत ठेंगडी, श्री. भय्याजी दाणी, श्री. देवल यांचा सहवास त्यांना मिळाला. सर्वांत जास्त सहवास मिळाला तो पं. दीनदयाल उपाध्याय यांचा. या संघ कार्यकर्त्यांच्या मालिकेत त्यांनी आदरणीय स्थान मिळविले होते.

जनसंघात असताना त्यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, श्री. अटलबिहारी वाजपेयी, श्री. लालकृष्ण अडवाणी, श्री. मुरली मनोहर जोशी, श्री. सुंदरसिंह भंडारी, राजमाता विजयाराजे सिंधिया, श्री. देवप्रसाद घोष, श्री. प्रेमनाथ डोग्रा, श्री. पीतांबर दास, डॉ. रघुवंशी, श्री. राजनाथसिंह, श्री. लालजी टंडन, श्री. गिरीराज किशोर इत्यादींसोबत काम केले.

नानाजींचा पिंड संघनिष्ठेशी बांधला गेला असला तरी अन्य विचारसरणींची, भिन्न तत्त्वप्रणालींची माणसे त्यांनी अस्पृश्य मानली नाहीत. म्हणूनच राजकीय क्षेत्रात त्यांचा वावर असताना विरोधी पक्षातील शिवसेनेचे श्री. मनोहर जोशी, स्वतंत्र पक्षाचे श्री. पिलू मोदी, समाजवादी श्री. रामकृष्ण हेगडे, श्री. रवी रे इत्यादी त्यांच्या मित्रमंडळात होते. अनेक क्षेत्रातील मान्यवर त्यांचा सल्ला वेळोवेळी घेत असत.

काँग्रेसमधील पूर्व पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री, श्री. मोरारजी देसाई, श्री. चंद्रशेखर, श्री. पी.व्ही. नरसिंहराव, श्री. मनमोहनसिंग, पूर्व केंद्रीयमंत्री श्री. रफिक अहमद किडवई, श्री. चिंतामणराव देशमुख, श्रीमती बेगम अब्दुल्ला, श्री. कामराज, श्री. निजलिंगप्पा, श्री. शरद पवार, श्री. शंकरराव चव्हाण, श्री. शाहनवाज हुसेन, श्री. मोहन धारिया, श्री. ए.आर. अंतुले, श्री. जॉर्ज फर्नांडिस, श्री. चरणसिंग, श्री. काशीराम राणा, पं. गोविंद वल्लभ पंत, पंजाबचे उपमुख्यमंत्री श्री. बलराज टंडन, राज्यपाल श्री. विष्णुकांत शास्त्री, उत्तर प्रदेशचे पूर्व मुख्यमंत्री श्री. संपूर्णानंद, श्रीमती वसुंधरा राजे, श्री. नारायण दत्त तिवारी, श्री. मुलायमसिंग यादव, श्री. नितीशकुमार आणि यांच्यासारख्या काँग्रेसमधील अनेक राजकारण्यांशी, तसेच श्री. फारुक अब्दुल्ला, श्री. पुरुषोत्तमदास टंडन, बॅरिस्टर श्री. एम.सी. छागला, विधिज्ञ श्री. राम जेठमलानी, श्री. बाबा राघवदास तसेच श्री. मधू लिमये, श्री. राम मनोहर लोहिया, श्री. सुरेंद्र मोहन, श्री. राजनारायण, श्री. हमीद दलवाई, श्री. एस.एम. जोशी, श्री. अच्युतराव पटवर्धन, श्री. रवींद्र वर्मा, श्री. मोईनुद्दीन, साम्यवादी पक्षाचे श्री. झेड.ए. अहमद, जनता पक्षाचे स्वामी सुब्रह्मणियम यांच्यासारख्या समाजवाद्यांशीही त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते.

आचार्य विनोबा भावेंच्या नेतृत्वाखाली चालविल्या गेलेल्या भूदान चळवळीत प.पू. गुरुजींच्या आज्ञेप्रमाणे त्यांनी भाग घेतला. तिथे त्यांची लोकनायक जयप्रकाश नारायण यांची भेट झाली. पुढे जन्मभर ही मैत्री अखंड राहिली. या मित्रत्वाच्या नात्याची नोंद भारताच्या राजकीय इतिहासाला घ्यावीच लागेल. या भूदान चळवळीत श्री. आत्माराम गोविंद खेर, श्री. हरेकृष्ण मेहताब, श्री. आर.के. पाटील यांच्यासारखे मित्र लाभले.

सामाजिक क्षेत्रात काम करणारे श्री. अण्णा हजारे, श्री. गंगाशरण सिंह हेही त्यांच्या मित्र परिवारापैकीच होते. श्री. पु.ल. देशपांडे, श्री. राम शेवाळकर, श्री. दत्तप्रसाद दाभोळकर, श्रीमती दुर्गाबाई भागवत, श्री. जयंत साळगावकर, श्री. अभय बंग आणि श्री. हनुमानप्रसाद पोतदार आणि साहित्य वर्तुळातील दिग्गज त्यांचे मित्र होते.

कर्मकांडाचे त्यांना वावडे असले तरी त्या क्षेत्रातील थोर तत्त्वचिंतक शंकराचार्यांपासून स्वामी चिन्मयानंदांपर्यंत, मुरारी बापूंपासून ते रामकिंकर महाराजांपर्यंत, जैन मुनी महाप्रज्ञा, स्वामी सन्मित्रानंद महाराज, जयेंद्र महाराज, परमाचार्य चंद्रशेखर सरस्वती यांच्याशी मैत्री करण्यात त्यांना अवघड वाटले नाही.

प्रसिद्ध उद्योगपती आणि एक्स्प्रेस वृत्तसमूहाचे संचालक श्री. रामनाथजी गोयंका आणि नानाजी हे दोघे केवळ मित्रच नव्हे, तर देशाविषयी विचार करण्याची पद्धत आणि उत्कटता दोघांचीही सारखीच होती. त्यांच्यावर नानाजींचे इतके प्रेम होते की, त्यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मरणार्थ नानाजींनी चित्रकूट येथे मंदाकिनी नदीवर रामनाथ गोयंका घाट बांधून त्यांचा पूर्णाकृती पुतळा उभारला. ते ठिकाण आता पर्यटक तसेच यात्रेकरूंसाठी प्रेक्षणीय स्थळ बनले आहे. घनिष्ठ संबंधांमुळेच पुढे कित्येक वर्षे नानाजी एक्स्प्रेस टॉवर्सचे ट्रस्टी होते. अनेक उद्योगपतींशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. त्यात श्री. जे.आर.डी. टाटा, श्री. रतन टाटा, श्री. घनश्यामदास बिर्ला, श्री. धीरूभाई अंबानी, बाँबे डाईंगचे श्री. नस्ली वाडिया, ओरिएन्टल कार्बनचे श्री. जे.पी. गोयंका, महेंद्रा आणि महेंद्राचे श्री. केशूभाई पटेल, रॅलीज इंडियाचे चेअरमन श्री. दरबारी सेठ, श्री. सिंघानिया, श्री. स्वराज पॉल, श्री. निर्मल सेठिया, टेल्कोचे चेअरमन श्री. सुमंत मुळगावकर, श्री. जयपुरिया, श्री. आर.व्ही. पंडित, श्री. बकुल पटेल, श्री. राम बात्रा, श्री. मौलिचंद्र शर्मा, श्री. ललित थापर, श्री. मधुहरी दालमिया, टाटाचे व्हाईस चेअरमन श्री. जे.डी. चोक्सी, व्हिडिओकॉनचे श्री. धूत आणि राष्ट्रवादी पक्षाचे संभाजी बिडी

कारखान्याचे मालक श्री. साबळे यांचा समावेश होता.


चित्रपट व्यावसायिक आणि संगीत क्षेत्रातील मान्यवरांशी नानाजींचे मित्रत्वाचे संबंध होते. श्री. हरिप्रसाद चौरसिया, श्रीमती लता मंगेशकर, श्री. अनुप जलोटा, श्री. श्रीधर फडके, श्री. लक्ष्मीकांत प्यारेलाल, कवी श्री. अंजान, श्री. गुलजार, श्री. जगदीश कुलकर्णी आणि नेहरू घराण्याचे निकटवर्ती कवी श्री. रामधारीसिंह (दिनकर) हे संगीत क्षेत्रातील श्रेष्ठ कलाकार त्यांचे स्नेही होते.

श्री. अमिताभ बच्चन, श्री. शत्रुघ्न सिन्हा, श्री. देव आनंद, श्री. पृथ्वीराज कपूर, श्री. मनोजकुमार, श्री. राजदत्त, इ. कलाकारही त्यांच्या संपर्कात असत. देशाचे प्रथम नागरिक असलेले राष्ट्रपती सर्वश्री नीलम संजीव रेड्डी, श्री. ए.पी.जे. अब्दुल कलाम, उपराष्ट्रपती के.आर. नारायणन, श्री. शेखावत यांनाही नानाजींच्या कार्याचे खूप अप्रूप वाटत असे. म्हणूनच त्यांना नानाजींशी मैत्री करावीशी वाटली.

अनेक पत्रकारांना नानाजींच्या समाजकार्याने वेड लावले होते. म्हणूनच विविध वृत्तपत्रांचे प्रतिनिधी त्यांचे कार्य प्रसिद्धीस आणत असत. या पत्रकारांमध्ये श्री. आलोकजी, श्री. प्रभाष जोशी, श्री. गोपाल राजू, श्री. अतुल जैन, श्री. मुझुमदार, श्री. कुलदीप नय्यर, श्री. गुरुमूर्ती, श्री. अवधेश कुमार, साम्यवादी पक्षाचे श्री. आर.के. करंजिया आदींचा उल्लेख करावा लागेल.

या विविध क्षेत्रांतील प्रभृतींच्या सहवासामुळे अनुभवसंपन्न झालेले नानाजींचे व्यक्तिमत्त्व, ज्यांना नानाजींच्या सहवासाचा लाभ झाला त्यांचेही जीवन फुलून-बहरून येण्यास किंवा त्यांच्यावरही तसेच संस्कार करण्यास कारणीभूत ठरले. नानाजींनी सहवासात आलेल्या प्रत्येकाशी जिव्हाळ्याचे आणि घरोब्याचे संबंध प्रस्थापित केले. तोच आदर्श आपण आपल्यासमोर ठेवून आचरण केले तर तीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

■



# नानाजींचे विदेशभ्रमण

नानाजींनी त्यांच्या नवनिर्माणाच्या कार्यकाळात परदेशांना भेटी दिल्या. ज्या देशातून जे जे घेण्यासारखे आहे ते त्यांनी नि:संकोचपणे घेतले आणि अमलात आणण्याचा प्रयत्न केला. शेती, आधुनिक तंत्रज्ञान याविषयीची सखोल माहिती मिळवली. त्यासाठी त्यांनी पूर्व-पश्चिमेकडील मोजक्या देशांना भेटी दिल्या.

अमेरिका, इंग्लंड, क्युबा, कॅनडा, जर्मनी, द. कोरिया, जपान, हाँगकाँग, सिंगापूर, थायलँड, डेन्मार्क, मेक्सिको, केनिया इ. देशांमध्ये चालत असलेल्या विविध विधायक कार्यांचा त्यांनी अभ्यासही केला तसेच तेथील लोकांना आपल्या कामाची ओळख करून दिली व मार्गदर्शन केले.

१९८०-८१ मध्ये द. कोरियाच्या निमंत्रणावरून नानाजी द. कोरियाला गेले व शेती उद्योगाचा अभ्यास केला. त्याच काळात त्यांनी जपानला भेट दिली. तेथे ते एका खेड्यातल्या शेतकऱ्याच्या घरी राहिले आणि त्यांनी तेथील शेतीचा अभ्यास केला. कमी बियाणे वापरून जास्त धान्य कसे काढतात या पद्धतीचा त्यांनी अभ्यास केला. ती पद्धत त्यांनी गोंडा येथे अमलात आणली. या दौऱ्यादरम्यान विश्रामगृहात वास्तव्यात असताना तेथील शिक्षणमंत्री आणि उद्योगमंत्री त्यांच्या संपर्कात आले. त्यांच्याशी चर्चा चालू असताना त्या मंत्र्यांनी 'जपानबद्दल आपले काय मत आहे?' असा प्रश्न केला, तेव्हा प्रथम नानाजींनी उत्तर देण्याचे टाळले;

पण नंतर लोकांच्या आग्रहास्तव आणि भारतीय राजदूताच्या सांगण्यावरून आपले मत प्रदर्शित केले. ते म्हणाले,'मला जपानचे भवितव्य अंधकारमय दिसते. कारण येथे मशिनरी मोठ्या प्रमाणात वापरली जाते. ती मशिनरी उपयोगात आणण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा असेल तरच मशीन्सचा उपयोग होईल. जपान जरी प्रगत देश असला तरी त्याला दुसऱ्यावर विसंबून राहावे लागते.' नानाजींचे हे परखड मत ऐकून जपान सरकारने बोध घेतला, मंत्र्यांनी धडा घेतला. याचाच परिणाम म्हणून जपान सरकारने वृक्ष लागवडीची मोहीम हाती घेतल्याचे पुढे समजले. नानाजींच्या अशा संशोधक वृत्तीचा लाभ इतर देशांनीही करून घेतलेला आहे.

१९८० मध्ये त्यांनी डेन्मार्कला भेट दिली. तेथील अर्थव्यवस्था दुग्धव्यवसायाबरोबर मांसप्रक्रियेवर अवलंबून आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे दुग्धव्यवसायाला तो जोडधंदा भारतात उपयोगी होऊ शकत नाही हे त्यांनी जाणले. ऑगस्ट १९८६ मध्ये अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीयांकडून अपेक्षित निधी संकलनासाठी नानाजी गेले होते.

०६ ऑक्टोबर १९८६ रोजीच्या पत्रात नानाजी परदेश प्रवासाविषयीचे त्यांचे उद्देश स्पष्ट करतात. प्रामुख्याने त्यात दोन गोष्टींचा ते समावेश करतात. पहिली अर्थसंकलन आणि दुसरी ग्रामविकासाचे तेथे चाललेले कार्य-निरीक्षण. नानाजींनी मेक्सिको, जर्मनी येथे संकरित गायींच्या जातीची पाहणी केली. त्या धर्तीवर आपल्या देशातील श्रेष्ठ जातीच्या वळूद्वारे गायी संकरित केल्या तर त्याही जास्त दूध देतील असे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी त्याप्रमाणे तसे प्रयोग केले आणि ते यशस्वीही झाले.

लंडनला फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजच्या परिषदेला नानाजी उपस्थित राहिले. मुख्य वक्ता म्हणून त्यांचे तेथे भाषण झाले. त्या परिषदेमध्ये त्यांची भेट प्रसिद्ध उद्योगपती श्री. स्वराज पॉल, श्री. नंदा, श्री. श्रीचंद्र, श्री. निर्मल सेठिया यांच्याशी झाली. पुढे या उद्योगपतींनी नानाजींना त्यांच्या प्रकल्पात भरीव मदत केली.

लंडनहून नानाजींनी न्यूयॉर्कला प्रयाण केले. न्यूयॉर्कहून 'इंडियन ॲब्रोड' नावाचे वृत्तपत्र निघत होते. त्याचे संपादक गोपाळ राजू त्यांच्या विक्षिप्त स्वभावासाठी प्रसिद्ध होते. त्यांना न भेटण्याविषयी अनेकांनी नानाजींना सल्ला दिला. तरी मोठ्या निग्रहाने नानाजींनी त्यांना फोन केला आणि भेटीची वेळ ठरविली. दुसऱ्या दिवशी

त्या वृत्तपत्रात नानाजींच्या फोटोसहित भेटीचे संपूर्ण वृत्त छापून आले आणि आपोआपच प्रसिद्धीही मिळाली. अभिनंदनाचे अनेक फोनही आले, जनसंपर्क वाढला. नानाजींनी इंग्लंड, कॅनडा आणि काही आफ्रिकन देशांना दिलेल्या भेटींमधील काही ठळक कार्यक्रमांचा हा आढावा :

- श्री. ढोलकिया यांनी हाऊस ऑफ लॉर्डस येथे १२ऑक्टो.१९९८रोजी नानाजींचा सत्कार ठेवला होता. तो उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

- इंडिया सोसायटी आणि हिंदू कल्चरल सोसायटीतर्फे युवकांचा मेळावा आयोजित केला होता. सेंट जॉन्स कॉलेज ऑफ ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटीतर्फे १३ ऑक्टो.१९९८ रोजी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या मेळाव्यात ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. नानाजींनी पं. दीनदयालजींची ध्येय-धोरणे सांगितली. पंडितजींच्या एकात्म मानव दर्शनाच्या तत्त्वज्ञानावर उद्‌बोधनपर भाष्य केले.

- १७ ऑक्टो.१९९८ रोजी मँचेस्टर येथील भारतीय संघटनांनी दिवाळीनिमित्त मेळावा आयोजित केला होता. त्यांच्यासाठी नानाजींनी दिवाळीनिमित्त बौद्धिक घेतले.

- २१ ऑक्टो.१९९८ रोजी हाय कमिशनर ऑफ इंडिया यांनी गांधी हॉल, इंडिया होममध्ये नानाजींना रिसेप्शन दिले.

- नानाजींची कॅनडामधील टोरँटो येथील बैठक चांगली आणि अर्थपूर्ण झाली. त्यात दोन गोष्टी प्रामुख्याने चर्चिल्या गेल्या. पहिली म्हणजे दीनदयालजींची एकात्म मानववादाची कल्पना व्यवहारात कशी आणता येईल हे पाहणे आणि दुसरी गोष्ट म्हणजे लाखो हिंदू परदेशस्थ नागरिक झाले आहेत त्यांच्या मनात आपल्या मातृभूमीबद्दल आस्था आहे की नाही हे तपासून पाहणे आणि त्यांच्या मुलांच्या भवितव्याचा वेध घेणे.

- आपल्याकडील अशी संतमंडळी की अमेरिकन लोकही त्यांचे शिष्य झालेले आहेत, त्यांचा तेथील आणि भारतातील सामाजिक विकासासाठी कशाप्रकारे उपयोग करून घेता येईल हाही विचार नानाजींच्या चिंतनाचा विषय होता. जे लोक विधायक कार्यासाठी निधी देण्यास तत्पर आहेत, ज्यांच्या मनात भारताबद्दल आत्मीयता आहे, जे भारताप्रती चिंतित आहेत, ज्यांच्या मनात पंजाब-काश्मीरचा जटिल प्रश्न घोंघावतो आहे, अशांशी कायम संपर्कात राहणे हे भारतासाठी फायद्याचेच आहे अशी नानाजींची धारणा होती. त्याचा उपयोग भारताच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी होईल असा आशावाद नानाजींच्या मनात असे.

नवी दिल्ली येथे आयोजित इंटरनॅशनल कॉन्फरन्स फॉर रुरल डेव्हलपमेंटसाठी केनियन डेलिगेशन आले होते. त्यांनी गोंडा प्रकल्पाला भेट दिली. ग्रामविकासाचे तेथे चाललेले कार्य आणि त्याचे तंत्रज्ञान याबद्दलच्या डेलिगेशनच्या वृत्तांतावरून केनियन सरकारने नानाजींना निमंत्रण पाठविले. जानेवारी १९८६ मध्ये नानाजींनी केनियाला भेट दिली. केनियन सरकारने ग्रामीण भागात विकास कसा साधता येईल याबद्दल मार्गदर्शन करण्यासाठी नानाजींना बोलावले होते. या परदेशवारीमध्ये त्यांनी नायजेरियालाही भेट दिली. तेथील आदिवासी, कार्यकर्त्यांना विकासाची चतु:सूत्री समजावून सांगितली. तेथील ग्रामीण प्रकल्पांना भेटी दिल्या.

■



# अखेरची यात्रा

नानाजींनी २७ फेब्रुवारी २०१० रोजी सायंकाळी ८ वाजून ४५ मिनिटांनी चित्रकूट येथील जानकी कुंड येथे अखेरचा श्वास घेतला. त्यांचा देह अखेरच्या दर्शनासाठी चित्रकूट उद्यमिता विद्यापीठाच्या प्रांगणात दीनदयाल उपाध्याय यांच्या पुतळ्यासमोर ठेवण्यात आला. हजारो लोकांनी अंतिम दर्शन घेतले. निधन वार्ता ऐकून मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान त्यांच्याबरोबर त्यांचे अनेक सहयोगी मंत्री, सांसद विधायक, कार्यकर्ता येऊन त्यांनी अखरेचे दर्शन घेतले. याव्यक्तिरिक्त चित्रकूटचे संत, महंत, मठाधिपती, ज्यामध्ये निर्मोही आखाड्याचे महंत ओंकारदासजी महाराज, तुलसीपीठाचे जगद्‌गुरू रामभद्राचार्य, आचार्य आश्रमाचे राजगुरू संकर्षण प्रपन्नाचार्य महाराज, रामायणी कुटीचे महंत रामहृदयदास तसेच उत्तर प्रदेश, मध्यप्रदेशचे सीमेलगतच्या जिल्ह्यातील काँग्रेस, सपा, भाजपचे वरिष्ठ प्रशासनिक अधिकारीगण होते. नानाजींना मध्यप्रदेश शासनाद्वारे सलामी देण्यात आली. दिल्ली विमानतळावर देखील अखेरचे दर्शन घेण्यासाठी गर्दी झाली होती. लोकसभा अध्यक्ष करिया मुंडा, लोकसभेच्या विपक्ष नेत्या सुषमा स्वराज, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते अरुण जेटली, भाजप अध्यक्ष नितीन गडकरी, माजी अध्यक्ष राजनाथसिंह, सर्व नेते आणि कार्यकर्ते होते. त्यांच्या पार्थिवासोबत खासदार श्री. अनिल माधव दवे, दीनदयाल शोध संस्थानचे

अध्यक्ष वीरेंद्रजित सिंह, मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान आले होते.

त्यांचा देह दीनदयाल शोध संस्थानमध्ये आणला गेला. पूर्व राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम आणि दीनदयाल शोध संस्थान परिवाराने त्यांना श्रद्धांजली अर्पित केली.

त्यानंतर त्यांचा देह सर्वांच्या दर्शनासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक कार्यालयात नेण्यात आला. 'केशवकुंज' येथे त्यांच्या अखेरच्या दर्शनासाठी बरीच मोठी गर्दी झाली. संघाचे सरकार्यवाह सुरेशजी जोशी, सहसरकार्यवाह सुरेश सोनी, प्रचारकप्रमुख श्री. मदनदास देवी, माजी उपपंतप्रधान श्री. लालकृष्ण अडवाणी, भाजपाध्यक्ष नितीन गडकरी, भाजपचे नेते मुरली मनोहर जोशी, श्रीमती सुषमा स्वराज, अरुण जेटली, विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष अशोक सिंघलजी, गुजराथचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी, छत्तीसगडचे मुख्यमंत्री रमणसिंह, उत्तराखंडचे मुख्यमंत्री रमेशचंद्र पोखरीयाल, बिहारचे उपमुख्यमंत्री सुशीलकुमार मोदी, झारखंडचे उपमुख्यमंत्री रघुवरदास यांनी अंतिम दर्शन घेतले. श्रीमती वसुंधरा राजे यांनी अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थानमध्ये दर्शन घेतले. लोकसभा अध्यक्ष मीराकुमारी, कृषिमंत्री शरद पवार, कर्नाटकचे मुख्यमंत्री बी.एस. येदियुरप्पा, समाजवादी नेते श्री. सुरेंद्र मोहन, गांधीवादी चिंतक श्री. विमल प्रसाद, के.एन. गोविंदाचार्य, माजी मुख्यमंत्री उमा भारती, प्रसिद्ध भजन गायक अनुप जलोटा, सरसंघचालक श्री. मोहनजी भागवत, पूर्वसरसंघचालक श्री. कुपसी सुरदर्शन, खासदार बाळ आपटे, झारखंडचे मुख्यमंत्री अर्जुन मुंडा, दीनदयाल शोध संस्थानच्या उपाध्यक्ष पूर्णिमा अडवाणी, प्रभाकररावजी मुंडले, आचार्य गिरिराज किशोर, शिवराज पाटील, रतन टाटा यांनी अंतिम दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली.

■



# नानाजींना मिळालेले पुरस्कार

१. रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठान पुरस्कार, सातारा : १९९५
२. आंतरराष्ट्रीय फेडरेशन फॉर वुमन ॲग्रिकल्चरल अवॉर्ड : १९९५ श्री. एम.एस. स्वामीनाथन-प्रेसिडेन्ट ऑफ इंटरनॅशनल फेडरेशन फॉर वूमन इन ॲग्रिकल्चर यांच्या हस्ते.
३. अहिल्याबाई होळकर पुरस्कार : सर्वप्रथम मानकरी
४. पर्सन ऑफ दी इअर : १९९६-९७
   रोटरी इंटरनॅशनल आणि डिस्ट्रिक्ट ३१९०, दिल्ली
५. मानव हंस सन्मान : १९९७
६. राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार, आर.जी. जोशी फाऊंडेशन, मुंबई : १९९७
७. पद्मविभूषण : १९९९
   ग्रामीण क्षेत्रात विशेष सामाजिक कार्याबद्दल भारत सरकारद्वारा २६ जानेवारी १९९९ प्रजासत्ताकदिनी नानाजी देशमुख यांना पद्मविभूषण हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. हा पुरस्कार राष्ट्रपती भवनामध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते दि.२३ मार्च १९९९ रोजी देण्यात आला.
८. भाऊराव देवरस स्मृती सेवा पुरस्कार : १९९९-२०००
   भाऊराव देवरस स्मृती सेवा सन्मान पुरस्कार मा. सरसंघचालक प.पू. रज्जूभय्या यांच्या हस्ते.
९. नागरी सत्कार- हेडगेवार स्मृती रुग्ण सेवा मंडळ, हिंगोली : १९९७
१०. डी.लिट. : १. १९९७ - पुणे विद्यापीठ, महाराष्ट्र व अजमेर विद्यापीठ राजस्थान. २. १९९८ - महर्षी दयानंद सरस्वती विश्वविद्यालय.

३. २००० -    छत्रपती शहाजी महाराज विद्यापीठ, कानपूर
४. २००१ -    बुंदेलखंड विद्यापीठ, झाशी
५. २००१ -    बडोदा विश्वविद्यालय
६. २००८ -    करवीर विद्यापीठ, कोल्हापूर

११. नॅशनल सिटीझन अवॉर्ड : नॅशनल सिटीझन कमिटी, दिल्ली २००१
नानाजींनी केलेल्या नॅशनल इंटिग्रेशन ॲण्ड ट्रायबल वेल्फेअर या कामासाठी ऑनरेबल चेअरमन ऑफ यूनो ह्युमन राईटस् ॲण्ड कमिशन (राष्ट्रसंघ) जस्टिस पी.एन. भगवती यांच्या हस्ते.

१२. इंडिया टुडे : २००३ - सर्वोत्कृष्ट ५० व्यक्तींमध्ये समावेश.

१३. जीवनगौरव पुरस्कार चतुरंग प्रतिष्ठान मुंबई : २००३
समाजकार्यासाठी स्वत:चे आयुष्य निरपेक्षपणे झोकून देऊन समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांत मोलाची भर घालण्याच्या महत्कार्याबद्दल डॉ. अभय बंग यांच्या हस्ते.

१४. संत ज्ञानेश्वर पुरस्कार - संत ज्ञानेश्वर विद्यापीठ पुणे :
संत ज्ञानेश्वर विद्यापीठ, पुणे या संस्थेच्या रजत जयंती महोत्सवानिमित्ताने शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणणारे आणि संशोधन करून उल्लेखनीय योगदानाबद्दल.

१५. संत नानेश पुरस्कार : २००६
समता दर्शनाचे प्रणेते आणि समाजरचनेचे सूत्रधार आचार्य श्री. नानेश यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मा. उपराष्ट्रपती श्री. भैरवसिंह शेखावत यांच्या हस्ते.

१६. राष्ट्रीय महात्मा गांधी सन्मान : २००५-०६

१७. साहित्य वाचस्पती : २००८
ग्रामीण विकासाच्या योगदानासाठी साहित्यवाचस्पती ही मानद पदवी भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे महासंचालक डॉ. मंगलराय यांच्या हस्ते.

१८. श्री. चंद्रशेखरेंद्र सरस्वती नॅशनल एमिनन्स अवॉर्ड - दी साऊथ इंडियन एज्युकेशन सोसायटी : २००८ - श्री. आर. चिदंबरम यांच्या हस्ते.

१९. जनकल्याण समितीद्वारा देण्यात येणारा २००८-०९ चा १४ वा प.पू. गोळवलकर गुरुजी पुरस्कार.

२०. लाला दिवाणचंद राष्ट्रीय पुरस्कार - लाला दिवाणचंद ट्रस्ट : २०१० - श्री. लालकृष्णजी अडवाणी यांच्या हस्ते.

■



# आदरांजली

२७ फेब्रुवारी २०१० - दिव्यत्वाचा स्पर्श झालेल्या नानाजींनी अकल्पितरीत्या सर्वांचा निरोप घेतला. स्थूलमानाने देह त्यागणारे नानाजी असंख्य देशवासीयांच्या मनात घर करून बसले होते. त्यांच्या वियोगाची बातमी दूरदर्शनच्या अनेक चॅनल्सवर दाखवली जात असताना जे जे लोक त्यांच्या कार्यात प्रत्यक्ष सहभागी झाले होते, ज्यांना नानाजींच्या समाजोपयोगी कार्याची, राजनीतीतील उत्तुंग बुद्धिमत्तेची माहिती होती, ज्यांनी नानाजींकडून प्रेरणा घ्यायचे ठरवले होते, अशा अनेकांना धक्का बसला.

९४ वर्षांची आयुसंपदा लाभलेल्या नानाजी देशमुख या कृतिशील ब्रह्मर्षींचे व्यक्तिमत्त्व अशा कोणत्या रसायनाने घडले होते की, ज्यामुळे संपर्कात आलेल्या, न आलेल्या कुणाही लहान-थोराला त्यांच्याविषयी असीम असे आदरयुक्त आकर्षण वाटावे? त्यांच्याबद्दल कमालीची स्नेहशील आश्वासकता वाटावी?

आपल्या आध्यात्मिक वाङ्मयात 'ओंकार' या शब्दात खूप गहन अर्थ ध्वनित आहे. तसाच ज्ञानेश्वरीत पहिल्याच ओवीत गणपतीला 'स्वसंवेद्या' हा एकच पण सर्वार्थ परिपूर्ण शब्द वापरला आहे. एकाच शब्दांत नुसता शब्दार्थ सांगत नाही तर शब्दांच्या पलीकडे असलेल्या अरूपाचेही दर्शन घडवतो. तशीच कृती कृतिशील ब्रह्मर्षी हे विशेषण ज्यांच्यासाठी वापरले ते नाव म्हणजे नानाजी! या

विशेषणातच जीवनाचे ध्येय व ते गाठायचे साधन हे फार मार्मिकपणे सूचित होते. स्वर्गीय अशा देणगी रूपात मिळालेले जीवन आणि निखळ आनंदप्राप्तीसाठी या जीवनाचा साधन म्हणून केलेला वापर, असा तैतरीय उपनिषदात सांगितलेला एक विचार आपण स्वीकारला तर जीवनाच्या हेतूचा सहज उलगडा होतो. एखादी कृती जीवनाचे सम्यकदर्शन घडवणारी, जीवन जगण्याचा उत्साह व आनंद निर्माण करणारी असेल तरच ती कृती खऱ्या अर्थाने जीवन साधना म्हणता येईल. नानाजींचे संपूर्ण आयुष्य म्हणजे एक धगधगते यज्ञकुंड होते. जीवनाचे 'सत्यम् शिवम् सुंदरम्' असे एक कोरीव लेणेच होते.

मनुष्याला त्याच्या अस्तित्वाची जाणीव जन्मापासून होते. ही आहेपणाची जाणीव म्हणजेच जीवन. अस्तित्वाची ही जाणीव उपभोगता येणे यालाच समाधी असे म्हटले जाते. ही समाधी अवस्था योग, भक्ती, कर्म किंवा ज्ञान मार्गाने मिळवता येते. नानाजींनी त्या अवस्थेला पोहोचण्यासाठी कर्ममार्ग निवडला आणि आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत ते त्याच मार्गाचे पांथस्थ राहिले.


राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक, जनसंघाचे खंदे कार्यकर्ते, नेते, आणीबाणीविरुद्ध पुकारलेल्या मा. जयप्रकाशजींच्या समग्र क्रांती युद्धाचे सेनानी, जनता सरकारचे शिल्पकार, उद्योगमंत्रिपद नाकारून विधायक सेवाकार्याला वाहून घेणारे दीनदयाल शोध संस्थानचे संस्थापक, उत्तर प्रदेशाच्या मागास भागातील गोंडा, महाराष्ट्रात बीड, मध्यप्रदेशातील चित्रकूट, बिहारमधील सिंहभूम या सर्व ठिकाणांच्या अनेक प्रकल्पांचे जन्मदाते, विचारवंत अशी कितीतरी बिरुदे नानाजींना अर्पण केलेली आहेत. राष्ट्रोद्धारासाठी भव्यदिव्य स्वप्ने पाहणारे अनेक असतात, आपल्या संस्कृतीचे योगदान आठवून सर्वांच्या सहकार्याने आपल्या देशात काहीतरी रचनात्मक, विधायक घडावे अशी मनीषा बाळगणारेही खूप असतात. तथापि, देशासमोरील आव्हानांचे विराट स्वरूप पाहून यातील काही लोक हतबल होतात, काहींचे संकल्प हवेतच विरून जातात. मात्र, त्याचवेळी ज्यांच्यात ईश्वरी शक्तीचा संचार असतो, असे काही दृढनिश्चयी, कृतिशील महात्मे, राष्ट्रोद्धारासाठी जन्म घेतात. कंटकमय वाटचाल करीत दोन्ही हातांनी देशाच्या पुनरुत्थानाचे काम एका निर्मोही भावनेने करतात. अशा असामान्य व्यक्तींमध्ये नानाजींचा नंबर फार वरचा लागतो. सेवाभावी वृत्तीचे कंकण बांधून दीनदलितांच्या कल्याणासाठी सतत राबणारे हात, विचार करणारे मन, आपुलकीची हाक आणि ऊब देणारी माया, 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले'


याची प्रचीती देणारी कृती ज्यांच्या हातून घडली असे २० व्या शतकातले संत म्हणजे नानाजी देशमुख.

'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती, देह कष्टविती उपकारे!' या ओळी नानाजींना तंतोतंत लागू पडतात.

आभाळातील देवाच्या संकल्पनेवर त्यांचा विश्वास नव्हता. 'माझ्या भूमीचा देव माणूस आहे.' असे म्हणत त्या माणसाच्या उन्नतीसाठी तन, मन आणि धनाने सर्वस्व अर्पण करणाऱ्या नानाजींना ही भावपूर्ण आदरांजली.

■





# उपसंहार

नानाजींच्या चरित्रलेखनाचा प्रवास हा अनेक शक्यतांपैकी एक लिखित स्वरूपात गुंफण्याचा प्रयत्न आहे. अजूनही कितीतरी जण त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन त्यांचे चरित्र आपल्या दृष्टिकोनातून लिहितील आणि तसे लिहिलेही जायलाच हवे. ती त्या त्या थोर व्यक्तीच्या कार्याचीच मागणी असते.

नानाजींनी दीनदयाल शोध संस्थानच्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून शिक्षाप्रणालीमध्ये सुधारणा घडवून आणलेली आहे. प्रत्येक भारतीयाला 'भारत पूर्णमिदम्' करण्याकडे घेऊन जाण्याचा त्यांनी हा एक आधुनिक यज्ञच मांडलेला आहे. नानाजींच्या कार्याकडे अभ्यासपूर्ण नजरेने बघितल्यास अभ्यासाकरिता निश्चितच नवी दिशा-नवा मार्ग आणि प्रेरणा मिळून जाणारच! अखेर कुठल्याही व्यक्तित्वाचे मूल्यमापन ती व्यक्ती किती जगली यापेक्षा कशा प्रकारचे आयुष्य ती जगली यावरच सर्वस्वी अवलंबून असते. नानाजींनी आपले आयुष्य गुणात्मक दर्जाने जगून तरुणांपुढे एक वस्तुपाठच ठेवलेला आहे.

गौतमाचे कारुण्य, चाणक्याचे चातुर्य, शिवाजी राजांची दूरदृष्टी, रामशास्त्री यांचा निर्भीडपणा, जोडीला त्याग आणि अवघा संसार सुजाण, सुखी करण्याची मनीषा, ही वैश्विक दृष्टी या सर्वांचे रसायन म्हणजेच नानाजी देशमुख. त्यांचा तपस्वी जीवन प्रवास ऋषितुल्य म्हणावा असाच आहे. अशा व्यक्तिमत्त्वाविषयी

सर्वांचा एकच भाव असू शकतो आणि तो म्हणजे अशा माणसावर, त्यांच्या जगण्यावर शतदा प्रेम करावे.

आज आपण एकविसाव्या शतकात प्रवेश केलेला आहे. मन भौतिक, तांत्रिक आणि वैज्ञानिक प्रगतीने उन्नत झाले असताना कुठेतरी आत अस्वस्थ आहे. कितीतरी प्रश्नांची उत्तरे मिळालेलीच नाहीत. मनात नुसते काहूरच माजलेले आहे. भ्रष्टाचार, प्रदूषण, शोषण, निरक्षरता, अंधश्रद्धा यासोबत व्यसनांच्या विळख्यात जीवन बेशिस्त झालेले आहे. या वातावरणातही बघितले तर नानाजी, त्यांचे कार्य, विचाररूपी किरणे जाणवतील. अशा बिकटप्रसंगी नानाजींच्या कार्याकडे बघितल्यास निश्चितच नवी दिशा, नवा मार्ग, उत्साहवर्धक मार्गदर्शन मिळेल.

नानाजी हिंदू संघटन करण्यासाठी झिजले. त्यांनी देश वैभवापर्यंत नेण्यासाठी प्रतिज्ञा घेतली. स्वातंत्र्योत्तर काळातील ते आगळेवेगळे कर्मयोगी होते. जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनातील सेनापती होते. नानाजींनी जयप्रकाशजींना स्वत:च्या आचरणातून, विचारांतून जिंकले व त्यांना संघाचा परिचय करून दिला.


वर्ष १९१६ ते २०१० अशी ९४ वर्षे आयुष्यसंपदा लाभलेल्या नानाजी देशमुख यांचे कृतिशील ब्रह्मर्षी व्यक्तिमत्त्व त्यांच्या संपर्कात आलेल्या लहान-मोठ्यांना त्यांच्याविषयी आदरयुक्त आकर्षण वाटावे असेच होते.

*देखणी ती पाऊले जी ध्यासपंथे चालती*
*वाळवंटातूनसुद्धा स्वस्तिपद्मे रेखती*
*देखणी ती जीवने ती तृप्तीची तीर्थोदके*
*चांदणे ज्यातून वाहे शुभ्र पाऱ्यासारखे*
*देखणा देहांत तो जो सागरी सूर्यास्तसा*
*अग्नीचा पेरून जातो रात्रगर्भी वारसा*

नानाजी, तुम्ही योगी आहात म्हणून तर श्री शंकराचार्यांपासून स्वामी चिन्मयानंदांपर्यंत आणि जे.आर.डी. टाटांपासून ते पु.ल. देशपांडेंपर्यंत सर्वांनी तुमच्यावर स्तुतिसुमने उधळली आहेत. राष्ट्रोद्धारासाठी त्यावेळच्या अराजक, अंधकारसदृश परिस्थितीवर मात करण्यासाठी तुम्ही आम्हाला क्षितिजावर उगवलेल्या तेज:पुंज ताऱ्यासारखे सतत भासमान होता.

■

# नानाजी देशमुख यांचा जीवनपट



१९१६ श्रीमती राजाबाई मातेच्या पोटी शरद पौर्णिमेच्या सकाळी दि. ११ ऑक्टोबर १९१६ रोजी निजाम राजवटीत परभणी जिल्ह्यातील कडोळी येथे जन्म झाला.

संपूर्ण नाव : चंडिकादास अमृतराव देशमुख

प्रचलित नाव : नाना देशमुख

पित्याचे नाव : अमृतराव रामराव देशमुख

भावंडे : १ भाऊ, ४ बहिणी

शिक्षण : इयत्ता ८ वीपर्यंतचे शिक्षण बहीण श्रीमती लक्ष्मीबाई दत्तात्रेय देशपांडे आणि मामा श्री. भाऊसाहेब देशपांडे यांच्याकडे झाले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण वाशिम येथे श्री. भाऊ पाठक यांच्याकडे झाले.

१९२८ वयाच्या १२ व्या वर्षी रिसोड येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघात प्रवेश.

१९३२ वयाच्या १८ व्या वर्षी मालेगाव येथे प.पू. डॉ. हेडगेवारांची भेट.

१९३४-३५ वाशिम येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक प.पू. डॉ. हेडगेवार यांनी १७ स्वयंसेवकांना राष्ट्रसेवेची प्रतिज्ञा दिली, त्यात नानाजी वयाने सर्वांत लहान होते.

१९३९ प.पू. डॉ. हेडगेवारांनी उच्च शिक्षणासाठी आणि संघ कार्यासाठी पिलानीला (राजस्थान) जाण्याची आज्ञा केली.

१९४० प.पू. डॉ. हेडगेवारजींच्या चितेसमोर केवळ संघ कार्य करण्याचा व घरी न परतण्याचा संकल्प केला.

पिलानीहून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ऑफिसर्स ट्रेनिंग कॅम्पच्या प्रथम वर्ष शिक्षा वर्गासाठी नागपूरला गेले.

१९४० स्व. बाबासाहेब आपटे यांनी त्यांना उत्तर प्रदेशमध्ये संघ प्रचारक म्हणून आग्र्यास पाठवले. तेथे नानाजी दीड वर्ष पं. दीनदयालजींसोबत राहिले.

गोरखपूर येथे नानाजींनी संघाची पहिली शाखा सुरू केली.

१९४१ गोरखपूरला संघ प्रचारक या नात्याने संघटनकौशल्य दाखवले.

| | |
|---|---|
| १९४४ | संघाच्या २५० शाखा नानाजींनी तीन वर्षांत स्थापन केल्या. त्यांची गोरखपूर विभाग प्रचारक म्हणून नेमणूक झाली. |
| १९४८ | राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी. ६ महिने कारावास भोगला. |
| १९४८-५१ | राष्ट्रधर्म प्रकाशनाचे व्यवस्थापकीय संचालक. या प्रकाशनातर्फे 'राष्ट्रधर्म' मासिक, 'पांचजन्य' साप्ताहिक आणि 'स्वदेश' दैनिक लखनौहून प्रकाशित होत होते. |
| १९५० | संघ कार्यासोबत गोरखपूर येथे पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक शिक्षणासाठी सरस्वती शिशुमंदिराची स्थापना, त्याचे आता १४,००० शाळांचे जाळे संपूर्ण देशात पसरले आहे. |
| १९५१ | भारतीय जनसंघ पक्षाची स्थापना करण्यासाठी पं. दीनदयालजींबरोबर काम करण्याचा संघाचा आदेश |
| १९५१ | जनसंघाची स्थापना. संस्थापकीय सदस्य आणि<br>उत्तर प्रदेशामध्ये संघटन सचिव आणि कोषाध्यक्ष म्हणून ३ वर्षे कार्यरत. |
| १९५२ | विनोबा भावे यांच्या 'भूदान' चळवळीत, पदयात्रेत काही कार्यकर्त्यांसमवेत भाग घेतला (२ महिने). प. पू. गोळवलकर गुरुजींनी विनोबांच्या नेतृत्वाखाली पदयात्रेत सामील होण्याचा आदेश दिला होता. |
| १९५७ | भारतीय जनसंघाच्या शाखा उत्तर प्रदेशमधील सर्व जिल्ह्यांत स्थापन केल्या. |
| १९६२ | बिहार राज्याच्या जनसंघाचे कामही त्यांच्याकडे आले. |
| १९६७ | भारतीय जनसंघाचे अखिल भारतीय संघटनमंत्री झाले आणि दिल्ली येथे आले.<br>चौधरी चरणसिंग यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त विधायक दलाचे सरकार सर्व पक्षांच्या मदतीने स्थापन झाले. त्यात नानाजींचे फार मोठे योगदान होते. भारतीय जनसंघ सरकारमध्ये सामील झाला. |
| १९६८ | १३ फेब्रुवारी- दीनदयाल शोध संस्थानची स्थापना<br>पं. दीनदयाल स्मारक समितीची स्थापना |
| १९७२ | २० ऑगस्ट- 'एकात्म मानव दर्शन'च्या कामाला सुरुवात |

१९७४ बिहारमध्ये जयप्रकाशजी नारायण यांच्या नेतृत्वाखाली समग्र क्रांती चळवळीमध्ये विशेष सहभाग. या चळवळीचे मुख्य संघटक म्हणून जयप्रकाशजी नारायण यांनी नानाजींची नियुक्ती केली.

१९७४ समग्र क्रांती मोर्चावर पोलिसांचा लाठीमार, जयप्रकाशजींना लाठीमारापासून वाचवताना नानाजींचा हात फ्रॅक्चर झाला.

१९७५ तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर केली.

१९७५
१. इंदिरा गांधींनी संघावर बंदी आणली आणि विरोधी लोकांची धरपकड सुरू केली.
२. नानाजींनी भूमिगत राहून समग्र क्रांती चळवळीचा देशभर प्रचार-प्रसार केला.
३. नानाजींना अखेर अटक : तिहार जेलमध्ये कारावास.

१९७७ आणीबाणीच्या काळात सर्व पक्षांबरोबर संबंध प्रस्थापित करून जनता पार्टीचे गठन करण्यात विशेष भूमिका, संस्थापकीय सदस्य, शिल्पकार आणि महासचिवपदाचे दायित्व सांभाळले.

१९७७ तिहार जेलमधून सुटका, बलरामपूर मतदारसंघातून प्रचंड मताधिक्याने लोकसभेसाठी निवडून आले.

मा. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात सामील होण्यास नम्रतेने नकार, दीनदयाल शोध संस्थानच्या माध्यमातून रचनात्मक कार्यास वाहून घेतले.

१९७७ वयाची ६० वर्षे पूर्ण केल्यानंतर राजकारणातून निवृत्त होण्यासाठी इतरांना आवाहन केले आणि स्वत: निवृत्ती घेतली.


१९७८-९० भारतातील मागासलेल्या जिल्ह्यांतून रचनात्मक कार्य सुरू केले.
१. महाराष्ट्र - बीड, नागपूर, औरंगाबाद
२. उत्तर प्रदेश - गोंडा,
३. ओरिसा - सुंदरगढ,
४. बिहार - सिंहभूम
५. गुजरात - अहमदाबाद
६. मध्यप्रदेश - चित्रकूट


१९७८ गोंडा जिल्हा दत्तक घेऊन रचनात्मक कार्यास सुरुवात

| | |
|---|---|
| १९७८ | गोंडा प्रकल्पाचे मा. राष्ट्रपती श्री. संजीव रेड्डी यांच्या हस्ते उद्‌घाटन. जानकीनगर या गावाचे 'जयप्रभाग्राम' असे नामकरण केले. |
| १९८४ | बीड जिल्हा दत्तक घेऊन सामाजिक कार्यास सुरुवात. |
| १९८७ | डोमरी, जि. बीड येथे धन्यता अभियान. ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी 'सोनदरा गुरुकुलम्'ची स्थापना. |
| १९९१ | भगवानानंद महाराज यांची भेट. |
| १९९१ | चित्रकूट ग्रामोदय विश्व विद्यालयाचे शिल्पकार. साडेतीन वर्षे कुलाधिपती. |
| १९९५ | कुलाधिपतीपदाचा राजीनामा. |
| १९९५ | चित्रकूट प्रकल्पांतर्गत ५०० गावे दत्तक घेतली. |
| १९९७ | वयाच्या ८१ व्या वर्षी ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स संशोधन केंद्रास देहदानाची घोषणा. |
| १९९९ | १९९९ पर्यंतच्या कालावधीत केलेल्या उत्कृष्ट सामाजिक कार्यामुळे मा. राष्ट्रपतींद्वारा सन्माननीय राज्यसभा सदस्य म्हणून नियुक्ती. |
| १९९९ | राष्ट्रपतींद्वारा पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. |
| १९९९ | जन्मग्राम कडोळीस भेट. |
| २००५ | मा. राष्ट्रपती श्री. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची चित्रकूट प्रकल्पास भेट आणि नानाजींसोबत चर्चा. |
| २०१० | वरिष्ठ नागरिकांच्या विश्व संमेलनाचे चित्रकूट येथे उद्‌घाटन. |
| २०१० | सद्‌गुरू सेवा संघ दवाखाना चित्रकूट येथे अखेरचा श्वास घेतला. |

■

# वंशवेल


मूळपुरुष
गजानन
रामाजी
राघोजी
गोपीनाथ
गंगाधर
रामाजी
लिंबाजी
रंगोजी
रामाजी
अंतोजी
लिंबाजी
भिमाजी
राघोजी
राजाराम
बाळकृष्ण
वामनराव
रामराव
माणिकराव
केशवराव
अमृतराव
गंगाधर
रामराव
सदाशिव
राघवेंद्रराव
अमृतराव
त्र्यंबकराव
भीमराव
गंगाधरराव
कोकिळाबाई
लक्ष्मीबाई
मैनाबाई
सखूबाई
धुंडीराज
चंडिकादास
(नानाजी)
शांताबाई
विनय बाऱ्हाळे
अरुणा अंबेकर
गिरीश बाऱ्हाळे



## लेखकाविषयी संक्षिप्त माहिती

लेखक श्री. कमलाकर अंबेकर हे पूर्वी बँक अधिकारी होते. स्वेच्छानिवृत्तीनंतर उर्वरित आयुष्य दीनदयाल शोध संस्थानच्या विधायक समाजकार्यासाठी वाहून घेतले आहे. सध्या संस्थेच्या विविध समित्यांवर कार्यरत आहेत.

**प्रबंध समिती सदस्य :**

दीनदयाल शोध संस्थान, नवी दिल्ली

**प्रकल्प प्रमुख :**

दीनदयाल शोध संस्थान, बीड

**अध्यक्ष :**

जन शिक्षण संस्थान, बीड

**सदस्य :**

कृषी विज्ञान केंद्र, डिघोळअंबा

**माजी सदस्य :**

सोनदरा गुरुकुलम्, डोमरी

**माजी कोषाध्यक्ष :**

ज्येष्ठ नागरिक संस्था, औरंगाबाद

नानाजी देशमुख हे नाव भारतासह जगभरात सर्वदूर पोहोचलेले आहे. ज्यांचे कार्य पाहून कर्मयोगी हेच विशेषण ज्यांना शोभून दिसते असे नानाजी देशमुख आदर्श राष्ट्रपुरुष होते. सेवावृत्ती, विनम्रता, देशभक्ती, लोकसेवा यांचा एकाच व्यक्तीत मिलाफ असणे दुर्मिळ असते, त्या दुर्मिळ व्यक्तींपैकी ते एक होत. त्यांची वृत्ती संशोधकाची होती. त्यातूनच एखादे कार्य हाती घेतल्यानंतर त्यात खोलवर जाऊन ते शंभर टक्के चांगले कसे होईल याची जिद्द ते बाळगत. वाणिज्य, कला, स्थापत्य, मानसशास्त्र, आरोग्य, कृषी, काष्ठशिल्प, चित्रकला, वास्तुशास्त्र अशा अनेक विषयांमध्ये ते निष्णात होते, यावरूनच त्यांची प्रत्येक क्षेत्रात जीव ओतून काम करण्याची ताकद, इच्छा आणि प्रेम दिसून येते.

महाराष्ट्राचे शिल्पकार भारतरत्न नानाजी देशमुख

कमलाकर अंबेकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ